# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै, २०१६ । पृष्ठे १०० । किंमत १५ रुपये

आषाढी एकादशी आणि गुरुपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा !

## आमची वाचनीय पुस्तके















# पावसाआधीचा पाऊस

**शान्ता ज. शेळके**

माणसाच्या मनात खोलवर पाहण्याचा सहजपणा शान्ताबाईंच्या लेखनात नेहमीच दिसून येतो. 'निसर्गाकडे परत' आयुष्याकडे बघण्याचा एक वेगळाच दृष्टीकोन दाखवतो. वागण्या-बोलण्यात नक्की खरं-खोटं काय हे कधी कधी समजणं कठीण असतं, असं 'भूलभुलय्या' सांगून जातो. समाजात वावरताना आपल्या स्वभावाचे, व्यक्तिमत्त्वाचे काटे आपण किती सहज खुडून टाकतो ते 'गुलाब, काटे, कळ्या' मधून जाणवत राहतं. अति काम करणं ही एक समस्या होते आहे ते 'वर्कोहोलिक' तीव्रतेनं दाखवून देतो. स्वातंत्र्यदेखील कधीतरी नकोसं वाटतं असं 'मनातला किल्ला' दाखवतो. छोट्याशा प्रसंगातून लहानपणीच अपयशांना, सत्याला कसं सामोरं जायचं याची 'ओळख' होते. मानवी स्वभावाचे असे विविध पैलू दाखवतानाच 'चोरबाजार'मधून लेखिका आपल्याला वास्तवाकडे नेते. सामान्य माणसाची नस न् नस पकडत हा 'पावसाआधीचा पाऊस' चिंब आनंदानुभव देतो.

# मेहता मराठी ग्रंथजगत

। जुलै २०१६ । वर्ष पंधरावे । अंक सातवा ।

मांडणी-अक्षरजुळणी

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २३८

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| दिनविशेष | १० |
| उपक्रम | १४ |
| साहित्यवार्ता | १८ |
| पुरस्कार | ४८ |
| *पुस्तक परिचय* | |
| चिकन सूप फॉर द मदर्स सोल भाग - २ | ५२ |
| स्मरण | ७४ |
| श्रद्धांजली | ८० |
| अभिप्राय | ८२ |
| का ते सांगा! | ८८ |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संपादकीय

## ऑनलाइनकडून ऑफलाइनकडे

ॲमेझॉनचे प्रमुख वित्त अधिकारी ब्रिआन ओलसावेस्की यांनी नुकतीच भारताला भेट दिली आणि एकूण प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. ॲमेझॉनने भारतात १५ हजार कोटी रुपये ई-कॉमर्सचया कार्यवृद्धीसाठी गुंतवले आहेत. फ्लिपकार्टच्या खालोखाल ॲमेझॉनचीच ही गुंतवणूक आहे. 'भारतात जे संशोधन चाललेले आहे ते अन्यत्र कुठे चालू नाही,' असे ब्रिआन ओलसावेस्की यांनी गुंतवणूकदारांच्या बैठकीत सांगितले. ॲमेझॉन इंडियाचे दालन हे सर्वार्थाने विश्वासार्ह म्हणून ग्राहकांच्या प्रशंसेला पात्र ठरले आहे. पंचवीस शहरांतील विक्रेते त्या दृष्टीने तयार झालेले आहेत.

नुकत्याच संपलेल्या पहिल्या तिमाहीत ॲमेझॉनची गुंतवणूक २९ अब्ज डॉलर्सची असून ६०४ दशलक्ष डॉलर्सचा फायदा झाल्याचे जाहीर करण्यात आलेले आहे.

ॲमेझॉनचा लौकिक रिटेल क्षेत्रात जगातील सर्वांत मोठी कंपनी, असा आहे. भारतात गेल्या दोन वर्षांत तिने १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून आपला पसारा मांडला आहे. आणखी ३ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा इरादा तिने जाहीर

केला आहे. ॲमेझॉनची भारतातील मुख्य प्रतिस्पर्धक म्हणून फ्लिपकार्टचा निर्देश केला जातो. सचिन बन्सल ई-कॉमर्स क्षेत्रात हातपाय पसरण्याची शिकस्त करीत आहे. ई-कॉमर्सच्या क्षेत्रात प्रभावशाली ठरण्यासाठी जबरदस्त तंत्रज्ञानाची गरज आहे; ते विकसित करण्याची धडपड चालू आहे. ॲमेझॉनकडे त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान तयार आहे. भारत सरकारने रिटेल क्षेत्रात परदेशी भांडवलाच्या टक्केवारीबाबत डळमळीत धोरण ठेवल्याने ॲमेझॉन, फ्लिकार्ट वगैरेंची गोची झाली होती. आता त्याबाबत काही निर्णय झाल्याने गुंतवणुकीला गती मिळेल. फ्लिकार्टच्या सचिन बन्सल यांनी रिटेल क्षेत्रात अनावश्यक स्पर्धा असू नये अशी भूमिका घेऊन, आदित्य बिर्ला ग्रुप आणि फ्यूचर ग्रूप यांच्याशी अनौपचारिक पातळीवर चर्चा चालू ठेवली आहे. ऑनलाईन आणि ई-कॉमर्स ऑफलाईन यांच्यात दुरावा वा स्पर्धा टाळावी यासाठी सरकारी धोरण उदार आणि सहकार्याचे असावे. 'रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया' या संस्थेचीही त्यासाठी स्थापना करण्यात आली आहे.

लिटल (५० दशलक्ष डॉलर्स ), निअरबाय (२० दशलक्ष डॉलर्स ), डील्स अँड यू (१९ दशलक्ष डॉलर्स ), क्राउनइट (१० दशलक्ष डॉलर्स ), मायडाला (८६ दशलक्ष), मॅजिकपिन (३ दशलक्ष), निफलर (१ दशलक्ष डॉलर्स ) या कंपन्यांशी बन्सल यांच्या वाटाघाटी चालू आहेत. भारत ही मोठी बाजारपेठ आहे आणि पाश्चात्त्य देशांत उपयुक्त ठरणारी कार्यपद्धती वा यशसूत्रे भारतातही तशीच लागू पडतील असे गृहीत धरून चालणार नाही, हे या सर्वांच्या चर्चेतून लक्षात येत आहे. प्रत्येक कंपनीचे पायाभूत सूत्र वेगळे असू शकेल. उदाहरणार्थ क्राउनइटने २२ ते ३२ या वयोगटातील ग्राहक समोर ठेवून त्यांच्याशी संवाद साधू शकेल असे ताज्या दमाचे चुणचुणीत विक्रेते नेमण्याचे ठरवले आहे.

विक्रीदालनांची निवड अशा तरुण ग्राहकांच्या दृष्टीने सोयीची असेल. गुडगाव-दिल्ली येथे ५० तर बंगळूरला ३० विक्रीकेंद्रे

क्राउनइटने सुरू केली आहेत. कोणीही ग्राहक किमान १५०० रुपयांची खरेदी करून जाईल यावर कटाक्ष असेल.

अशा वेगवेगळ्या संकल्पना घेऊन निघणाऱ्या रिटेल आउटलेटचा अनुभव हा निर्णायक ठरेल. स्टार्टअप कंपन्याही काळाच्या कसोटीवर घासूनपुसून व्यवसायवृद्धी करण्याची लवचिकता दाखवतील, तरच टिकतील. बुकस्टॉलकडून ऑनलाईन पुस्तकविक्री आणि ई-बुक्सकडून किंडल बुकरीडर अशीही काहीतरी वाटचाल चालू राहण्यातच आपले प्रतिभाविभ्रम प्रकट होतात, आपली  बिझनेस मॉडेल्स तयार होतात. संगणक, इंटरनेट, मॅकिंतोश, मोबाईल, स्मार्टफोन, आयपॅड, ई-बुक्स, किंडल बुकरीडर.... कल्पनेतही नसलेल्या आभासविश्वात या गोष्टी आपल्याला घेऊन जातात. तंत्रज्ञानातील नवनव्या शक्यतांची झलक दाखवतात.



# ग्रंथजगत

## विशेष...

दि. १ मार्च, २०१६ पासून
मेहता पब्लिशिंग हाऊस
'मेहता मराठी ग्रंथजगत'ची
वार्षिक वर्गणी
बंद करीत आहोत.
तरी आपण
त्रैवार्षिक किंवा पंचवार्षिक वर्गणी
पाठवून सहकार्य करावे,
ही विनंती.

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी संपर्क
www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

GET IT ON Google Play आणि dailyhunt

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**eBooks**





# दिन विशेष

## गुरुविण कोण दाखविल वाट!

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।**

**गुरुःसाक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः॥**

ब्रह्मा, विष्णू व महेश (शंकर) हे देव म्हणजे गुरू आहेत. परब्रह्म (मूळ श्रेष्ठ तत्त्व) हेसुद्धा साक्षात गुरूच आहेत. अशा गुरूंना नमस्कार असो.

आपल्या देशात वैदिक काळापासून, गुरू-शिष्य परंपरा चालत आली आहे. श्रीराम-लक्ष्मणांचे विश्वामित्र हे गुरू तर श्रीकृष्ण व सुदामा यांना सांदिपनी ऋषींनी ज्ञान दिले. कौरव-पांडव आणि एकलव्याला गुरू द्रोणाचार्यांनी धनुर्विद्या शिकवली. ज्ञानेश्वरांनी आपले वडील बंधू निवृत्तिनाथांनाच गुरू केले, तर प्रत्यक्ष विठ्ठलाशी संवाद साधणारे संत नामदेव यांना विसोबा खेचर गुरू म्हणून लाभले. शिवाजी महाराजांनी समर्थ रामदास स्वामींना गुरू मानले, स्वामी विवेकानंदांना रामकृष्ण परमहंसांनी घडविले. तसेच महान विक्रमवीर सचिन तेंडुलकरला रमाकांत आचरेकर यांनी क्रिकेटचे धडे दिले. गुरू-शिष्य परंपरेची अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

आपली संस्कृती या गुरू-शिष्य परंपरेचा गौरव करणारी आहे. भारतीय संस्कृतीचे मूलाधार व शिल्पकार म्हणजे आद्य गुरू महर्षी व्यास होत. व्यासमुनी हे आपल्या संस्कृतीचे वैभव आहेत. त्यांनी विपुल ग्रंथसंपदा निर्माण केली. व्यासांनीच भारतीय संस्कृतीची मूळ संकल्पना मांडून पुढे तिची जोपासना केली. पूर्वी एकच वेद होता. महर्षी व्यासांनी त्याचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे विभाजन आणि संपादन केले. 'महाभारत' अलौकिक ग्रंथाची रचना व्यासांनीच केली. श्री गणेशाने त्याचे लेखन केले. महाभारतात धर्मशास्त्र, व्यवहारशास्त्र, नीतिशास्त्र, आणि मानसशास्त्र यांचाही समावेश आहे.

आद्य गुरू महर्षी व्यासमुनींना वंदन करून त्यांची पूजा व 'ओम नमोस्तुते, व्यास विशालबुद्धे' अशी प्रार्थना करण्याचा मंगलदिन म्हणजेच व्यास पौर्णिमा किंवा गुरुपौर्णिमा होय.

ही सद्गुरूची पौर्णिमा मानली जाते. गुरूचे स्मरण करून त्यांच्या प्रती अनन्यभावे श्रद्धायुक्त अंतःकरणाने आदर व कृतार्थभाव व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. या दिवशी गुरू (ईश्वरी) तत्त्व नेहमीपेक्षा एक हजार पटींनी अधिक कार्यरत असते; त्यामुळे गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने केलेली सेवा गुरू (ईश्वर) चरणी लवकर रुजू होते, पोहोचते; साहजिकच ती इतर दिवसांपेक्षा जास्त फलदायी ठरते. म्हणूनच गुरुपौर्णिमेचा हा सण देशभरात विविध प्रकारे साजरा केला जातो.

पौर्णिमा म्हणजे प्रकाश; गुरू शिष्याला ज्ञानाचा प्रकाश देतात. अंधारातून प्रकाशाकडे नेतात.

**गुरुविण कोण दाखविल वाट।**
**आयुष्याचा पथ हा दुर्गम अवघड डोंगर घाट।।**

अशी सर्वसामान्य माणसाची अवस्था असते आणि कठीण प्रसंगी अतिशय निरपेक्षपणे प्रेमाने आधार देऊन संकटमुक्त करणारे गुरूच असतात. जलाशयात खूप पाणी असले तरी मान खाली केल्याशिवाय आपण ते घेऊ किंवा पिऊ शकत नाही. तसेच गुरुप्रती नम्र (लीन) झाल्याशिवाय आपणास यथार्थ ज्ञान प्राप्त होत नाही. 'गुरुबिन ग्यान कहाँसे पाऊँ 'असे म्हटले जाते ते यासाठी असावे. मायेच्या संसाररूपी भवसागरातून शिष्याला अलगद बाहेर काढून त्याची नौका पार नेण्याची किमया फक्त गुरूच करू शकतात. गुरू शिष्यावर आशीर्वादाचा वर्षाव तर करतातच, पण त्याचबरोबर त्याच्याकडून आवश्यक ती साधना करून घेतात; त्यामुळे शिष्याचा मोक्षाचा मार्ग सुकर होतो. गुरू आपल्या शिष्याला स्वतःकडील सर्व ज्ञान देऊन त्याला आपल्यासारखे; किंबहुना आपल्यापेक्षा श्रेष्ठ बनवतात.

गुरू संप्रदायामध्ये श्री दत्तात्रेयांचे स्थान सर्वोच्च आहे. स्वतः दत्तगुरूंनी २४ गुरू केले, असे मानले जाते म्हणजे...

**जो जो जयाचा घेतला गुण ।**
**तो तो म्यां गुरू केला जाण ।।**

**गुरूसी आले अपारपण ।**
**जग संपूर्ण गुरू दिसे ।।**

हे वचन दत्तात्रेयांच्या बाबतीत यथायोग्य वाटते; खरे ठरते. तसे पाहता, आपण सर्व जण माता-पिता, निसर्ग, पशू-पक्षी आणि आपल्याला भेटणारी अनेक माणसे यांच्याकडून रोज काही ना काही शिकत असतो. त्या अर्थाने ते सर्व आपले गुरूच असतात.

अशा प्रकारे ईश्वराचे सगुणसाकार रूप असलेल्या गुरूंचे गुरुपौर्णिमेच्या दिवशी मनोभावे पूजन केले जाते. आपण ज्यांच्याकडून काही विद्या घेतो / शिकतो, त्यांच्या प्रति आदराने कृतज्ञता व्यक्त करणे, हे आपले आद्य कर्तव्य आहे. अर्थात गुरूला गुरुदक्षिणा अर्पण करणे म्हणजे काहीतरी वस्तू किंवा मोबदला देणे एवढा मर्यादित अर्थ नसून, गुरूने दिलेल्या ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार तसेच लोककल्याणासाठी त्याचा सुयोग्य वापर करणे होय.

**व्यासांची नम्रता**

महर्षी व्यासांनी 'महाभारता'ची रचना केली आणि साक्षात श्रीगणेशाने व्यासमुनींच्या कथनानुसार त्याचे लेखन केले, हे सर्वज्ञात आहे. पण लिखाणाची जबाबदारी घेण्यापूर्वी श्रीगजाननाने प्रत्यक्ष व्यास ऋषींना कथा सांगताना मध्ये खंड पडला तर पुढचे लिखाण मी करणार नाही, अशी अट घातली. महर्षी व्यासच ते! त्यांनी ती मान्य केली. महाभारताचे कथन आणि लेखन सुरू झाले; मात्र, एक वेळ अशी आली की, व्यासांच्या मंत्रमुग्ध कथाकथनामुळे श्रीगणेश त्यामध्ये अगदी रंगून गेले, आणि लिखाणाचे काम थांबले. व्यासमुनींचा मोठेपणा असा की, त्यांनी नम्रपणे कथा सांगताना 'माझे काही राहिले का'अशी विचारणा करून गणेशाला भानावर आणले. श्रीगणेशाला व्यासांची महानता आणि नम्रता समजली आणि 'महाभारत' हा अलौकिक ग्रंथ आकारास आला.

**– उदय हर्षे**

३री आवृत्ती

# तडा

मूळ लेखक - **डॉ. एस्. एल. भैरप्पा**

अनुवाद - **उमा कुलकर्णी**

**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




कॉन्स्टेबल नंजुण्डेगौडा गालातल्या गालात हसला. त्याच्या खेडवळ हास्यामधला मंद आणि जोराच्या हसण्यामधला नेमका फरक लक्षात आला नाही. ''हसायला काय झालं?'' सळयांच्या आड असलेल्या बी.ई. पर्यंतचं शिक्षण घेऊन उद्योगपती म्हणून स्थिरावलेल्या जयकुमारनं विचारलं.

''यू आर माय कझिन!'' बंगळूरमध्ये वाढलेल्या तिनं खेड्यातल्या त्या घराच्या परसात असलेल्या संत्र्याच्या झाडाखाली उभं राहून म्हटलं.

''कुणी शिकवलं तुला इंग्लिश?'' त्याने कठोरपणे विचारलं. तिच्या स्कूलमधल्या कुठल्याही मिसच्या नसेल इतक्या कठोर आवाजात. तिला राग आला. हा काय माझा टीचर आहे, एवढं बोलायला?

''माझ्या मिसनं. माझ्या मम्मीनं! माझी मम्मी इंग्लिशची रीडर आहे!''

''नीट समजून घे. मी तुझा कझिन नाही. ब्रदर आहे! भाऊ मोठा भाऊ! अण्णा.''

''पण माझे डॅडी-मम्मी वेगळे आहेत आणि तुझे अम्मा-अप्पा वेगळे आहेत...'' तिच्या मनातली शंका फिटली नाही.

''वेगळे असले म्हणून काय झालं? माझे अप्पा तुझ्या अप्पांचे मोठे भाऊ; म्हणून मी तुझा दादाच आहे, लक्षात ठेव. तुला इंग्लिश शिकवलंय त्यांना अक्कल नाही!'' त्यानं मास्तरगिरी करत म्हटलं.

भारतीय समाजाला जात असलेल्या तड्यांचं दर्शन घडवत, हृदयाला पीळ पाडणारी; समकालीन जीवनासमोर आरसा बनून जीवन-दर्शन घडवणारी कादंबरी.



# उपक्रम

# दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडित वाचित जावे।।

- श्री स्वामी समर्थ रामदास

*** वाचकांसाठी सुवर्णसंधी ***
**‘करा मैत्री पुस्तकांशी’**
**‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ चा**
**नवीन उपक्रम**
**१८ जुलै ते १५ ऑगस्ट २०१६**
**दरम्यानचा दिनविशेष**

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा.
authors@mehtapublishinghouse.com

## २२ जुलै - धनंजय बिजले जन्मदिन

'लढा लोकपालचा- उद्रेक आम आदमीचा' आणि 'अण्णा हजारे - भ्रष्टाचाराच्या विरोधातील भारतीय लढ्याचा चेहरा' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

*२२ जुलै ते २४ जुलैपर्यंत.*

## २७ जुलै - ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा स्मृतिदिन

'अदम्य जिद्द', 'माझी जीवनयात्रा', 'टर्निंग पॉईंट', 'योद्धा शास्त्रज्ञ-राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

*२७ जुलै ते ३ ऑगस्टपर्यंत.*

## २८ जुलै - जागतिक निसर्गसंवर्धन दिन

'**आपली सृष्टी** १० पुस्तकांची मालिका' संचावर विशेष सवलत.

*२८ जुलै ते ३१ जुलैपर्यंत.*

## २९ जुलै - शि. द. फडणीस जन्मदिन

'**द. मा. मिरासदार**' यांच्या २३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

*२९ जुलै ते ३१ जुलैपर्यंत.*

## ३ ऑगस्ट - अनिल काळे जन्मदिन

'रॉबिन कुक', 'जॉन ग्रिशम', 'फ्रेडरिक फॉर्सिथ', 'मारिओ पुझो', 'रॉबर्ट रोटेनबर्ग' इ. **अनिल काळे** यांनी केलेल्या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

*३ ऑगस्ट ते ५ ऑगस्टपर्यंत.*

## ४ ऑगस्ट - राजीव तांबे जन्मदिन

**'राजीव तांबे'** लिखित बालसाहित्याच्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

*४ ऑगस्ट ते ७ ऑगस्टपर्यंत.*

## ४ ऑगस्ट - लीना दामले जन्मदिन

'अंतरिक्षाच्या अंतरंगात'आणि 'कथारूपी खगोलशास्त्र' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

*४ ऑगस्ट ते ५ ऑगस्टपर्यंत.*

## ६ ऑगस्ट - हिरोशिमा आणि अँटी न्युक्लिअर दिन

'वॉर्सा ते हिरोशिमा' वि. स. वाळिंबे लिखित पुस्तकावर विशेष सवलत.

*६ऑगस्ट ते ७ ऑगस्टपर्यंत.*

## ७ ऑगस्ट - मैत्री दिन

'चौघीजणी','द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ', 'फाइव्ह पॉइंट समवन', 'एक होता मित्र', 'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा', 'टू ब्ल्यू' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

*७ ऑगस्ट ते १० ऑगस्टपर्यंत.*

## ८ ऑगस्ट - शंकर पाटील जन्मदिन

'**शंकर पाटील**' यांच्या २१पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

*८ऑगस्ट ते १४ ऑगस्टपर्यंत.*

## ११ ऑगस्ट - वि. स. वाळिंबे जन्मदिन

'नेताजी', 'वॉर्सा ते हिरोशिमा' या **स्वतंत्र** आणि 'वुइ दि पीपल', 'वुइ, दि नेशन' या **अनुवादित** पुस्तकसंचावर विशेष सवलत.

*११ऑगस्ट ते १४ ऑगस्टपर्यंत.*

## १५ ऑगस्ट - स्वातंत्र्यदिन

'फ्रिडम ॲट मिडनाइट', 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया', 'मोहनदास' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

*१५ऑगस्ट ते १७ ऑगस्टपर्यंत.*

'नेताजी', 'वॉर्सा ते हिरोशिमा' या **स्वतंत्र** आणि 'वुइ दि पीपल', 'वुइ, दि नेशन' या **अनुवादित** पुस्तकसंचावर विशेष सवलत.

*११ऑगस्ट ते १४ ऑगस्टपर्यंत.*

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२

website : www.mehtapublishinghouse.com

**आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके online खरेदी करा**

**www.mehtapublishinghouse.com**

**e-books** **आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके आता** Computer, i-pad **आणि** Tab **वर वाचा.**

play.google.com/store/books ● m.dailyhunt.in/Ebooks/marathi

**मेहता मराठी ग्रंथजगत** (Digital Edition)
पाच वर्षांचे सभासद व्हा आणि आमच्या सर्व पुस्तकांवर ३०% सवलत मिळवा. वर्गणी - ४०० रुपये.(स्वामी सोडून)

**T-Book Club**
TBC ची मेंबरशीप घ्या. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा.

मेहता पब्लिशिंग हाऊस • : 9422046575 • sales@mehtapublishinghouse.com

# साहित्य वार्ता

## ✍ जीवनदृष्टीमुळे कथा श्रेष्ठ-कनिष्ठ बनते

'चांगली कथा आणि श्रेष्ठ कथा यांमधला फरक नेहमीच सर्वश्रुत नसतो. प्रत्यक्षात अनेक कथा चांगल्या असतात; पण श्रेष्ठ नसतात. चिरंतन मानवी मूल्यांशी संबंधित असलेली जीवनदृष्टी कथेला श्रेष्ठत्वाकडे नेते,' असे मत ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेने सुरू केलेल्या 'कथासुगंध' या उपक्रमाचे उद्‌घाटन सासणे यांच्या हस्ते झाले. सासणे यांच्या 'अप्पांचा कोट' आणि 'मनातला मोर' या कथांचे अभिवाचन शुभांगी दामले आणि हर्षद राजपाठक यांनी केले.

सासणे म्हणाले, ''सर्वसामान्य माणसाच्या जीवनव्यवस्थेबद्दल आस्था व्यक्त होणे आणि एकूणच करुणास्वरूप चिंतन व्यक्त होणे, या बाबी कथेला श्रेष्ठत्वाकडे नेतात. सर्वदूर पसरलेला सर्वसाधारण माणूस जगण्याच्या आणि अस्तित्वाच्या छोट्या-मोठ्या लढाया लढत असतो. या माणसाबद्दल कथेत करुणा निर्माण झाल्यास कथा उंची गाठते. रंजनवादाच्या पलीकडे जाऊन मूल्यव्यवस्था तपासण्यात लेखक या नात्याने मला अधिक रस आहे.'' प्रा. जोशी म्हणाले, ''अनुभवाचा वृत्तान्त किंवा गोष्ट म्हणजे कथा नसते, तर प्रत्येक लेखकाची ती एक जीवनदृष्टी असते. त्याआधारे तो जीवनाचा अन्वयार्थ लावत असतो. कथेच्या लांबी-रुंदीपेक्षाही ती कथा कोणता जीवनाशय मांडते, यावर त्या कथेचे मोल अवलंबून असते. जीवनाची व्यामिश्रता लक्षात घेत, हाती आलेल्या अनुभवाच्या छोट्याशा तुकड्याचे अनेक कंगोऱ्यांतून दर्शन घडवावे लागते. कथालेखन हा एक प्रकारचा त्या कथाकाराचा आत्मशोधच असतो.'' दीपक करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले.

## ✍ 'तारक मेहता...' लिम्का बुकात

गेली आठ वर्षे प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन करणाऱ्या सब टीव्हीची 'तारक मेहता का उलटा चष्मा' या मालिकेची लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. या मालिकेचे आजवर १९०० पेक्षा जास्त एपिसोड झाले असून,

प्रेक्षकांनीही मालिकेला भरभरून प्रेम दिले आहे.

सगळ्यात जास्त प्रसारित झालेली विनोदी मालिका म्हणून या मालिकेने 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये स्थान मिळवले आहे. स्वच्छ भारत अभियानात पंतप्रधानांनी या मालिकेचा समावेश करून घेतला होता. शिवाय टीआरपी रेटिंगमध्येही मालिका कायम वरच्या नंबरवर असते. मालिकेच्या या यशामुळे 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'लाही तिची दखल घेणे भाग पडले. 'गेली अनेक वर्षे आम्ही प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो आहोत. प्रेक्षकांनी आणि सब वाहिनीने माझ्या टीमवर ठेवलेला विश्वास लिम्का बुकमध्ये नाव आल्याने सार्थ ठरला आहे,' असे मालिकेचे निर्माते असितकुमार मोदी म्हणाले.

## ✍ ॲपल परिषदेत भारतीय अन्विता

ॲपल कंपनीने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय ॲप डेव्हलपर्सच्या परिषदेसाठी ऑस्ट्रेलियातील भारतीय वंशाच्या अन्विता विजय या नऊ वर्षांच्या बालिकेची निवड झाली आहे. सॅन फ्रान्सिस्को येथे होणाऱ्या ॲप परिषदेला उपस्थित राहणारी अन्विता ही सर्वांत लहान वयाची ॲप डेव्हलपर असेल. अन्विता वर्षभर यू ट्यूब आणि इंटरनेटवर 'फ्री कोडिंग ट्युटोरियल्सचा अभ्यास करत होती. नुकतेच रांगायला सुरवात केलेल्या बहिणीसाठी तिने ॲप विकसित केले आहे. बोलायचे कसे, प्राणी कसे ओळखायचे, याबाबत हे ॲप मदत करणार आहे. आयोनसाठी विकसित केलेल्या या ॲपद्वारा रंगांची ओळख कशी करतात, हेही लहान मुलांना शिकविण्यात येणार आहे. जागतिक डेव्हलपर परिषदेचा एक भाग म्हणून अन्विताला ॲपलची शिष्यवृत्ती मिळाली आहे.

या शिष्यवृत्तीअंतर्गत डेव्हलपरला ॲपलच्या विविध डिव्हाईसेससाठी ॲप विकसित करण्याची संधी प्राप्त होते.

## ✍ सैराट - ८५ कोटींची कमाई

नागराज मंजुळे नावाच्या मराठमोळ्या माणसाचे दिग्दर्शन असलेली तिसरी कलाकृती, रिंकू राजगुरू आणि आकाश ठोसर हे एरवी चित्रपटातील नायक-नायिकांच्या फुटपट्टीत कुठेही बसले नसते असे दोन नवोदित कलाकार, अजय - अतुलचे संगीत आणि प्रेमकथा एवढाच जामानिमा घेऊन आलेला 'सैराट' हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर सगळीकडे विचारांचे एकच सैराट वादळ सुरू झाले.

या चित्रपटाने समाजातील सगळ्याच स्तरांतून एक संवाद सुरू केला. मात्र त्याहीपेक्षा चित्रपटाची लांबी, गाणी, ग्रामीण संवाद आणि धक्कादायक शेवट असे सगळे मुद्दे पार करून जेव्हा या चित्रपटाने तिकीटबारीवर ८५ कोटी रुपयांची घसघशीत कमाई केली, तेव्हा हे 'सैराट' वादळ हिंदीतही घुसले. इतकी छोटी शिदोरी घेऊन आलेला मराठी चित्रपट हिंदीला टक्कर देईल, अशी कल्पना त्यांनीही केली नव्हती आणि खुद्द नागराजनेही केली नाही. मात्र हे अद्‌भुत घडले आहे.

## ✍ मायक्रोसॉफ्ट खरेदी करणार लिंक्ड इन

मायक्रोसॉफ्ट कंपनीने प्रोफेशनल नेटवर्किंग वेबसाइट 'लिंक्ड इन' खरेदी करण्याचा मानस व्यक्त केला. हा सौदा २६.२ अब्ज डॉलरला रोखीमध्ये होणार आहे. ही माहिती मायक्रोसॉफ्टच्या एका निवेदनात देण्यात आली आहे.

यामध्ये लिंक्ड-इनच्या एका शेअरसाठी मायक्रोसॉफ्ट १९६ डॉलर मोजणार आहे. 'लिंक्ड इन'ची अशा प्रकारे विक्री झाल्यानंतरही त्याची बाजारमुद्रा (ब्रँड), त्याची कार्यपद्धती आणि त्याचे स्वातंत्र्य अबाधित राहील, अशी ग्वाही 'मायक्रोसॉफ्ट'ने दिली आहे.

जगभरातील व्यावसायिकांना जोडून 'लिंक्ड इन'ने आपला वेगळा ठसा समाजमाध्यमांमध्ये उमटवला आहे. 'लिंक्ड इन'शी जोडले गेल्याने 'लिंक्ड इन'बरोबर मायक्रोसॉफ्ट ऑफिस ३६५ व डायनॅमिक्स यांची वाढजोमाने होऊ शकेल. यामुळे प्रत्येक व्यक्ती व संस्था यांचे सक्षमीकरण करता येईल, असा विश्वास 'मायक्रोसॉफ्ट'चे प्रमुख सत्य नाडेला यांनी व्यक्त केला आहे. 'लिंक्ड इन'ची मालकी मायक्रोसॉफ्टकडे गेल्यानंतरही येफ विनर हेच 'लिंक्ड इन'चे मुख्य कार्यकारी अधिकारी राहणार आहेत.

भारतात 'लिंक्ड इन'चे ६५० कर्मचारी असून, या नेटवर्किंग मंचाचा संशोधन व विकास विभाग बेंगळुरू येथे आहे. २००२ मध्ये 'लिंक्ड इन'ची सुरवात एका खोलीत हॉफमॅन यांनी केली होती. ५ मे २००३ रोजी 'लिंक्ड इन' अधिकृतरीत्या बाजारात दाखल झाले. सध्या 'लिंक्ड इन'चे ४३ कोटी ३० लाख यूजर आहेत. जगातील सगळ्यात मोठी सॉफ्टवेअर कंपनी मायक्रोसॉफ्ट आता २६.२ अब्ज डॉलर्स रुपयांना प्रोफेशनल नेटवर्किंग वेबसाइट लिंक्ड इन विकत घेणार आहे.

२री आवृत्ती

# बुद्धाची गोष्ट

लेखक - **वि.स.खांडेकर**

**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




विसाव्या शतकाचा मध्यकाळ हा सुधारणावादी आंदोलनानंतर आकाराला आलेल्या स्वतंत्र भारताचा काळ! या काळानं केवळ देशालाच नव्हे तर इथल्या माणसालाही स्वतंत्र केलं. विशेषत: स्त्री स्वतंत्र झाली तशी साहित्यात तिच्या अंतरमनातील घालमेल प्राधान्यानं चित्रित होऊ लागली. ‘बुद्धाची गोष्ट’मधील वि. स. खांडेकरांच्या या कथांतून स्त्री मनाचं विस्तारित आकाश, तिच्या अंतर्मनातील द्वंद्व, प्रलोभन प्रवाह, सांसारिक पाश, मातृत्वाचा ओलावा यांना साद घालत संवेदना हरवलेल्या समाजाची कहाणी सांगतो. गेल्या पंचवीसशे वर्षांत दुसरा बुद्ध न जन्मणे ही कशाची खूण असा प्रश्न करणाऱ्या या कथा त्यांच्या जन्मानंतरच्या गेल्या पासष्ट वर्षांनंतरही विचार म्हणून समकालिक वाटतात.

२०११ मध्ये स्काइप आणि२०१३ मध्ये नोकिया कंपनी ताब्यात घेणाऱ्या मायक्रोसॉफ्टने आत्तापर्यंत एक अब्ज डॉलर्सहून अधिक किमतीच्या आठ कंपन्या खरेदी केल्या आहेत; परंतु लिंक्ड इन ही आत्तापर्यंची सर्वांत मोठी कंपनी ठरणार आहे. सत्या नाडेला मायक्रोसॉफ्टचे सीईओ झाल्यानंतरचा हा सर्वांत मोठा आणि महत्त्वाचा व्यवहार मानला जात आहे.

'लिंक्ड इन'चे मुख्य कार्यकारी अधिकारी जेफ विनर आता सत्या नाडेला यांच्या नेतृत्वाखाली काम करतील.

स्थापनेनंतर केवळ तपपूर्ती केल्यानंतरच 'लिंक्ड इन'ला मिळालेली किंमत त्याचा 'भाव' वधारणारी ठरली आहे.

**२००३ -** रीड हॉफमन यांनी २००२ च्या अखेरीला सोशलनेट आणि पेपाल या कंपन्यांमधील जुन्या साथीदारांना नवीन कल्पना सुचवण्यासाठी नेमले. सहा महिन्यांनंतर 'लिंक्ड इन'लाँच. सुरवातीला प्रतिसाद अत्यल्प. दिवसाला जेमतेम २० साईनअप असायचे.

**२००४ -** ॲड्रेसबुक अपलोड करण्याच्या सुविधेनंतर २००३ च्या अखेरीला वाढीला वेग आला. छोट्या उद्योगांसाठी त्यांनी काही सुविधाही दिल्या.

**२००५ -** 'लिंक्ड इन'ने 'जॉब्ज अँड सबस्क्रिप्शन' ही बिझनेसलाइन केली. तीन वर्षांत कंपनीने चौथ्या ऑफिसमध्ये कारभार थाटला.

**२००६ -** पब्लिक प्रोफाइल सुविधा लाँच केली. कंपनीला फायदा झाला. 'रिकमंडेशन' आणि 'पिपल यू मे नो' ही कोअर फीचर्स कंपनीने लाँच केली.

**२००७ -** चार वर्षे सीईओ राहिल्यानंतर रीड बाजूला झाले आणि डॅन नेकडे सूत्रे दिली. ओमाहामध्ये कस्टमर सर्व्हिस सेंटर सुरू केले.

**२००८ -** लंडनमध्ये कंपनीचे कार्यालय सुरू, साइटचे स्पॅनिश आणि फ्रेंच व्हर्जन लाँच करून ग्लोबल झाले.

**२००९ -** जेफ विनरनी 'लिंक्ड इन'चे अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारली. 'लिंक्ड इन'चे ध्येयधोरण, व्यावसायिक व्यूहरचनात्मक धोरण यावर भर देत कारभारात स्पष्टता आणली.

**२०१० -** वर्षाच्या अखेरीला कंपनीचे ९ कोटी सदस्य आणि जगभरात दहा कार्यालये केली

**२०११ -** 'लिंक्ड इन'ने आपला आठवा वाढदिवस साजरा करताना न्यू यॉर्क शेअर बाजारात नोंद केली

**२०१२ -** प्रॉडक्ट इनोव्हेशन आणि ट्रान्सफॉर्मेशनसाठी मोठा वाव ठेवत

साइटची फेरबांधणी. सिम्प्लिफाय, ग्रो, एव्हरीडे या संकल्पनेवर कंपनीने भर दिला.

**२०१३ -** लिंक्डइन दहा वर्षांचे झाले. मेंबरची संख्या २२.५ कोटींवर गेली, सेकंदाला दोन सदस्य या वेगाने विस्तारत गेले.

**२०१४ -** 'लिंक्ड इन'चे दुसरे दशक डिजिटल इकॉनॉमीवर भर देणारे ठरले.

## ✍ मोबाईल वॉलेट

अन्न, वस्त्र, निवारा आणि मोबाईल हा नव्या पिढीचा मंत्र आहे. अनेकांसाठी मोबाईल हा जीव की प्राण बनला आहे. त्यामुळे जगभरातील मोबाईल वापरणाऱ्यांच्या संख्येत वेगाने वाढहोत आहे. हा वेग एवढा भन्नाट आहे, की २०२० पर्यंत जगभरातील मोबाईल वापरणाऱ्यांची संख्या साडेपाच अब्जांपर्यंत जाईल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. सध्या जगातील मोबाईल वापरणाऱ्यांची संख्या चार अब्ज ८० लाख एवढी प्रचंड आहे.

वाढते उत्पन्न, स्वस्त होत असलेले तंत्रज्ञान आणि आपल्या आवडीनिवडीनुसार सहजासहजी उपलब्ध होणारे मोबाईल फोन ही मोबाईलच्या वापरकर्त्यांच्या वाढीची महत्त्वाची कारणे आहेत. स्मार्टफोनची वाढती लोकप्रियता आणि सामान्यांच्या आवाक्यात आलेल्या त्याच्या किमती, यामुळे मोबाईलच्या माध्यमातून होणाऱ्या आर्थिक व्यवहारांचे प्रमाणही वेगाने वाढत आहे. हा निष्कर्ष ब्ल्यूओशन मार्केट इंटेलिजन्सने केलेल्या विस्तृत सर्वेक्षणात समोर आला आहे.

मोबाइलवरून होणाऱ्या व्यवहारांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढते आहे. जगभरात २०१५ मध्ये २६० अब्ज डॉलरचे व्यवहार मोबाईलच्या माध्यमातून झाले असून, २०२० पर्यंत हा आकडा ३१५५ अब्ज डॉलरपर्यंत पोचणार असल्याचा अंदाज आहे. मोबाईलच्या माध्यमातून झालेल्या एकूण व्यवहारांमध्ये मोबाईलवरून केल्या जाणाऱ्या पैसे हस्तांतराचा (मनी ट्रान्फर) वाटा ३० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. मनी ट्रान्स्फरपाठोपाठ क्रमांक आहे तो रिचार्ज ॲप, विविध प्रकारचे बिल पेमेंट आणि विविध सेवांसाठी दिल्या जाणाऱ्या रकमेचा.

## ✍ जमाना मोबाईल वॉलेटचा

स्मार्टफोनच्या जगभरातील वाढत्या वापरामुळे पारंपरिक खिसा-पाकिटाची

जागा हळूहळू मोबाईल वॉलेट घेत असताना दिसते आहे.

**स्मार्टफोनमुळे हे झाले सोपे..**

संवाद , खरेदी, बँकिंग , प्रवास , वाहतूक

**ई-कॉमर्समधील अडथळे**

पैसे हस्तांतराच्या चॅनेलची कमतरता

अतिशय कठोर धोरणे

माहितीचा अभाव

कमी प्रमाणात मिळणारी दलाली

हलक्या दर्जाची इंटरनेट कनेक्टिव्हिटी

**मोबाईल वॉलेटचे मार्केट**

पे-पल, पेटीएम, गुगल वॉलेट, ॲमेझॉन पेमेंट, स्क्वेअर कॅश

**डिजिटल वॉलेट**

मोबाईल आणि इंटरनेटच्या वाढत्या उपलब्धतेमुळे डिजिटल वॉलेटचा वापर भारतात मोठ्या वेगाने वाढतो आहे. भारतात पेटीएम सर्वांत लोकप्रिय असून, त्यापाठोपाठ मोबिक्विक, सिट्रस-पे, फ्री-चार्ज आदींचा क्रमांक लागतो. एकट्या पेटीएमवरून भारतात महिन्याला ७.५ कोटी डॉलरचे व्यवहार होतात, हे विशेष.

**वॉलेटचे भारतीय वापरकर्ते**

पेटीएम : १० कोटी

मोबिक्विक : १.७ कोटी

सिट्रस पे : १.५ कोटी

फ्रीचार्ज : १ कोटी

## ✍ महापुरुषांना रंगात बांधणे ही असहिष्णुता

“आपल्या समाजातील लोकांनी छत्रपती शिवाजी महाराजांना भगव्या रंगापुरते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना निळ्या रंगापुरते मर्यादित ठेवले आहे. या गोष्टीला असहिष्णुता का म्हणू नये,” असा सवाल डॉ. सदानंद मोरे यांनी विचारला.

लेखक-अभिनेते हृषीकेश जोशी लिखित ‘दुसरी बाजू’ या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. अभिनेत्री स्पृहा जोशी, ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर, लेखक राजन खान उपस्थित होते. डॉ. मोरे म्हणाले, “काही लोक

जनसमूहापुढे एक भूमिका घेतात, तर खासगीत वेगळी भूमिका घेतात. त्यामुळे ते दांभिक ठरतात. एक जबाबदार नागरिक म्हणून समाजात वावरण्याची कोणाचीच इच्छा दिसत नाही. त्यामुळे समाजाला वैचारिक उंची आणि खोली लाभत नाही. तंत्रज्ञान आणि प्रसारमाध्यमांच्या अतिवापरामुळे या गोष्टी अधिकच लांब जातात. निसर्गाने मानवाला रंग दिले. मानवाने त्यातील रंग निवडून पक्षांसाठी वापर केला. हृषीकेश जोशी यांनी लिहिलेल्या पुस्तकातून प्रत्येक गोष्टीच्या किंवा घटनेची दुसरी बाजू वाचायला मिळेल. हे पुस्तक विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षणासाठी उपयोगी पडेल.

स्पृहा म्हणाली, ''आमच्या पिढीतल्या व्यक्तींना अनेक प्रश्न पडतात. अशा वेळी नक्की कोणत्या व्यक्तीचा आदर्श घ्यावा, हाच मोठा प्रश्न आहे. त्यामुळे आमच्या पिढीतील काही जण विचित्र मानसिकतेत अडकले आहेत.'' कुवळेकर म्हणाले, ''लोकांनी दिग्गज आणि विचारवंत हे विशेषण अतिशय सामान्य केले आहे. त्यातला फरक त्यांना समजत नाही. त्यामुळेच त्यांनी टेकड्यांना हिमालय समजायला सुरुवात केली आहे. हृषीकेश जोशी यांनी लिहिलेले पुस्तक निकोप वैचारिक स्वातंत्र्याचा आनंद देणारे आहे.'' ''पुस्तके माणसाला जगणे शिकवतात. त्यामुळे लेखकांनी ती लिहिली पाहिजेत. पुस्तके चांगली की वाईट हे लोक ठरवतील,'' असे खान म्हणाले.

''मला जे लिहायचे आहे, ते मला मनमोकळेपणाने लिहिता आले पाहिजे. एक व्यक्ती म्हणून माझ्या मताकडे पाहण्याऐवजी नेहमी माझे आडनावच पाहण्यात येते. त्याच्या दुसऱ्या बाजूचा विचार आणि चर्चा होतच नाही. हे कुठेतरी थांबून वैचारिक चर्चा व्हावी, या उद्देशाने हे पुस्तक लिहिले,'' असे हृषीकेश जोशी यांनी सांगितले.

## ✍ तुम्ही प्रमाणपत्र द्या, सेन्सॉर करू नका

सेन्सॉर बोर्डाचे काम चित्रपटांना प्रमाणपत्र देण्याचे आहे; चित्रपट कापण्याचे नाही, अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष पहलाज निहलानी यांना फटकारले. 'उडता पंजाब' या हिंदी चित्रपटातून पंजाबचा उल्लेख वगळण्यासह ८९ कट्स सुचविल्यावरून सेन्सॉर बोर्ड आणि निहलानी वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. या प्रकरणी चित्रपट निर्माते अनुराग कश्यप यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली.

कायद्यामध्ये 'सेन्सॉर' हा शब्द नाही. चित्रपट सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी आवश्यक ते प्रमाणपत्र देण्याचे अधिकार तुमच्याकडे आहेत, असे मत न्यायालयाने व्यक्त केले. 'मल्टिप्लेक्समध्ये सिनेमा पाहणारी ही पिढी सुज्ञ आहे. कोणते चित्रपट पाहायचे, हे त्यांना ठरवू द्या,' असेही न्यायालयाने म्हटले आहे.

चित्रपटाच्या गीतांमध्ये वापरलेले शब्द अश्लील आहेत.

जमीन बंजर असा उल्लेख आहे; पण पंजाब सुपीक आहे.

एका कुत्र्याचे नाव जॅकी चॅन आहे ते आक्षेपार्ह आहे.

**निर्मात्याचे म्हणणे**

'या चित्रपटातून कोणत्याही राज्याची बदनामी करण्याचा हेतू नाही,' अशी तळटीप आम्ही टाकू.

सेन्सॉर बोर्डाने ज्या शब्दांना आक्षेप घेतला. त्याच शब्दांसह 'उडता पंजाब'च्या ट्रेलरला मात्र परवानगी दिली.

**न्यायालयाचे म्हणणे**

चित्रपट हे माध्यम आहे. त्याचा वापर कसा करायचा, याचे भान प्रेक्षकांनाच येईल.

अश्लील शब्दांमुळे चित्रपट यशस्वी होत नाही. त्यासाठी कन्टेंट लागतो.

## ✍ चित्रपटाचे रसग्रहण बहादूर यांनी शिकवले

चित्रपटाचे रसग्रहण कसे करावे, हे प्रा. सतीश बहादूर यांनी शिकवले. विद्यार्थ्यांच्या बाबतीत ते उदारमतवादी होते. कमालीचा लोकशाही दृष्टिकोन त्यांच्याकडे होता. त्यांनी स्वतःचे मत कधीच पुढे रेटले नाही. प्रत्येक विद्यार्थ्याला मूल्य जपू दिले. चांगला शिक्षक असाच असतो...'' अशा शब्दांत ज्येष्ठ दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली यांनी प्रा. बहादूर यांच्या आठवणींना उजाळा दिला. अक्षर वाङ्मयतर्फे प्रा. बहादूर यांच्यावर काढण्यात आलेल्या 'चित्रपटभाषा' या विशेषांकाचे प्रकाशन कासारवल्ली यांच्या हस्ते झाले. विशेषांकाच्या अतिथी संपादक डॉ. श्यामला वनारसे, कार्यकारी संपादक डॉ. अरुण प्रभुणे, चित्रपट अभ्यासक अनिल झणकर, आरती कारखानीस, अंकाचे संपादक डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, कार्यकारी संपादक डॉ. शिवाजीराव देशमुख, डॉ. विजय वारकड, डॉ.

१२वी आवृत्ती

# द मॅजिक ऑफ थिंकींग बिग

मूळ लेखक - **डेव्हिड जोसेफ श्वार्त्झ**

अनुवाद - **प्रशांत तळणीकर**

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




**विसाव्या उच्चीची ध्येयं आपल्यासमोर ठेवा...**
**आणि मग त्याहीपेक्षा अधिक साध्य करा!**

'द मॅजिक ऑफ थिंकींग बिग' हे पुस्तक वाचून जगभरातल्या लक्षावधी लोकांनी आपल्या जीवनात सुधारणा घडवून आणलेली आहे. प्रेरणा (motivation) या विषयावरचे एक आघाडीचे तज्ज्ञ म्हणून मान्यता असलेले डॉ. श्वार्त्झ, तुम्हाला अधिक चांगली विक्री करण्यासाठी, अधिक चांगलं व्यवस्थापन करण्यात, अधिक पैसा मिळवण्यात आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे अधिक समाधान आणि मन:शांती मिळवण्यामध्ये, या पुस्तकाद्वारे मदत करतात.

'द मॅजिक ऑफ थिंकींग बिग' या पुस्तकात तुम्हाला निव्वळ पोकळ आश्वासनं नाही, तर व्यवहार्य, प्रत्यक्ष करून पाहण्याजोग्या पद्धती सापडतात. यातल्या कल्पना आणि तंत्रं इतकी स्वतंत्र प्रज्ञेची आहेत, की त्या समजावून सांगण्याकरता लेखकाला एक संपूर्णपणे नवा शब्दसंग्रहच निर्माण करण्याची गरज पडलेली आहे. नोकरी वा उद्योग, वैवाहिक आणि कौटुंबिक जीवन आणि सामाजिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम या सर्वच बाबतीत भव्य प्रमाणात जगण्याचा एक सुनियोजित कार्यक्रमच डॉ. श्वार्त्झ आपल्यासमोर सादर करतात. आपल्या आसपासच्या इतर लोकांपेक्षा श्रेष्ठ ठरण्यासाठी तुमच्याजवळ अफाट बुद्धिमत्ता किंवा महान प्रतिभा असण्याची गरज नाही. गरज आहे ती यश मिळवून देणाऱ्या पद्धतीनं विचार आणि आचार करण्याची, हे ते सिद्ध करून दाखवतात. आणि हे कसं साध्य करायचं, याची गुपितं हे पुस्तक तुम्हाला पुरवतं!

दीपक चिद्दरवार व डॉ. महादेव वाळुंज उपस्थित होते. कासारवल्ली म्हणाले, ‘‘प्रा. बहादूर यांनी पाच दशके चित्रपट चळवळीसाठी काम केले. माझी आणि त्यांची भेट एफटीआयआयमध्ये झाली. चित्रपटाचे रसग्रहण कसे करावे, हे त्यांनी शिकवले; पण आपले मत लादले नाही. विद्यार्थ्यांनी चित्रपटांवर व्यक्त व्हावे असे त्यांना वाटे. ते प्रत्येकाला पाठिंबा देत. चित्रपटात हेच मत व्यक्त झाले आहे, असे ते कधी सांगायचे नाहीत. व्यक्त होण्यासाठी ते सतत पाठीशी असत. विद्यार्थ्यांच्या बाबतीत ते उदारमतवादी होते. कमालीचा लोकशाही दृष्टिकोन त्यांच्याकडे होता.’’

‘‘बहादूर यांनी विविध चित्रपटांवर विविध भाषांमध्ये लिहून ठेवले आहे. समाजाने चित्रपटांकडे वळावे यासाठी ते प्रयत्नशील होते,’’ असे डॉ. वनारसे यांनी सांगितले. श्रुती तांबे यांनी सूत्रसंचालन केले.

## ✍ कॉलेज टू कॉर्पोरेट व्हाया इंटरव्यूह

कॉलेजमधून बाहेर पडताना सर्वप्रथम विचार येतो, तो नोकरीचा. नोकरी मिळवणे आणि टिकवणे ही सोपी गोष्ट नाही. या पुस्तकात विनोद बिडवाईक यांनी मुलाखतीविषयी मार्गदर्शन केले आहे. मुलाखतीची तयारी कशी करावी, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव कसा पाडावा, मुलाखत घेणाऱ्याला प्रभावित कसे करावे आदी मुद्द्यांवर पुस्तकात चर्चा केली आहे. विशेष म्हणजे मुलाखतीत जे प्रश्न विचारतात, त्या प्रश्नांच्या अनुषंगाने विचार केला आहे. प्रसंगावधानता कशी बाळगावी, निर्णय कसा घ्यावा, आपल्या बोलण्यावर नियंत्रण कसे ठेवावे, याचे मार्गदर्शन ते करतात. या तयारीमुळे कॉर्पोरेट क्षेत्रात टिकून कसे राहावे, याचे शिक्षणही आपोआप मिळते.

## ✍ रंजक पद्धतीने संकल्पना शिकण्यासाठी वापर

मोबाईल, टॅब आणि लॅपटॉप म्हणजे मुलांना आनंददायी वाटणाऱ्या गोष्टी, याच इलेक्ट्रॉनिक उपकरणाद्वारा मुलांना उपयुक्त गोष्टी शिकता याव्यात, या कल्पनेतून बाजारात विविध वयोगटांतील शालेय मुलांसाठी शैक्षणिक उपकरणे तयार होत आहेत.

बेरीज, वजाबाकी, चढता-उतरता क्रम यांसारख्या गणितातील संकल्पना एकाच वेळी साध्य करण्यासाठी हे उपकरण फायदेशीर आहे. गुणाकार,

भागाकार, कालमापन, तीन अंकी संख्या या सर्व संकल्पना या एकाच उपकरणातून मुलांना हसत-खेळत आत्मसात करता येतील.

पहिली ते चौथीपर्यंतच्या मुलांना हे उपकरण स्वतः हाताळायला मिळत असल्याने गणितातील नीरसता कमी होऊन मुलांना आनंददायी शिक्षण घेता येते. नव्या उपकरणांमुळे मुलांना अभ्यास करताना आनंद वाटेल. या उपकरणांमध्ये गणित, विज्ञान, भाषा, व्याकरण, त्रिमिती, डिझाईन आदी विषयांचा समावेश आहे. इलेक्ट्रॉनिक नोटबुक, पेन, टॅबलेट, लॅपटॉप अशा नानाविध उपकरणांचा समावेश असणाऱ्या या शैक्षणिक उपकरणांची किंमत ३५० ते २००० रुपये आहे.

## ✍ गुरुत्वीय लहरींवर पुन्हा शिक्कामोर्तब

शतकातील सर्वांत मोठा वैज्ञानिक शोध मानल्या गेलेल्या गुरुत्वीय लहरींच्या अस्तित्वावर शिक्कामोर्तब करणारा आणखी एक पुरावा मिळाल्याचे अमेरिकेतील लेझर इंटरफेरोमीटर ग्रॅव्हिटेशनल वेव्ह ऑब्झर्वेटरीने (लायगो) पत्रकार परिषदेत जाहीर केले.

'लायगो'च्या जुळ्या वेधशाळांमध्ये २६ डिसेंबर २०१५ रोजी गुरुत्वीय लहरींची आणखी एक नोंद झाली असून, सूर्यापेक्षा चौदा आणि आठ पटींनी मोठ्या कृष्णविवरांच्या धडकेतून या लहरी निघाल्याचा निष्कर्ष 'लायगो'ने काढला आहे. १४ सप्टेंबर २०१५ च्या पहिल्या शोधापाठोपाठ तीन महिन्यांतच गुरुत्वीय लहरींची दुसरी नोंद झाल्यामुळे गुरुत्वीय लहरींच्या विज्ञानावर शिक्कामोर्तब झाल्याची प्रतिक्रिया लायगोच्या अधिकाऱ्यांनी दिली. गुरुत्वीय लहरींच्या दुसऱ्या शोधातही भारतीय शास्त्रज्ञांनी महत्त्वाची भूमिका निभावली आहे.

आइनस्टाइनने गुरुत्वीय लहरींच्या अस्तित्वाविषयी शंभर वर्षांपूर्वी भाकीत वर्तवले होते. लायगो या गुरुत्वीय लहरींच्या निरीक्षणासाठी अमेरिकेत उभारण्यात आलेल्या जुळ्या वेधशाळांनी १४ सप्टेंबर २०१५ रोजी प्रथमच या लहरींचे अस्तित्व प्रत्यक्ष निरीक्षणातून सिद्ध केले होते. सप्टेंबर २०१५ ते जानेवारी २०१६ या कालावधीत लायगोमधून करण्यात आलेल्या निरीक्षणांचे विश्लेषण नुकतेच पूर्ण झाले. या विश्लेषणातून २६ डिसेंबर रोजी गुरुत्वीय लहरींची आणखी एक नोंद झाल्याचे शास्त्रज्ञांच्या निदर्शनास आले. पुण्याच्या इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर अ‍ॅस्ट्रोनॉमी अँड अ‍ॅस्ट्रोफिजिक्समधील (आयुका)

शास्त्रज्ञांनी या शोधात महत्त्वाची भूमिका निभावली.

आयुकातील शास्त्रज्ञ डॉ. सुकांता बोस म्हणाले, ‘‘गुरुत्वीय लहरींचा पहिला शोध करणारा पुरावा आम्हाला मिळाला आहे. २६ डिसेंबर २०१५ रोजी अमेरिकेतील लिविंगस्टन आणि हॅंडफर्ड येथे असणाऱ्या लायगोच्या दोन जुळ्या वेधशाळांमध्ये एक सेकंद कालावधीची कंपने नोंदली गेली. या कंपनांचे विश्लेषण केल्यावर या गुरुत्वीय लहरीच असल्याचे स्पष्ट झाले. १.४ अब्ज वर्षांपूर्वी सूर्याच्या वस्तुमानापेक्षा चौदा आणि आठ पटींनी मोठ्या वस्तुमानाच्या कृष्णविवरांची टक्कर होऊन त्यातून सूर्यापेक्षा २१ पटींनी अधिक वस्तुमानाचे कृष्णविवर तयार झाले. या धडकेतून सूर्याच्या वस्तुमानाऐवजी ऊर्जा उत्सर्जित झाली. या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या गुरुत्वीय लहरींची नोंद वेधशाळांमध्ये झाली.’’

‘‘याआधी नोंदल्या गेलेल्या गुरुत्वीय लहरींसाठी कारणीभूत ठरलेली कृष्णविवरे सूर्यापेक्षा ३६ आणि २९ पटींनी अधिक वस्तुमानाची होती,’’ असेही ते म्हणाले.

## ✍ गेट्स यांचा गरिबीवर ‘कोंबडी’चा उतारा

मायक्रोसॉफ्ट कंपनीचे प्रमुख व जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती असलेल्या बिल गेट्स आफ्रिका खंडातील गरिबी हटविण्यासाठी कोंबडीदानाचा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे.

गेट्स फाउंडेशनने या कामासाठी जगभरातील गरिबांना पशुदान करणाऱ्या हायफर इंटरनॅशनल कंपनीशी भागीदारी केलेली आहे. गेट्स यांच्या म्हणण्यानुसार एक शेतकरी पाच कोंबड्या पाळून वर्षाला १ हजार डॉलर म्हणजेच ६६,७२० रुपयांपेक्षा जास्त कमाई करू शकतो.

गेट्स यांच्या म्हणण्यानुसार, पाच महिन्यांत ३० लाखांपेक्षा जास्त मुले, अर्भके कुपोषणाचे बळी जातात. अंड्यातील पोषक तत्त्वांमुळे या मुलांच्या कुपोषणाच्या समस्येवर खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

‘मी त्या लाचार गरीब शेतकऱ्यांच्या जागी मला बघतो, तेव्हा मला फक्त कोंबडीपालनाचा व्यवसाय डोळ्यांसमोर दिसतो. या परिस्थितीत कोंबडीपालनासारखा दुसरा जालीम उपाय कोणताही नाही,’ असे बिल गेट्स यांचे मत आहे.

**१०वी आवृत्ती**

# संवादिनी




लेखक - **वपु काळे**

**किंमत : ८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

“.... रात्री अकरा वाजता घरी जातो. उर्मिला जागी असली तर म्हणते, ‘किती दमता तुम्ही !’ – बस्स !
सगळा दिवस सार्थकी लागतो.
ह्या एका वाक्याची माणसाला केवढी भूक असते, हे सांगता येणार नाही. दहा माणसांचा स्वयंपाक करून दमलेल्या बायकोलाही एवढं एकच वाक्य हवं असतं आणि कामावरून परतलेल्या नवऱ्याला पण !”
“....समस्या आपली आणि त्याचं उत्तर मात्र इतरत्र, असं घडत नाही. उत्तराची मागची बाजू म्हणजेच समस्या.
आपण फक्त बघण्याची दिशा बदलायची.”
— लोकप्रिय कथाकार व. पु. काळे यांची प्रत्येक कथा म्हणजे एक आगळाच अनुभव असतो. याचं कारण, मध्यमवर्गीय सर्वसामान्य माणसांची सुखदु:खं, हर्ष, खेद, आनंद, धावपळीच्या जीवनातला त्यांचा संघर्ष, नोकरदारांच्या नानाविध समस्या, कुचंबणा, लैंगिक जीवनातले ताणतणाव, मान-अपमान – जे एरवी कुणाच्या लक्षातही येत नाही, ते सगळं वपुंच्या मनाला भिडतं. वपु ते अलगद टिपतात आणि आपल्या सहज मिस्कील शैलीत वाचकांच्या मनात उतरवतात!
त्यांची जीवनदृष्टीच इतकी आशावादी, प्रसन्न आणि मिस्कील आहे, की त्या रंगांत रंगूनच त्यांच्या अनुभवाचा प्रत्येक क्षण चैतन्यानं खुलतो !
‘संवादिनी’मध्ये तर संवादांतून कथा फुलवणारी त्यांची शैली वाचकाला थक्क करते !—

## ✍ माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध संधी

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील करिअरच्या संधी मिळण्यासाठी 'इंजिनिअरिंग' केले पाहिजे, असा लोकांचा समज आहे. इंजिनिअरिंगव्यतिरिक्त इतर विद्यार्थ्यांनादेखील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात खूप संधी आहेत. 'नेटवर्क सिस्टिम' या क्षेत्रामध्ये नेटवर्क सेटप, मेंटेनन्स, ॲक्सेस व सिक्युरिटी इत्यादी पातळ्यांवर काम केले जाते.

या क्षेत्रात करिअर करण्यासाठी कोणत्याही विषयाच्या पदवीबरोबरच हार्डवेअर व नेटवर्किंगमधील विविध अभ्यासक्रम जसे, सिस्को सर्टिफाइड नेटवर्क असोसिएट, सिस्को सर्टिफाइड नेटवर्क प्रोफेशनल, सिसको सर्टिफाइड इंटरनेटवर्क एक्स्पर्ट, मायक्रोसॉफ्ट सर्टिफाइड सिस्टिम इंजिनिअर, असे काही पर्याय उपलब्ध आहेत. एखाद्या विद्यार्थ्याने १०+२ किंवा पदवी स्तरावर गणित किंवा संख्याशास्त्र विषय घेऊन अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, तर अशा विद्यार्थ्यांना पदवीनंतर एमसीए अभ्यासक्रमात प्रवेश घेता येतो.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. उदा. एमबीए-फायनान्स झालेला विद्यार्थी सॅप, ओरॅकल प्रणालीतील फायनान्स मोड्यूलचा अभ्यासक्रम पूर्ण करून आपले करिअर करू शकतो. तसेच विविध एंटरप्राइज रिसोर्स प्लॅनिंग (ईआरपी), कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेंट, तसेच एआरपी ॲप्लिकेशन, मायक्रोसॉफ्ट डायनामिक्स, पीपलसॉफ्ट, सीबेल, ओपनब्राव्हो यांचे शिक्षण पूर्ण करून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात फंक्शनल कन्सल्टंट, बिझनेस ॲनालिस्ट, इम्प्लिमेंटेशन इंजिनिअर म्हणून करिअर करू शकतात. हे अभ्यासक्रम आपल्या पारंपरिक पदवी अभ्यासक्रमाबरोबर करता येतात. परंतु करिअर करण्यासाठी पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे आहे.

या क्षेत्रामध्ये मोबाईल ॲप, ॲनालिटिक, क्लाउड कंप्युटिंग, सोशल मीडिया हेही अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तसेच सोशल मीडिया मार्केटिंग, सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन, कंटेंट रायटर, ई-कॉमर्स या क्षेत्रामध्ये संधी उपलब्ध आहेत.

## ✍ 'वैर म्हणजे स्त्रीवाद नाही'

'स्त्रीवादाचा पुरस्कार करणे म्हणे पुरुषांशी वैर घेणे नाही, तर स्त्रिया ज्या वेळी

आपले सर्वस्व पणाला लावून प्रेम करतात, त्या वेळी स्त्रियांनी स्वत्व टिकवून ठेवणे म्हणजे स्त्रीवाद होय,' असे मत ज्येष्ठ कवयित्री डॉ. अश्विनी धोंगडे यांनी व्यक्त केले.

रंगतसंगत प्रतिष्ठान व श्यामची आई फाउंडेशन यांच्या वतीने प्रसिद्ध कवयित्री हेमा लेले यांना काव्य जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

धोंगडे म्हणाल्या, ''समाजामध्ये स्त्रीवादाबद्दल अनेक गैरसमज आहेत. पुरुषांना वाईट मानून सतत त्यांच्यावर टीका करणे हा स्त्रीवाद नाही, तर स्त्रीला माणसासारखे जगता यावे, हा स्त्रीवाद आहे. त्याची नेमकी संकल्पना हेमा लेले यांच्या कवितांमधून स्पष्ट केली आहे. आयुष्याचा क्षण अन् क्षण जो जगतो आणि त्याचा अनुभव घेतो तोच माणूस चांगली कविता करू शकतो.''

हेमा लेले म्हणाल्या,''कविता हे माध्यम आयुष्यभर माझे मार्गदर्शक ठरले आहे. कविता हेच माझे अध्यात्म मानले त्यामुळे मला इतर अध्यात्मिक मार्गांची कधी गरज भासली नाही. कवितेने नात्यातली, सहवासातली आणि विरहातली गंमत शिकवली. माझ्या कवितेला कुठलेही लेबल कधी लावले नाही. अनेक साहित्य प्रकारांमध्ये लेखन केले, मात्र कवितेचे सुख दुसऱ्या कशात नाही.'' लेले यांनी या वेळी ''सांग माझ्या मना'' ही कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

'कविता करणे ही एक तपश्चर्या आहे. मनातल्या भावना, संवेदना, आणि विचार एकमेकांमध्ये विरघळून जावे लागतात तेव्हा कविता तयार होते, ''असे डॉ. नीलिमा गुंडी यांनी सांगितले. ''हेमा लेले या कवितेच्या प्रतिमा जाणणाऱ्या आधुनिक स्त्री आहेत,'' असे गौरवाद्गार गुंडी यांनी व्यक्त केले. प्रभा सोनावणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## ✍ शतकापूर्वीचे एक हजार ग्रंथ मराठी विकिपीडियावर

शतकाहून अधिक काळ ग्रंथांची जपणूक करणाऱ्या महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेतील शंभर वर्षांपूर्वीपासूनचे एक हजार ग्रंथ लवकरच मराठी विकिपीडियावर उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे एक कळ दाबताच जगभरातील अभ्यासक, संशोधक आणि वाचकांना जुन्या कालखंडातील दुर्मीळ आणि मौलिक माहिती उपलब्ध होणार असून, ग्रंथांमुळे विकिपीडियाचे दालनही समृद्ध होणार आहे.

काही संदर्भ, माहिती हवी असल्यास ‘गुगल’ किंवा विकिपीडिया हे माहितीचा स्रोत म्हणून युवा पिढीचे हक्काचे स्थान झाले आहे. विकिपीडियावरील माहिती ही एक तर इंग्रजीमध्ये आणि तीही काही प्रमाणात तुटपुंजी किंवा बिनचूक असेल याची शाश्वती देता येत नाही. प्रत्येक वेळी हवी ती माहिती विश्वासार्हतेसह मिळेलच याचा भरवसा देता येत नाही. महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेच्या पुढाकारामुळे ही अडचण दूर होणार आहे.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था व बेंगळुरू येथील सेंटर फॉर इंटरनेट अँड सोसायटी (सीआयएस) या संस्थांमध्ये नुकताच एक करार झाला आहे. ग्रंथोत्तेजक संस्थेतर्फे अध्यक्ष डॉ. प्र. ल. गावडे आणि सहकार्यप्रवाह डॉ. अविनाश चाफेकर यांनी, तर सीआयएसचे तन्वीर हसन आणि अभिनव गारुळे यांनी करारावर स्वाक्षरी केली आहे.

ग्रंथोत्तेजक संस्थेकडे सव्वाशे वर्षांपूर्वीची कागदपत्रे, पेशवे रोजनिशी (पेशवे दफ्तर) आणि सुमारे सात हजारांहून अधिक ग्रंथसंपदा आहे. संस्थेतील कागदपत्रे व ग्रंथ जीर्ण झाल्यामुळे ते प्रत्यक्ष हाताळण्यापेक्षा इंटरनेटवर पाहणे आणि वाचणे अधिक सुलभ होईल, या उद्देशातून या ग्रंथांचे डिजिटायझेशन करण्याचे काम महाराष्ट्र ज्ञान महामंडळातर्फे (एमकेसीएल) करण्यात येत आहे. हे काम पूर्ण होताच ग्रंथ मराठी विकिपीडियावर उपलब्ध करून देण्याचे काम सीआयएस करणार आहे.

छत्रपती शाहू महाराज गादीवर आले, तेव्हापासून खडकीच्या लढाईपर्यंत म्हणजे सुमारे ११० वर्षांचा मराठेशाहीचा इतिहास पेशवे दफ्तरी पाहावयास मिळतो. या काळात महाराष्ट्राची सामाजिक-आर्थिक आणि धार्मिक स्थिती, लोकांची करमणुकीची साधने, राज्यव्यवस्था, शेतसाऱ्याची आकारणी, आणि वसुली, मिठावरील कराविषयी माहिती, सरकार कर्ज, दिवाणी आणि फौजदारी खटले, पोलीस, टपाल, टांकसाळ, धर्मादाय, रस्ते, औषधोपचार या सुविधांची व्यवस्था कशी होती, याविषयी विश्वसनीय माहिती पेशवे दफ्तरी मिळते.

## ✍ हस्तलिखितांच्या प्रकल्पाची पूर्ती हेच ध्येय

‘भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेमध्ये काम करताना लागलेली शिस्त आयुष्यभर उपयोगी पडली. गेल्या काही वर्षांपासून मराठी हस्तलिखिताची सूची या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची पूर्ती हेच जीवनाचे ध्येय समजून काम करीत आहे. हा

प्रकल्प पूर्णत्वास जाईपर्यंत उत्तम प्रकृती लाभावी हीच इच्छा आहे,' अशी भावना मराठी हस्तलिखितांचे अभ्यासक वा. ल. मंजूळ यांनी व्यक्त केली.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे माजी ग्रंथपाल वा. ल. मंजूळ यांनी (१७ जून) रोजी वयाची ८१ वर्षे पूर्ण केली. हे औचित्य साधून पाणिनी प्रतिष्ठान, प्रसाद प्रकाशन आणि प्राज्ञ पाठशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने मंजूळ यांचा सहस्रचंद्रदर्शनपूर्ती सोहळा आयोजित करण्यात आला होता. डेक्कन कॉलेजचे अध्यक्ष डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते मंजूळ यांचा सत्कार करण्यात आला.

मंजूळ म्हणाले, ''भांडारकर संस्थेतून निवृत्त झाल्यानंतर मी मराठी हस्तलिखितांची सूची करण्याचा प्रकल्प हाती घेतला होता. त्याचा पहिला खंड यापूर्वीच प्रकाशित झाला असून, त्यामध्ये १८०० हस्तलिखितांचा समावेश आहे. आता दुसऱ्या खंडाचे काम पूर्ण झाले असून, त्यामध्ये १६०० हस्तलिखितांची माहिती देण्यात आली आहे. हा खंड प्रकाशनाच्या वाटेवर आहे. आता तिसऱ्या खंडाचे काम सुरू असून त्यामध्ये नागपूर, मुंबईसह राज्यभरातील संस्थांकडे असलेल्या हस्तलिखितांची माहिती उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'पंढरपुरातील मठ-फड-दिंड्यांचा इतिहास' या विषयावर अभ्यास करण्यासाठी सहा वर्षांपूर्वी मला ५० हजार रुपयांचे अनुदान दिले होते. त्याअंतर्गत पंढरपूरला अनेकदा भेट देऊन सर्व मठ-फड आणि दिंड्यांची माहिती घेतली, हा अभ्यास प्रकल्प लवकरच यूजीसीला सादर करणार आहे. वारकरी संप्रदायाविषयी नावीन्यपूर्ण माहिती मिळाली असून, तिचाही अंतर्भाव या अभ्यास प्रकल्पनामध्ये केला आहे.

## ✍ गदिमांचे स्मारक

गेल्या आठ-नऊ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ग. दि. माडगूळकर यांच्या स्मारक उभारणीच्या हालचालींना वेग आला असून, २०१८-१९ या गदिमांच्या जन्मशताब्दीपूर्वी स्मारक उभारण्याचा संकल्प महापालिकेने सोडला आहे.

गदिमांचे चिरंजीव श्रीधर माडगूळकर यांच्या निवासस्थानी उपमहापौर मुकारी अलगुडे यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात अनौपचारिक बैठक झाली. त्यामध्ये तीन वर्षांत स्मारकाची उभारणी करण्याचे आश्वासन उपमहापौरांनी दिले. या वेळी उपायुक्त सतीश कुलकर्णी, माजी आमदार उल्हास पवार, गदिमांचे नातू सौमित्र

माडगूळकर उपस्थित होते.

या स्मारकासाठी वाकडेवाडी येथे मुठा नदीच्या पात्रातील जागा निश्चित करण्यात आली आहे. यासाठीची प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करून हा प्रकल्प मार्गी लावावा, असे निवेदन उपमहापौरांनी दीड महिन्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. 'वाकडेवाडीतील जागा नदीच्या पात्राच्या पूरनियंत्रण रेषेमध्ये येते का, याची पाहणी करण्यात येणार आहे,'' अशी माहिती अलगुडे यांनी दिली.

महापालिकेने निवडलेल्या जागेला वाकडेवाडीतील सोसायट्यांनी विरोध केला आहे. पालिकेने निवडलेली माधवराव शिंदे उद्यान परिसरातील जागा अत्यंत चुकीची असून, इतक्या कमी जागेत स्मारक शक्य नाही; त्यामुळे अन्य जागांचा विचार करावा, अशी मागणी या सोसायट्यांमधील रहिवाशांनी केली आहे.

## ✍ इंटरनेट वापरातील बदलता ट्रेंड

**या अहवालातील काही महत्त्वाचे मुद्दे**

मोबाईलवरील इंटरनेट कनेक्शनचा स्पीड हा सध्यापेक्षा तीन पटींनी अधिक वेगवान म्हणजे ३ एमबीपीएसपर्यंत पोहचण्याची अपेक्षा आहे. व्हिडिओचा दर्जा म्हणजे 'रेझोल्युशन', बँडविड्थ व प्रोसेसिंग स्पीड याची क्षमता व दर्जा वाढणार असल्यामुळे इंटरनेटचा एकूण वापर २०२० पर्यंत सहा पटींनी वाढणार आहे.

सिस्कोचे व्यवस्थापकीय संचालक (सर्व्हिस प्रोव्हायडर विभाग) संजय कौल म्हणाले, ''भारत डिजिटल क्रांतीच्या पथावर आहे. इंटरनेटवरून होणारी डेटाची देवाणघेवाण (इंटरनेट ट्रॅफिक) २००५ मध्ये जेवढी होता, त्याच्या २४९ पटींनी अधिक २०२० मध्ये असेल. खासगी डिव्हाइसेसचा वापर, मशिन टु मशिन कनेक्शनचा वापर वाढणार असल्यामुळे सकारात्मक परिणाम आरोग्य, कृषी, वाहतूक, उत्पादन यासह महत्त्वाच्या उद्योग क्षेत्रांवर होईल.''

आयपी ट्रॅफिक : २०१५-२०२०

● सर्व्हिस प्रोव्हायडरच्या सिंगल नेटवर्कमधून डेटाची होणारी देवाणघेवाण (आयपी ट्रॅफिक) ४ पटींनी वाढणार.

● प्रति माणशी असलेले आयपी ट्रॅफिकचे प्रमाण १ जीबीपासून ४ जीबीपर्यंत वाढणार.

● आयपी ट्रॅफिकमधील डेटाचे प्रमाण ४४ वरून १८४ पिटाबाइट्स

**८वी आवृत्ती**

# नेपोलियन बोनापार्ट दिग्विजय




लेखक - **भा. द. खेर / राजेन्द्र खेर**

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘इटलीचीच काय; पण कोणतीही मोहीम हाती घ्यायची धडाडी असलेला असा एकच जनरल फ्रान्समध्ये आहे.
त्याची उंची असेना का कमी; पण त्याच्या महत्त्वाकांक्षेची झेप विशाल आहे. त्याचा स्वत:चा नेम नसेना का चांगला; परंतु चढाई नेमकी कुठे आणि केव्हा करायची, हे तो उत्तम जाणतो.
त्याची घोड्यावरची मांड कशी का असेना; पण संपूर्ण सैन्यावर त्याची विलक्षण पकड आहे. तो ओढीना का सारखा तपकीर; परंतु शत्रूच्या मात्र तो नाकी दम आणू शकतो!...
...नेपोलियन बोनापार्टसारखा जनरल आपल्या हाती आहे, हे मी आपलं भाग्य समजतो. या माणसाच्या हाती आपण सैन्याची सूत्रं देऊ या. अन्यथा उद्या तो ती स्वत:हून आपल्या हातांत घेतल्याशिवाय राहणार नाही!’
प्रेम-विरह, फितुरी-हेरगिरी,
डाव-प्रतिडाव, युद्ध-शांती अशा विविध अंगांनी नटलेली नेपोलियन बोनापार्ट याच्या जीवनावरील पिता-पुत्रांनी संयुक्तरीत्या लिहिलेली अद्‌भुतरम्य, रससिद्ध कादंबरी : दिग्विजय!

प्रति दिवस (१ पिटाबाईट =१० लाख जीबी)

- दर महिन्याचे आयपी ट्रॅफिक प्रमाण १.४ वरून ५.६ एक्साबाइट्सपर्यंत वाढणार (१ एक्साबाइट = १हजार पिटाबाइट्स)

**व्हिडिओ**

- आयपी व्हिडिओ ट्रॅफिक पाच पटींनी वाढणार
- प्रति महिना आयपी व्हिडिओ ट्रॅफिक ८५० पिटाबाइट्सवरून ४.५ एक्साबाइट्सपर्यंत वाढणार.
- ग्राहक (कन्झुमर) आयपी व्हिडिओ ट्रॅफिकचे प्रमाण ६८ टक्क्यांवरून ८३ टक्क्यांपर्यंत वाढणार.
- व्यावसायिक (बिझनेस) आयपी व्हिडिओ ट्रॅफिकचे प्रमाण ३७ टक्क्यांवरून ६६ टक्क्यांपर्यंत वाढणार.
- इंटरनेट व्हिडिओ ट्रॅफिक ६ पटींनी वाढणार.
- प्रति महिना इंटरनेट व्हिडिओचे प्रमाण ४७९ पिटाबाइट्सवरून ३.१ एक्साबाइट्सपर्यंत वाढणार.
- एकूण इंटरनेट ट्रॅफिकपैकी 'व्हिडिओ ट्रॅफिक' ५१ टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत वाढणार.
- एकूण इंटरनेट व्हिडिओ ट्रॅफिकपैकी 'अल्ट्रा एचडी' चे प्रमाण ०.९ टक्क्यांवरून ७.७ टक्क्यांपर्यंत वाढणार.

**फिक्स्ड / वाय-फाय**

- एकूण आयपी ट्रॅफिकपैकी फिक्स्ड/वाय-फाय ३८ टक्क्यांवरून ३४ टक्क्यांपर्यंत कमी होणार.
- एकूण इंटरनेट ट्रॅफिकपैकी फिक्सड/वाय-फाय ५२.६ टक्क्यांवरून ४४.६ टक्क्यांपर्यंत कमी होणार.
- एकूण आयपी ट्रॅफिकपैकी फिक्स्ड/वायर्ड-फाय ५१ टक्क्यांवरून ३६ टक्क्यांपर्यंत कमी होणार.
- एकूण इंटरनेट ट्रॅफिकपैकी फिक्स्ड/वायर्ड३२टक्क्यांवरून १४ टक्क्यांपर्यंत कमी होणार.
- एकूण आयपी ट्रॅफिकपैकी मोबाईल ११ टक्क्यांवरून ३१ टक्क्यांपर्यंत वाढणार.
- एकूण इंटरनेट ट्रॅफिकपैकी मोबाईल १५.७ टक्क्यांवरून ४१.७

टक्क्यांपर्यंत वाढणार.

**भारतातील इंटरनेटचा वापर २०१५-२०२०**

- इंटरनेटवरून होणारी 'डेटा'ची एकूण देवाण-घेवाण (इंटरनेट ट्रॅफिक) ४.४ पटींनी वाढणार (३० पिटाबाइट्स वरून १३५ पिटाबाइट्स प्रतिदिवस होणार.)
- सर्वाधिक मागणीच्या वेळेतील 'इंटरनेट ट्रॅफिक' ७.२ पटींनी वाढणार.
- प्रतिमाणशी असलेले इंटरनेट ट्रॅफिकचे प्रमाण १ जीबीपासून ३ जीबीपर्यंत वाढणार.

## ✍ बालसाहित्यातून मूल्यशिक्षण

राज्यातील शालेय मुलांना बालसाहित्यातून मूल्यशिक्षणाची शिकवण मिळावी, या उद्देशाने मराठी, इंग्रजी, कन्नड आणि गुजराती या भाषांमधील बालसाहित्य एकत्र करून पुस्तकांच्या रूपात आणण्याचा बृहद प्रकल्प राज्य सरकार आणि साहित्य संस्कृती मंडळामार्फत साकारत आहे. मराठी, इंग्रजी आणि इतर भारतीय भाषांमधील बालसाहित्यातील १५० हून अधिक पुस्तके या प्रकल्पाच्या माध्यमातून छोट्या वाचकांच्या भेटीला येणार आहेत. अक्षर बालवाङ्मय संहिताशोध व बृहदसंदर्भ ग्रंथ असे नाव या प्रकल्पाला देण्यात आले आहे.

बालसाहित्याच्या अभ्यासक डॉ. मंगला वरखेडे या प्रकल्पावर काम करत असून, गेल्या शंभर वर्षांत मराठी बालसाहित्यात लेखन केलेल्या निवडक लेखकांची ५० पुस्तके, जगभरात प्रकाशित झालेल्या इंग्रजी बालसाहित्यातील निवडक ५० पुस्तके आणि गुजराती, कन्नड, बंगाली, तेलगू अशा भारतीय भाषांमधील ५० पुस्तके अशा एकूण १५० पुस्तकांची पुनःनिर्मिती करून ती शाळकरी मुलांसाठी उपलब्ध केली जाणार आहेत.

मराठी बालसाहित्यासाठी प्रकल्पाच्या सुरुवातीच्या टप्प्यात एक वर्णनात्मक सूची तयार करण्यात येणार असून, त्यानंतर त्यातील साहित्याची निवड करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये बालसाहित्याची पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशी विभागणी करण्यात येणार आहे.

भारतीय बालसाहित्य आणि त्या अंतर्गत येणारे पंचकथा, विदुरनीती, बालरामायण, जातककथा अशा साहित्यप्रकारांचा अभ्यास पौर्वात्य प्रकारात आणि

परिकथा आणि व्यक्तींची चरित्रे यांचा अभ्यास पाश्चिमात्य साहित्य प्रकारात करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे मराठीबरोबरच इतर भाषांमधील साहित्य लहान मुलांना वाचायला मिळणार असून, तेथील संस्कृतीची ओळख प्रकल्पाच्या माध्यमातून होणार आहे. गेल्या दोन शतकांमध्ये अनेक साहित्यिकांनी बालसाहित्यात दर्जेदार लेखन केले आहे.

बालसाहित्यातील विविध प्रकार शाळकरी मुलांपर्यंत पोहोचावेत, यासाठी हा प्रकल्प साकारण्यात येणार आहे. शासनामार्फत प्रकल्पाद्वारा तयार केलेली पुस्तके, राज्यातील अधिकाधिक शाळांनी संग्रहित करावीत, असा प्रयत्न साहित्य संस्कृती महामंडळाकडून करण्यात येणार आहे.

बाबा भांड, अध्यक्ष
साहित्य संस्कृती मंडळ

## ✍ ट्विटर ट्विटर एव्हरीवेअर

२१ मार्च २०१६ रोजी ट्विटरने आपले पाहिले दशक पूर्ण केले. या दहा वर्षांत ट्विरचा वापर करणाऱ्यांची संख्या पन्नास कोटींच्या घरात गेली.

२१ मार्च २००६ रोजी ट्विटर या संकल्पनेचा वापर सुरू झाला आणि संवाद (कम्युनिकेशन) क्षेत्रात जनसामान्यांना परस्परसंपर्क साधणे फारच सोपे सुटसुटीत झाले. ट्विटरने जलद प्रतिक्रिया देण्याचा नवा डिजिटल पर्याय दिला. ई-मेल, ब्लॉग वगैरे पर्याय ट्विटरच्या आधीपासूनच संगणकावर उपलब्ध आहेत. ट्विटरचे वैशिष्टय म्हणजे, कुठलाही निरोप अगदी थोडक्यात, १४० अक्षरांत देणे. त्यांची लाबंण न लावणे, घाईत, उभ्या उभ्या आपली प्रतिक्रिया देणे. ट्विटरची संकल्पना जॅक डॉरसे या संगणक तज्ज्ञाला सुचली. ट्विटरचा तो एक संस्थापक. लांबलचक ई-मेल, गुगल, विकिपीडिया संगणक वापरकर्त्यांना सोयीस्कर होत्याच; परंतु ट्विटरद्वारे अगदी थोडक्या शब्दांत मित्रांशी संपर्क साधून त्यांना एखाद्या प्रश्नाबद्दल किंवा विषयाबद्दल माहिती देणे, यासाठी संक्षिप्त ट्विटर अधिक सोयीस्कर ठरेल असे लक्षात आले. इतर ॲप्सपेक्षा ट्विटरच्या माध्यमातून एखादी ताजी घटना किंवा बातमी फारच अल्प काळात, अक्षरशः क्षणार्धात जगाच्या कानाकोपऱ्यात पोचवण्याचा ट्विटरचा वेग अधिक जलद आहे. दहशतवादी हल्ला, एखाद्या राज्यकर्त्याची हत्या, एखादा विमान अपघात, एखादी नवी कल्पना, नवा शोध यावर ट्विट करण्यात आणि क्षणकालात

त्याबद्दल सर्वांना माहिती देण्यात ट्विटचा चिवचिवाट फारच कार्यक्षम असतो, हे सर्व जण मान्य करतात.

फोटो ट्विट करण्यातील गंमत अधिक वाढविण्यासाठी ट्विटरने सोमवारी नवे स्टिकर आणले आहे. ट्विटरवरील फोटोंना अधिक सजीव करण्यासाठी यूजर्स ही स्टिकर वापरू शकतात.

ट्विटरवर प्रत्यक्ष संवाद साधत असताना हे स्टिकर्स वापरता येतील. त्यासाठी ट्विटरने अक्षरशः शेकडो पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. त्यात ॲक्सेसरीज,ईमोजी आणि प्रॉप्सचा समावेश आहे. तुम्ही सध्या काय करत आहात किंवा तुमच्या भावना काय आहेत, एखाद्या सत्कार्याला तुमचा पाठिंबा आहे किंवा नुसती धमाल म्हणूनही तुम्ही हे स्टिकर ट्विटमध्ये टाकू शकता.

## ✍ विश्वकोशातील माहिती मराठी विकिपीडियावरही!

कोणत्याही विषयाची माहिती हवी असल्यास आपण 'सर्च इंजिन'वर शोधू लागतो; पण अनेकदा मराठीत शोधताना फारशी माहिती मिळत नाही. या पार्श्वभूमीवर लवकरच विश्वकोशातील माहिती सामाजिक दृष्टिकोन ठेवून उघड केली जाणार आहे. स्वामित्व हक्कापासून (कॉपीराइट) ती मुक्त केली आहे. त्यामुळे आता मराठी विकिपीडियावर विश्वकोशाची संकलित माहिती आपण वाचू शकणार आहोत.

विश्वकोश मंडळाने अनेक वर्षांपासून विश्वकोशाचे तब्बल २० खंड तयार केले आहेत. विविध ज्ञानशाखांप्रमाणेच अनेक विषयांच्या नोंदी त्यात आहेत. अनेकदा सरकारशी संलग्न संस्थेमार्फत चांगली कामे होतात; मात्र, त्यांचा पुरेसा प्रसार होत नाही. अनेकदा त्यात कॉपीराइट हाच अडथळा असतो. त्यामुळे ही माहिती व्यापक स्वरूपात पसरत नाही. मात्र, आता सरकारने व्यापक दृष्टिकोनातून विचार केला असून, याचा फायदा मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य मराठीप्रेमींना होणार आहे. काही महिन्यांत सामाजिक दृष्टिकोनातून काम करणाऱ्या आणि मराठीचा प्रचार करणाऱ्या संस्थांना ही माहिती महत्त्वाची ठरेल. त्यामुळे मराठीचा अधिकाधिक प्रसार होण्यास निश्चितच मदत होईल.

## ✍ ब्रेक्झिटनंतर इंग्रजीचीही एक्झिट?

युरोपीय महासंघातून बाहेर पडण्याची प्रक्रिया सुरू करावी, यासाठी युरोपीय

महासंघ ब्रिटिश पंतप्रधान डेव्हिड कॅमेरॉन यांच्यावर दबाव वाढवत आहे; मात्र आपण ही प्रक्रिया सुरू करणार नाही, असे कॅमेरॉन यांनी स्पष्ट केले आहे.

पंतप्रधान कॅमेरॉन यांनी ब्रिटनने महासंघात राहावे, यासाठी प्रयत्न केले होते. मात्र, त्यात अपयशी ठरल्यानंतर त्यांनी तीन महिन्यांनंतर राजीनामा देण्याची घोषणा केली होती. ब्रिटनला युरोपीय महासंघातून बाहेर पडण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी लागणार आहे. मात्र, 'महासंघाच्या करारातील कलम ५० ची प्रक्रिया मी सुरू करणार नाही,' असे कॅमेरॉन यांनी ब्रिटिश संसदेत सांगितले आहे.

'महासंघाशी कसे संबंध ठेवायचे, ते आधी आपल्याला निश्चित करावे लागेल. त्यानंतरच ही प्रक्रिया सुरू करता येईल. ते काम मी नव्हे, तर पुढील पंतप्रधानांनी करायचे आहे,' असे कॅमरॉन यांनी स्पष्ट केले. मात्र, त्यांचा उत्तराधिकारी सप्टेंबरपूर्वी निवडला जाण्याची शक्यता नाही.

ब्रिटनने महासंघातून बाहेर पडण्याच्या बाजूने कौल दिल्यानंतर जगभरातील शेअर बाजारात पडझड झाली. स्टँडर्ड अँड पूर्सने ब्रिटनचे पतमानांकन कमी केले आहे. बर्लिनमध्ये सोमवारी जर्मनीच्या चॅन्सेलर अँजेला मर्केल, फ्रान्सचे अध्यक्ष फ्रान्स्वा ओलाँद आणि इटलीचे पंतप्रधान मॅट्टिओ रेन्झी यांची बैठक झाली. महासंघातून बाहेर पडण्यासाठी लंडननेच पुढाकार घ्यायचा आहे, असे या तिन्हा बड्या देशांनी स्पष्ट केले.

युरोपीय महासंघामधून ईयू ब्रिटन बाहेर पडल्यानंतर इंग्रजी ही युरोपीय महासंघाची अधिकृत भाषा राहणार नसल्याची शक्यता आहे, अशी माहिती एका ज्येष्ठ सदस्याने दिली. जगात इंग्रजी ही दुसऱ्या क्रमाकांची भाषा असून, युरोपीय महासंघामधील प्रमुख अधिकृत भाषा आहे.

इंग्रजी भाषेचा त्याग करणे हा अव्यवहार्य निर्णय असला, तरी युरोपवरील ब्रिटनचा प्रभाव कमी करण्यासाठी प्रतिकात्मरीत्या हा निर्णय घेतला जाऊ शकतो. युरोपीय महासंघातील प्रत्येक सदस्य देशाला एका भाषेला नामांकन देण्याचा अधिकार आहे. इंग्रजी ही युरोपातील सर्वाधिक बोलली जाणारी भाषा असली तरी, फक्त ब्रिटनने ब्रेसल्समध्ये इंग्रजीची निवड केली आहे. आयर्लंडने गेलिक, तर माल्टाने मल्टिस भाषेची निवड केली आहे.

'ब्रिटनने नामांकन केल्यामुळे इंग्रजी ही आमची अधिकृत भाषा आहे; मात्र, आमच्यात ब्रिटन नसल्यावर इंग्रजीही राहणार नाही,' असे युरोपीय संसदेच्या घटनात्मक व्यवहार समितीच्या अध्यक्ष दानुता हबनर यांनी सांगितले. 'इंग्रजी ही युरोपीय महासंघाची अधिकृत भाषा राहिली नाही, तरी कामकाजाची भाषा म्हणून

राहण्याची शक्यता आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले. अधिकृत भाषा स्वीकारण्यासाठी सर्व सदस्य देशांचा करार आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. देशांना अधिकृत भाषा म्हणून एकापेक्षा अधिक भाषांची निवड करण्यासाठी नियमात बदल होऊ शकतो, असेही त्या म्हणाल्या.

युरोपीय महासंघातील संस्थांमध्ये १९९० पर्यंत फ्रेंच ही प्रभावी भाषा होती. स्वीडन, फिनलंड आणि ऑस्ट्रेलिया यांचा युनियनमध्ये समावेश झाल्यानंतर भाषिक समतोल साधला गेला. मध्य आणि पूर्व युरोपीय देशांनी इंग्रजी ही त्यांची दुसरी भाषा स्वीकारल्यानंतर इंग्रजीचा प्रभाव वाढला.

युरोपीय महासंघाची कागदपत्रे आणि कायदेशीर मजकूर सर्व २४ अधिकृत भाषांमध्ये भाषांतरित केला जातो. युरोपीय महासंघाच्या पेटंटसाठी अर्ज करण्यासाठीच्या तीन भाषांपैकी इंग्रजी एक आहे.

## ✍ डिजिटल सिंगल मार्केट

युरोपमधील देशांमध्ये डिजिटल पुस्तकांची विक्री सहजपणे शक्य व्हावी यासाठी युरोपीय कमिशनने डिजिटल 'सिंगल मार्केट'ची कल्पना राबवण्याचे ठरवले आहे.

ई-बुक्स आणि मागणीप्रमाणे टीव्ही सेवा निर्वेधपणे युरोपमधील देशांमध्ये उपलब्ध होण्याच्या मार्गातील अडथळे दूर केले जातील. देशादेशातील कॉपीराइट कायद्यात त्यानुसार बदल व तरतुदी करण्यात येतील.

## ✍ मलाला कोट्यधीश

पाकिस्तानमधील मलाला ही शाळकरी मुलगी तालिबानी दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात दैवयोगाने वाचली. ज्या हिमतीने तिने दहशतवादाशी मुकाबला केला, त्या हिमतीने जगभर मलाला युसुफजाई एकदम प्रसिद्धीच्या झोतात आली. तिला शांततेचे 'नोबेल प्राइस' देण्यात आले. 'संडे टाईम्स' चा पत्रकार ख्रिस्तोफर लॅम्ब याने तिच्याशी चर्चा करून तिचे आत्मकथन लिहून प्रसिद्ध केले. त्याच्या २ कोटी प्रती विकल्या गेल्या. त्याची वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतरे झाली. पाकिस्तानमधून तिने बाहेर पडण्याचे ठरवून इंग्लंडमध्ये आश्रय घेतला. लंडनमधील शाळेत प्रवेश मिळवला. आता तिला जगाच्या कानाकोपऱ्यातून व्याख्यानांची आमंत्रणे मिळत आहेत. पुस्तकाची रॉयल्टी आणि

व्याख्यानांची निमंत्रणे यांतून ती आता कोट्यधीश झाली आहे. तिची संपत्ती २२ लाख पौंड असून, त्याची गुंतवणूक करण्यासाठी एक स्वतंत्र संस्था काढण्यात आली आहे. 'नीत्सन बुक' रिसर्चच्या अनुमानावरून इंग्लंडमध्ये या आत्मकथेच्या २ लाख ८७ हजार प्रती विकल्या गेल्या.

## ✍ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५व्या जयंतीनिमित्त

भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५वी जयंती सर्व भारतभर नुकतीच साजरी झाली. नॅशनल बुक ट्रस्ट (NBT) च्या वतीनंही अहमदाबाद, गुजरात आणि ओडिशाच्या भद्रक इथं निरनिराळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

भद्रक (ओडिशा) च्या साहित्य संस्कृती परिषदेनं १४ एप्रिल २०१६ रोजी भद्रकच्या (DRDA) कॉन्फरन्स हॉलमध्ये, 'भारताच्या विविध भाषांबद्दल डॉ. आंबेडकरांचे विचार' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित केलं होतं. त्याच वेळी NBT नं प्रकाशित केलेल्या 'स्वामी विवेकानंद, – युवाशक्तिरा – चिरंतन प्रेरणा' या उडिया भाषेतल्या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं. रवींद्रकुमार नायक हे या पुस्तकाचे लेखक.

उद्घाटन करताना प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ डॉ. देवप्रसन्न पटनाईक म्हणाले, ''भारताची राज्यघटना तयार करण्यामध्ये डॉ. आंबेडकरांचं योगदान फार मोठं आहे. मातृभाषेचा वापर करण्यावर त्यांचा मोठा कटाक्ष होता. डॉ. पटनाईकांच्या मतानुसार ओरिसात मश्रूमसारख्या वेगानं वाढणाऱ्या इंग्रजी माध्यमातल्या शाळेमुळे मातृभाषेकडे दुर्लक्ष होत आहे. एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण विद्यापीठाची ओरिसाला गरज असल्याचं मत त्यांनी आग्रहानं मांडलं. भुवनेश्वरच्या आंबेडकर स्टडी सेंटरचे, तसंच वाणी विहारच्या उत्कल विद्यापीठाचे डायरेक्टर प्रो. वसंतकुमार मलिक म्हणाले, ''भारतातल्या जातिभेदावर आपलं प्रखर मत मांडणारे डॉ. आंबेडकर स्वतः भारतीय संस्कृतीबद्दल प्रचंड आदर बाळगणारे होते.''

भारतातलं भाषावैविध्य तसंच 'एक प्रांत - एक भाषा' ही त्यांची संकल्पना यावरही मलिक यांनी आपले विचार मांडले.

प्रो. ब्रजमोहन मिश्रा यांनी सभेला उद्देषून भाषण करताना डॉ. आंबेडकर आणि स्वामी विवेकानंद या भारतातल्या दोन महान व्यक्तिमत्त्वांबद्दल आपले

तुलनात्मक विचार मांडले. जातिसमानता, तसंच न्याय या बाबतीत या दोन्ही महान व्यक्तींनी आयुष्यभर अथक प्रयत्न केले.

डॉ. आंबेडकरांनी सामाजिक प्रश्नांबाबत नेमकेपणानं दृष्टिकोन ठेवला तर स्वामी विवेकानंदांनी आध्यात्मिक दृष्टी ठेवून सामाजिक कार्याचा विचार केला. ओडिशाचे प्रसिद्ध विज्ञानविषयक लेखन करणारे प्रो. डॉ. नित्यानंद स्वैन यांनी अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. आंबेडकरांचा विविध भाषांबद्दलचा दृष्टिकोन मांडला. सामाजिक सुसंवादासाठी तसंच राष्ट्रीय एकात्मतेसाठी भाषेचं किती महत्त्व आहे हे आंबेडकरांनी वारंवार सांगितलेलं आहे.

साहित्यसंस्कृती परिषदेचे अध्यक्ष डॉ. दुर्योधन दास यांनी, उडिया भाषेतल्या साहित्याचा प्रसार करण्यामध्ये नॅशनल बुक ट्रस्ट (NBT) नं केलेल्या विशेष प्रयत्नांची प्रशंसा केली. श्री. अशोक मोहंतींनी आभार मानले. NBT चे उडिया भाषेतले संपादक डॉ. प्रमोद सार यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

अहमदाबाद : गुजरात

१३ एप्रिल २०१६ रोजी अहमदाबादच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम (NIMCJ) तर्फे डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक तत्त्वांबद्दल एक चर्चासत्र आयोजित करण्यात आलं होतं.

या चर्चासत्राचे प्रमुख पाहुणे होते प्रसिद्ध लेखक श्री. किशोर मकवाना. ते म्हणाले, ''शिक्षण, आत्मसन्मान आणि नैतिक अधिष्ठान' ही तीन वैशिष्ट्यं डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात होती. या तिन्ही वैशिष्ट्यांसह अपार कष्ट करून त्यांनी देशासाठी आयुष्य वेचलं.''

NBT चे चेअरमन श्री. बलदेवभाई शर्मा यांनीही आंबेडकरांच्या आयुष्याविषयी आणि त्या काळाविषयी आपले विचार मांडले,

''देशातल्या दलितांसाठी तसंच गरिबांसाठी त्यांचं कार्य महत्त्वाचं होतं आणि त्यासाठी देशानं त्यांचा नेहमीच सन्मान केला. शिक्षित मनुष्यानं जर का दलितांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले नाहीत, तर त्यांचं शिक्षण फुकट आहे, असं ते म्हणत.''

डायरेक्टर डॉ. शिरीष काशीकर, NIMCJ चे फॅकल्टी मेंबर श्री. कौशल उपाध्याय यांनीही आपले विचार व्यक्त केले. NBT च्या गुजराती भागाचे संपादक श्री. भाग्येंद्रभाई पटेल यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता.

## ✍ बॉलेग्राचे ५३ वं बालसाहित्य प्रदर्शन

इटलीच्या पिझ्झा डेला कॉस्टिट्यूझाईन इथं ५३वं बॉलेग्ना बालसाहित्य प्रदर्शन ४ ते ७ एप्रिल २०१६ पर्यंत भरवलं गेलं होतं.

विशेष अतिथी म्हणून जर्मनीला आमंत्रित केलं होतं. फ्रँकफूर्टचं पुस्तक दालन तसंच गॉथे इन्स्टिट्यूट इटालिया यांनी एक प्रदर्शन आयोजित केलं होतं 'लूक' (Look)! जर्मनीतल्या समकालीन चित्रकारांची चित्रं प्रदर्शनात मांडली होती. प्रसिद्ध बालसाहित्यलेखक रोअल्ड दाह (Roald Dahl) यांची जन्मशताब्दी या प्रदर्शनात साजरी केली गेली. प्रदर्शनाची थीम होती 'कल्पनेची ऊर्जा!' जवळजवळ सत्तर देशांतल्या बाराशे जणांनी या प्रदर्शनात भाग घेतला होता.

पुस्तक प्रदर्शनातल्या चित्रांच्या प्रदर्शनाचा ५०वा वर्धापन दिन साजरा झाला. चित्रप्रदर्शनातल्या चित्रांची निवड सर्जी रुझीअर, तारो मिऊरा आणि नाथन फॉक्स या ज्यूरींनाकेली होती. प्रदर्शनात शिवाय डिजिटल मिडिया हॉल, ट्रान्सलेटर्स सेंटर आणि ऑथर्स कॅफेचं आयोजन केलं होतं. या वर्षी चायनीज बालसाहित्यकार काओ वेंगाझुआन तसंच जर्मन चित्रकार रोटाऊट सुझान बर्गर या दोघांना 'हॅन्स ख्रिश्चन अँडरसन प्राईज' देण्यात आलं. संपूर्ण कार्यक्रमात आणखीनही काही नवीन नवीन बक्षिसं प्रदान करण्यात आली. बालकथेच्या इटलीतून प्रकाशित झालेल्या पुस्तकांना पहिलं 'स्ट्रेगो प्राईज' सुझान तमारो (साल्य बार्ट) आणि चिआरा कार्मिनाती यांना देण्यात आलं. आठवं चित्रकलेतलं आंतरराष्ट्रीय प्राईज मेक्सिकन चित्रकार ड्युऑन पालोमिनो यांना दिलं गेलं.

बालसाहित्यातलं उत्कृष्ट प्रकाशकांचं वार्षिक बक्षीस सहा भागांतल्या प्रकाशकांना देण्यात आलं. ते सहा प्रकाशक– युरोपमधलं अँडरसन प्रकाशन, कॅनडाचं (उत्तर अमेरिका) ग्राऊंडवूड बुक्स, व्हेनेझुएलाच Edicines अेकारे, न्यूझीलंडचं बुक आयलंड, युनायटेड अरब अमिरातचं कालीमत आणि दक्षिण आफ्रिकेचं बंबल बुक्स!

बोलोग्ना चिल्ड्रन्स बुक फेअर हे जगातलं बालसाहित्याच्या संदर्भातलं तसंच मल्टिमीडिया उद्योगातलं महत्त्वाचं प्रदर्शन आहे. या प्रदर्शनात जगातले असंख्य लेखक, चित्रकार, साहित्यविषयक कार्यकर्ते, वितरक, प्रिंटर्स, पुस्तक विक्रेते आणि लायब्ररीयन्स सहभागी झाले होते.

भारतातर्फे 'नॅशनल बुक ट्रस्ट' यांनी प्रतिनिधित्व केले. विविध प्रकाशकांची हिंदी आणि इंग्रजीतली जवळजवळ २०० पुस्तकं असलेला स्टॉल तिथं लावलेला होता. भारतातर्फे जवळजवळ पंधरा प्रकाशकांनी या प्रदर्शनात भाग घेतला होता. NBTचे प्रॉडक्शन ऑफिसर श्री. नरेंद्रकुमार यांनी प्रतिनिधित्व केलं.

**– प्रज्ञा ओक**

❖

**२री आवृत्ती**

# जे. आर. डी. टाटा यांची पत्रं




संपादन- **अरविंद माम्ब्रो**

अनुवाद - **सुप्रिया वकील**

**किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

सध्याच्या वेगवान जगात ‘ई-मेल्स’, ‘सेलफोन्स’ अशांसारख्या तत्पर संपर्कमाध्यमामुळे जग जवळ आणले आहे; पण एकेकाळी मुख्यत्वे ‘पत्रं’ या माध्यमातून संपर्क साधला जात असे. पत्रांतून कामांच्या तपशिलांखेरीज आपुलकी व जवळीकही साधली जात असे. शिवाय ही ‘पत्रं’ त्या एका विशिष्ट कालखंडाचा दस्तऐवज बनून इतिहास अभ्यासकांना व भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरत असत. ‘पत्रं’ हा कायमस्वरूपी माहितीस्रोत असतो. या पुस्तकातली सुमारे ३०० पत्रं इतिहासाचा अनमोल ठेवा आहेत. ‘जे.आर.डी. टाटा’ या विलक्षण व्यक्तिमत्त्वाच्या चिकित्सक लेखणीतून उतरलेली ही विविध विषयांना स्पर्श करणारी ‘पत्रं’ तत्कालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रांचं दर्शन घडवतात आणि विसाव्या शतकातील एका महान, बहुआयामी व्यक्तित्वाचं अनेकपदरी अंतरंग उलगडून दाखवतात.

# पुरस्कार



### ❋ राजीव तांबे, मनस्विनी लता रवींद्र यांचा गौरव

साहित्य अकादमीतर्फे २०१६ साठीचे युवा आणि बाल साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातून लहान मुलांच्या साहित्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल राजीव तांबे यांना आणि युवा साहित्य पुरस्कार श्रेणींमध्ये मनस्विनी  लता रवींद्र यांना 'ब्लॉगच्या आरशापल्याड' या लघुकथा संग्रहासाठी पुरस्कार जाहीर झाले आहेत.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष प्राध्यापक विश्वनाथ प्रसाद तिवारी यांनी इंफाळमध्ये झालेल्या बैठकीत या पुरस्कारांची घोषणा केली.

हा पुरस्कार मी ज्या लहान मुलांसाठी लिहितो, त्यांचा आहे. मी हा पुरस्कार त्यांना अर्पण करतो. बालसाहित्याच्या क्षेत्रात अधिकाधिक प्रयोग व्हायला हवेत. विज्ञानकथा, भयकथा, सागरी कथा अशा विविध साहित्यप्रकारांची बाल साहित्यालाही गरज आहे, असे राजीव तांबे म्हणाले.

बाल साहित्य पुरस्कारातील मराठी श्रेणीसाठी अनंत भावे, मधु मंगेश कर्णिक, प्रतिमा इंगोले यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. बाल पुरस्कार श्रेणीअंतर्गत एकूण २१ लेखकांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. १४ नोव्हेंबर रोजी बालदिनी होणाऱ्या विशेष कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. १ जानेवारी २०१० ते ३१ डिसेंबर २०१४ या कालावधीमध्ये लिहिण्यात आलेली पुस्तके किंवा बाल साहित्यामधील योगदान या निकषांवर ही निवड करण्यात आली आहे. युवा पुरस्कारासाठी इंद्रजीत भालेराव, प्रज्ञा पवार, प्रा. विकास खोले यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. देशभरातील २४ पुस्तकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात

आली आहे. ५० हजार रुपये आणि सन्मानचिन, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

राजीव तांबे गेली अनेक वर्षे मुलांसाठी काम करत आहेत. मुलांसाठी विविध पुस्तके, हसत खेळत शिक्षणाच्या पद्धतींचा विकास केला आहे. युनिसेफ आणि इतर काही सामाजिक संस्थांसोबत काम करताना त्यांनी राज्यातील दुर्गम आणि आदिवासी भागातील अनेक शाळांना भेट दिली आहे. त्या माध्यमातून विविध स्तरांतील विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेत त्यांनी शिकवण्याची पद्धत विकसित केली आहे. राजीव तांबे यांनी आतापर्यंत सुमारे ७० पुस्तके लिहिली आहेत. यामध्ये कविता, कथा, एकपात्री प्रयोग, नाटक, विज्ञानकथा अशा विविध प्रकारांची निर्मिती केली आहे. त्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी अशा तीनही भाषांमध्ये लेखन केले आहे. त्यांनी लिहिलेली पुस्तके गुजराती आणि कानडीमध्ये भाषांतरित झाली आहेत.

लेखिका मनस्विनी लता रवींद्र यांनी पहिले नाटक वयाच्या २१ व्या वर्षी लिहिले. 'सिगारेट'या नाटकापासून त्यांचा लेखनाचा प्रवास गेली दहा वर्षे अबाधित सुरू आहे. त्याशिवाय त्यांनी अनेक मालिकांसाठी संवादलेखन केले आहे. 'एका लग्नाची दुसरी गोष्ट' आणि 'दिल दोस्ती दुनियादारी' या त्यांच्या विशेष गाजलेल्या मालिका आहेत. साहित्य अकादमी पुरस्काराप्राप्त 'ब्लॉगच्या आरशापल्याड' या लघुकथासंग्रहाला महाराष्ट्र सरकारचाही पुरस्कार मिळाला आहे.

### ✻ काळे, डेग्वेकर यांना जीवनगौरव पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या मध्यवर्ती शाखेतर्फे ज्येष्ठ अभिनेत्री  आशा काळे व ज्येष्ठ अभिनेते चंदू डेग्वेकर यांना जीवनगौरव पुरस्कार १४ जून रोजी नाट्यसंमेलनाध्यक्ष गंगाराम गवाणकर यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण नाट्य संकुल, मुंबई येथे देण्यात आले.

बंडा जोशी (एकपात्री) देवदूत पाठक (बालरंगभूमी), प्रकाश साळवे (लोकनाट्य), अविनाश चिटणीस (कामगार रंगभूमी), प्रकाश एदलाबादकर (निवेदन), आनंद मोघे (बॅकस्टेज), श्रीकांत पवार (व्यवस्थापन), राज काझी (समीक्षा लेखन) यांच्यासह कृष्णा जाधव, सुनील परमार, सुशांत घोडके यांना या वेळी पुरस्कार देण्यात आले.

चाळीसगावची ‘रंगगंध’ ही संस्था सर्वोत्कृष्ट प्रायोगिक संस्था ठरली आहे.

वार्षिक पुरस्कारासाठी यंदापासून नामांकन पद्धतीचा अवलंब करून व्यावसायिक मराठी रंगभूमीवरील गतवर्षीच्या कामगिरीसाठी विविध १७ विभागांमध्ये नामांकने जाहीर करण्यात आली.

‘दोन स्पेशल’, ‘परफेक्ट मिसमॅच’ व ‘सेल्फी’ यांमध्ये सर्वोत्कृष्ट नाटक पुरस्कारासाठी चुरस, तर सर्वोत्कृष्ट संगीत नाटक पुरस्कारासाठी ‘संशयकल्लोळ’ व ‘बावन्नखणी’ यामध्ये स्पर्धा होती. रत्नाकर मतकरी, हिमांशू स्मार्त व शिल्पा नवलकरांमधून या वर्षीचा सर्वोत्कृष्ट नाटककार निवडला गेला. दिग्दर्शनाच्या पुरस्कारासाठी क्षितिज पटवर्धन, अजित भुरे व विजय केंकरे यांच्यात लढत होती.

अभिनेता व अभिनेत्रींच्या शर्यतीत जितेंद्र जोशी, उमेश कामत, किरण माने गिरिजा ओक, अमृता सुभाष व मधुरा वेलणकर हे कलाकार आणि शेखर खोसला, इंदिरा, तिन्ही सांज ही नाटके वेगवेगळ्या विभागांत स्पर्धेत होती.

### ✻ राजन लाखे यांना पुरस्कार

एल्गार सामाजिक परिषद, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे शहर शाखा व भीमथडी कविकट्टा यांच्यातर्फे राजन लाखे यांना एल्गार बाप गौरव पुरस्कार पार्वतीबाई रामलिंग गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कॉ. रामलिंग बाबुराव गायकवाड यांच्या स्मरणार्थ आयोजित राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत अशोक गायकवाड यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सुजित कदम, हरिदास कोष्टी, नीलेश म्हसाये, मनीष मालुसरे, सविता करंजकर, शोभा दळवी, प्रज्ञा आपेगावकर, नीता नहार, तनुजा ढेरे, चैत्राली जोगळेकर, ज्योती शिंदे, विश्वनाथ साठे, रोषण पिलेवान यांना गौरविण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून रूपाली अवचरे, पीतांबर लोहार व विजय सातपुते यांनी काम पाहिले. महेंद्रकुमार गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. डी. बी. शिंदे यांनी स्वागत केले. विजय सातपुते यांनी सूत्रसंचालन केले. सागर काकडे यांनी आभार मानले.

❖

**४थी आवृत्ती**

# चिकन सूप फॉर द टीनएज सोल

जीवन, प्रेम व शिकणं याविषयीच्या कथा




मूळ लेखक - **जॅक कॅनफिल्ड** / **मार्क व्हिक्टर हॅन्सन** / **किम्बर्ली किर्बर्जर**

अनुवाद - **सुप्रिया वकील**

**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

आयुष्याच्या प्रवासात किशोरवय हा नाजूक टप्पा असतो. एकीकडे जाणिवा उमलत असतात; डोळ्यांत नवी स्वप्नं हसत असतात. त्याच वेळी व्यवहारी जगाचं करकरीत वास्तव समोर येतं. अशा वेळी मनाला सावरणाऱ्या, धीर देणाऱ्या, आधाराचा खंबीर हात देणाऱ्या, उमेद चेतवणाऱ्या, दुखावलेल्या मनावर हळुवार फुंकर घालणाऱ्या, रोवून ठाम उभं राहायला शिकवणाऱ्या या कथा... मनाशी अगदी हळुवार संवाद साधत निखळ मैत्रीची अनुभूती देतात. गालांवर हसू फुलवता फुलवता नकळत डोळ्यांच्या कडा ओल्या करतात.

# पुस्तक परिचय

## चिकन सूप फॉर द मदर्स सोल

भाग २

## मातांची हृदयं मोकळं करणाऱ्या आणि त्यांची चेतना जागविणाऱ्या कथा

*'चिकनसूप फॉर द मदर्स सोल' या पहिल्या पुस्तकाला वाचकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला आणि वाचकांच्या मागणीनुसार या दुसऱ्या भागाची निर्मिती करावी लागली.*

*मातेची ममता, आईचं प्रेम हे या जीवसृष्टीतील चिरंतन मूल्य आहे. आईच्या ममतेची आणि आईची तुलना अगदी कशाशीच, कोणाशीच होऊ शकत नाही, अशा आशयाची एक आफ्रिकन म्हण आहे.*

*या भागातील कथा मातेचं प्रेम, धैर्य, तिच्यातील शहाणपण यांवर प्रकाश टाकतात. काही कथांतून मातांचंही उद्‌बोधन केलं आहे.*

*आईच्या प्रेमातील विलक्षण ताकद मुलाच्या येऊ घातलेल्या मृत्यूवरही मात करते – मग ते पोटचे मूल असो वा दत्तक घेतलेलं – हे वाचून आपण थक्क होतो.*

*आईची आयुष्यातील भूमिका इतकी महत्त्वाची की ती नवी आयुष्यं घडवत असते. म्हणूनच मुलांच्या जडणघडणीमध्ये मुलांवर केवळ पैसा नाही, तर मुलांसाठी तुमचा वेळ देणं महत्त्वाचं आहे. तुमच्या मुलांना तुम्ही सर्वांत मोठी वंशपरंपरा कोणती देता, तर आनंदी आठवणी.*

*आई-मुलांमधील भावबंधाची जाणीव मुलांना तेव्हा होते, जेव्हा तुम्ही तुमची मुलं वाढविता, हे जीवनातील एक लहान पण अत्यंत महत्त्वाचं तत्त्व छोट्या-छोट्या कथांमधून वाचकांपर्यंत पोहोचते, तर*

*मातृत्वाची जबाबदारी ही मुलाच्या लंचबॉक्समधूनही कशी दिसते, त्याबद्दलच्या हृद्य कथाही यात आहेत.*
*आईच्या प्रेमाची पक्व अवस्था आजी झाल्याशिवाय प्राप्त होत नाही. म्हणून आजी-आजोबांच्या ममतेचं महत्त्वही या कथांमधून अधोरेखित होतं. एकूणच मानवी जीवनातील आईच्या प्रेमाचे स्थान किती महत्त्वाचे आहे, हे जाणून आईचे प्रेम, ममता हे मूल्य जाणून घ्यायची शिकवण या कथांमधून नक्कीच मिळते आणि याची वाचनीयता त्यामध्येच आहे.*

जॅक कॅनफिल्ड आणि मार्क हॅन्सन हे 'चिकन सूप' मालिकेचे संस्थापक व निर्माते म्हणून प्रसिद्ध आहेत. या दोघांनी लेखन व संकलन केलेल्या 'चिकन सूप' या मालिकेची सध्या दोनशे शीर्षके आहेत आणि जगभरातील चाळीस भाषांमधील वाचकांपर्यंत ती पोहोचली आहेत.




**लेखक**

**जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन**
**मार्सी शिमॉफ । कॅरोल क्लीने**

**अनुवाद**

**उष:प्रभा पागे**





**जॅक कॅनफिल्ड** यांच्या नावावर त्यांची सात पुस्तके एकाच वेळी न्यू यॉर्क टाइम्सच्या 'बेस्टसेलर' पुस्तकांच्या यादीत असल्याचा गिनिज बुक विक्रम आहे. शिक्षक, कार्यशाळा संयोजक, मानसोपचार तज्ज्ञ अशा विविध क्षेत्रांत ते काम करत आहेत.

**मार्क हॅन्सन** अमेरिकेतील एक स्फूर्तिदायक आणि प्रेरणादायक वक्ते, प्रशिक्षक आणि लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. गुण आणि तत्त्वे यांचे मानवीकरण केल्याबद्दल 'होरॅशिओ अल्गर' पुरस्कार, नॉर्थवुड विद्यापीठाकडून 'असामान्य औद्योगिक नेता' असे अनेक मानाचे पुरस्कार मार्क हॅन्सन यांना मिळाले आहेत.

**मार्सी शिमॉफ** या नॉन-फिक्शन प्रकारात बेस्टसेलर लेखिकांपैकी एक आहेत. त्यांच्या पुस्तकांमधून त्यांनी दिलेला संदेश जगभरातील लोकांसाठी हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी ठरला आहे. आनंदी आणि सक्षम जीवन जगण्यासाठी लोकांना मदत करणे हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय आहे.

# परिचय

*आईची तुलना कोणाबरोबरही होऊ शकत नाही, कारण ती अतुलनीय असते.*

**– आफ्रिकेतील सुभाषित**

आईसारखं दुसरं कोणीच नाही. आमचं वय काही असो, माता आम्हा मुलांना जीवन देतात, प्रेम देतात, आमची काळजी घेतात आणि आम्हाला उत्तम तेच मिळावं, असं त्यांना वाटतं. त्यांनी आपल्यासाठी जे संचित दिलं

आहे, ते वर्णनापलीकडचं आहे.

'आई' असण्याच्या अनुभवाची बरोबरी दुसऱ्या कशानंच होऊ शकत नाही. आई ही कायम आईच असते.

पोटात गर्भ वाढवणं, बाळंतवेणा देणं आणि मुलाला जन्म देणं, आणि दत्तक आई असो वा जन्मदात्री आई आपल्या बाळाचा चेहरा पहिल्यांदा पाहण्याचा अनुभव, या सगळ्या विलक्षण ताकदीच्या घटना म्हणजे ज्याला 'मातृत्व' म्हणतात, त्या आयुष्यातील अद्वितीय अनुभवाची केवळ सुरुवात असते.

आईला आमच्या हृदयात विशेष असे स्थान आहे, म्हणून पहिले 'चिकनसूप फॉर द मदर्स सोल' आम्ही निर्माण केलं. हे पुस्तक आवडलेल्या आणि आणखी हवं असलेल्या जगभरातल्या असंख्य वाचकांची प्रचंड मागणी पुरी करण्यासाठी म्हणून 'चिकन सूप फॉर द मदर्स सोल – २' हे आम्ही संकलित केलं. या दोन्ही पुस्तकांमध्ये क्रम असा नाही. कोणतेही पुस्तक आधी वाचा वा नंतर, त्यातून आनंदच मिळणार; पण आमच्या वाचकांच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही एकदा का एक पुस्तक वाचलंत की, तुम्हाला आणखी वाचावीत असे वाटेल.

तुम्ही स्वत: आई असा किंवा तुम्ही आईशी असलेल्या नात्याची अमूल्य ठेव्याप्रमाणं जपणूक केली असेल, तर या पुस्तकातील गोष्टी तुम्हाला आनंद देतील, प्रेरणा देतील, तुम्हाला हलवतील आणि तुम्हाला स्पर्शून जातील. ज्या विविध मार्गांनी 'आया' आपलं जीवन संपन्न करतात, त्याबद्दलच्या या गोष्टी मुलामुलींसाठी आदर्श वस्तुपाठ आहेत. आयांनी जी कौशल्याची, कसरतीची भूमिका पार पाडायची असते, त्याबद्दलची कृतज्ञता या विविध कथांमधून साजरी झालेली आहे.

आजच्या काळात कुटुंबाचा निर्वाह करणं यासारखं कष्टप्रद, जिकिरीचं काम दुसरं कोण करू शकणार आहे? कुठल्याही वेळी, कुठल्याही प्रसंगी आईच धावून येते. कधी भूक भागविते, कधी पैसे कमावते, कधी ती घरातील स्वच्छता करते, कधी ती मदतनीस होते, कधी तुमची ड्रायव्हर, कधी नर्स, कधी शिस्त लावणारी पंतोजी, तर कधी तुमच्या रहस्यात सामील असलेली तुमची मैत्रीण. काही वेळा तर एकाच वेळी हे सगळं आयांना करावं लागतं. किती-किती कामं तिला करावी लागतात, किती भूमिका पार पाडाव्या लागतात.

‘चिकन सूप फॉर मदर्स सोल – २’ यामधील वेगवेगळ्या विभागात आईच्या जीवनातील विविध पैलूंचे वर्णन आले आहे. मानवी आयुष्यातील महत्त्वपूर्ण, मूलभूत गोष्ट आहे – प्रेम किंवा ममता. पहिल्या विभागात त्याबद्दलच्या गोष्टी आहेत. आई आणि मूल या दोघांमधील महत्त्वाचा धागा प्रेम आहे, त्यावर या कथा प्रकाश टाकतात. कठीण परिस्थितीला धीरानं तोंड देण्याची वृत्ती, मुलांना शहाणपणाच्या सांगितलेल्या गोष्टी, त्यांचं चातुर्य, प्रेमामधील चमत्कार, आईपणाचा अनुभव, आई होण्याची प्रक्रिया; मग ती स्वत:च्या मुलाची असो वा दत्तक मुलाची असो, या अनेक विभागांचा समावेश आहे.

आम्ही यात ‘माय-लेकी’ असाही एक विभाग केला आहे. त्यांच्यातील नातं खास प्रकारचं असतं. मातृत्व किंवा आईपण याविषयीच्या विभागात काही विनोदी, तर काही मन हेलावून टाकणाऱ्या आई-लेकींमधील गोष्टी आहेत. ‘गमावणे’ या विभागात मुलाच्या वा आईच्या मृत्यूमुळे होणारा ‘वियोग’ याविषयीच्या कथा आहेत. ज्यांनी आपली आई वा आपले मूल गमावले आहे, अशांच्या दु:खावर या गोष्टीतील अनुभव फुंकर घालतील, दु:ख सोसण्याचं बळ देतील.

आईविषयीचं कुठलंच पुस्तक आईविषयी कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. म्हणून ‘आई, आम्ही कृतज्ञ आहोत,’ या विभागात आईविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

खरं तर, हे संपूर्ण पुस्तकच सर्व काळातील आयांविषयीचा आदरभाव, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आहे. आपले अनुभव इतरांशी वाटून घेणं, कठीण प्रसंगांत धीर देणं आणि प्रेरणा देणं, हा याचा हेतू आहे. शिवाय मातांना यामधून व्यावहारिक शहाणपणाच्याही गोष्टी कळतील. कॅरोलच्या आईने (पुस्तक संकलन कामातील एक संकलक) आमचं हस्तलिखित वाचून आम्हाला आवर्जून कळविलं की, ‘या गोष्टी वाचून आपण ‘आई’ म्हणून यातल्या कितीतरी गोष्टी करू शकलो असतो, करायला हव्यात, असं मला वाटलं. अजूनही मी या गोष्टींपासून नक्की बोध घेऊ शकेन. माझी मुले, नातवंडे, पतवंडे यांच्या बाबतीत एक गोष्ट मी नक्कीच करणार आहे. मी त्यांना सांगणार आहे की, माझं तुमच्यावर खूप-खूप प्रेम आहे आणि तुम्ही माझ्यासाठी ‘अमोल’ आहात. आमची अशी इच्छा आहे की, हे पुस्तक वाचून प्रत्येकालाच असं वाटावं!

मात्र एक प्रश्न उरतोच. तो म्हणजे आईचं निरपेक्ष प्रेम आणि तिनं दिलेलं जीवनाचं दान याबद्दलची कृतज्ञता व्यक्त तरी कशी करणार? अत्यंत महत्त्वाचं काम करणाऱ्या या सगळ्या मुली, बायका, मैत्रिणी, ज्या आया आहेत, त्यांचा गौरव कोणत्या शब्दांत करावयाचा? सुरुवात तरी निदान त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करून करता येईल. हा पुस्तकरूपातला कथागुच्छ आम्ही सगळ्या मातांना आणि त्यांच्या मुलांना अर्पण करीत आहोत. तसेच आयुष्यातील सर्वांत श्रेष्ठ अशा 'मातृत्वाची' जबाबदारी आणि आव्हान पार पाडण्याकरिता सकारात्मक हेतूची जाणीव करून मातांचं मनोबल वाढवेल, अशी आम्हाला आशा आहे. तुमच्या मनाला तो ऊब देईल, तुम्हाला तो हसवेल.

**– जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन ,**
**मार्सी शिमॉफ आणि कॅरोल क्लीने**
(संकलन)

# साहसाविषयी

**का**ही गोष्टी अशा असतात की, त्या शांततेत तुम्ही जास्त चांगल्या शिकता, तर काही गोष्टी वादळी परिस्थितीत जास्त चांगल्या शिकता.

**– विल कॅथर**

## तीन हजार मुलांची माता

जो मला देतो, तोच मला द्यायला शिकवितो.

**– जुना सुविचार**

तीस वर्षांपूर्वी फिलाडेल्फिया इथं पत्रकार असताना मी एक छोटं मासिक सुरू केलं होतं. स्वाहिलीत त्याचं नाव होतं 'उमोजा' म्हणजे 'ऐक्य'. त्याचा विषय होता 'अमेरिकेतील आफ्रिकी लोकांचे प्रश्न.'

मासिकाकडे येणाऱ्या बऱ्याचशा पत्रांमध्ये आमच्या गावातल्या टोळक्यांच्या समस्येविषयी विचारणा असायची म्हणून माझा नवरा डेव्ह याला मी त्या अनुषंगानं काही अभ्यास, संशोधन करायला सांगितलं. तो मग रस्तोरस्ती हिंडून, प्रश्न विचारून, लोकांशी बोलून आणि स्वतः निरीक्षण

करून माहिती गोळा करू लागला.

या विषयातला माझा रस हा पूर्णत: व्यावसायिक होता; परंतु एके दिवशी डेव्ह त्याच्या संशोधनाच्या कामगिरीवरून परतला आणि त्यानं सांगितलं की, 'आमचा दुसरा मुलगा रॉबिन हा एका टोळीमध्ये सामील झाला आहे.' एवढंच नाही, तर तो त्या टोळीत खूप लोकप्रिय आहे आणि 'कोपऱ्यावरचं हृदय' (Heart of the Corner) या नावानं तो ओळखला जातो. टोळीमध्ये दंगली उसळल्या तर हृदय हेच सर्वांचं लक्ष्य असे. हे ऐकल्यावर मला धक्का बसला आणि भीतीनं माझं धाबं दणाणलं. हे माझ्या कुटुंबात कसं काय झालं? माझ्या स्वत:च्याच घरात? कटू असलं तरी ते सत्य होतं. माझा मुलगा चालतं-बोलतं 'लक्ष्य' होता.

आम्हाला सहा मुले होती. ११ ते १८ या वयोगटामधली! त्या संध्याकाळी जेव्हा सोळा वर्षांचा रॉबिन घरी आला, तेव्हा मी शोधक नजरेनं त्याच्याकडे पाहिलं. आधी लक्षात आलं नव्हतं; पण खरंच रॉबिन बदलला होता. त्याची वेशभूषा बदलली होती आणि तो गुर्मीमध्ये वावरत होता. मी त्याला तोंडावरच विचारले आणि त्यानं खरं-खरं सांगितलं की, तो एका टोळीचा सदस्य होता आणि मी कितीही बोलले किंवा काहीही केले तरी तो काही बदलणार नव्हता.

जणू माझ्या पायाखालची जमीनच सरकली. माझी भूक हरपली, तहान हरपली. झोप उडाली. मुलाला त्यातून बाहेर काढण्यासाठी मी सामाजिक संस्थांना भेटले, पोलिसांना भेटले; पण कोणाजवळच उत्तर नव्हतं. कोणीच काही करू शकत नव्हतं.

हां, एका गोष्टीवर सगळ्यांचं एकमत दिसलं की, या प्रश्नाचं मूळ मुख्यत: कुटुंबकलह हे आहे; पण आमच्या बाबतीत तरी हे कारण नाही, आपलं कुटुंब तर एकसंध आहे असं मला वाटायचं; पण रॉबिनच्या बाबतीत मात्र काहीतरी चुकत होतं खास!

मग माझ्या डोक्यात एक कल्पना आली. कुटुंब हे जर कारण असेल, तर कुटुंब हा उपायही का असू नये? रॉबिनच्या अख्ख्या टोळीलाच, गँगलाच घरी राहायला बोलवावं ना! आपण त्यांना आपल्या उदाहरणानं दाखवून द्यावं की, कुटुंबं कशी असतात!

डेव्हला जेव्हा मी माझी कल्पना सांगितली तेव्हा तो म्हणाला, 'तुला वेड तर नाही ना लागलं?'

३री आवृत्ती

# चिताक




लेखक - **महादेव मोरे**

**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

सुशिक्षित पांढरपेशांच्या सुरक्षित टीचभर जगाबाहेरही
पदोपदीच्या अपमानांचं व दु:खांचं हलाहल पचवीत
नियतीशी चिवटपणे झुंजत जगणाऱ्या
शेतकरी-कामकरी-मजूर-ड्रायव्हर-क्लीनर-मेकॅनिक-वारयोषिता
आदि पददलित लोकांचं एक विशाल असं जग आहे.
हेच जग लेखनाची प्रेरणा व शक्ती...

'चिताक'मध्ये कथा आहेत त्या ह्याच जगातील लोकांच्या.
रखरखीत व्यथांच्या व सुखाच्या थंडगार झुळकांच्याही.
चाकोरीबद्ध ग्रामीण वाङ्मय वाचून
खेड्यापाड्यातील केवळ शेतकरीच ग्रामीण बोली
नित्य बोलत असतो असा जो समज
सर्वसामान्य मराठी वाचकांत रूढ झाला आहे,
त्याला 'चिताक'मुळे छेद जायला हरकत नाही!

पण माझ्या या कल्पनेनं मी चांगलीच पेटले होते आणि हा विचार मी मुळीच सोडून देणार नव्हते. शेवटी माझ्या हट्टापुढे त्यानं माघार घेतली. आमची बाकीची मुलं या बाबतीत एकदम मोकळी होती. रॉबिनचं आयुष्य हे किती धोक्यात सापडलं आहे, हे त्यांनाही माहीत होतं. रॉबिन तर या कल्पनेनंच रोमांचित झाला की, त्याचे टोळीतले साथीदार आणि कुटुंबीय एका छत्राखाली राहणार!

रॉबिनच्या गँगचा म्होरक्याही रस्त्यावर राहून अडचणीत येणार होता आणि त्यालाही लपून राहायला जागा हवी होती. आमच्या घरीच राहायचे या कल्पनेवर तो एका पायावर तयार झाला. मग बाकीच्यांनी त्याचे अनुकरण केले. त्या मुलांच्या पालकांपैकी शक्यतो सगळ्यांना भेटून मी माझी योजना त्यांना समजावली आणि ते सगळे जण त्यांच्या मुलांना आमच्याकडे राहायला पाठवायला तयार झाले.

आमचं घर तसं लहानच होतं. आमच्या स्वत:च्या कुटुंबासाठी ते पुरेसं मोठं होतं. जेव्हा जास्तीची पंधरा मुलं घरात राहायला आली, तेव्हा घरात खूप दाटी झाली. सार्डिनच्या डब्यासारखी; पण आम्ही त्याची नीट व्यवस्था केली. दिवाणखान्यातल्या जमिनीवर स्लीपिंग बॅगा टाकून मुलं झोपायची. जेवायच्या वेळी स्लीपिंग बॅगा गुंडाळून आत टाकायच्या आणि घडीचे टेबल आणि खुर्च्या मांडायच्या असं चाले. सुरुवातीचे काही दिवस जड गेले. कित्येकदा मलाही वाटायचे की, डेव्ह म्हणाला तसं आपण हा वेडेपणा तर नाही ना केला? रोजच्या कामात मदत करायची त्यांची तयारी नसे. आमच्या कौटुंबिक बैठकांत ते भाग घेत नसत आणि त्यांनी अर्धवेळ नोकरी करावी, हे माझं म्हणणं मनावर घेत नव्हती; पण मी अगदी ठाम होते. हे कोडं आपल्याला सोडवायचं आहे, हे मी पक्कं ठरवलं. या कोड्याचे सगळे तुकडे योग्य जागी बसणं आवश्यक होतं, तरच या मुलांची आयुष्यं मार्गी लागणार होती.

शेवटी मी मुलांना सांगितलं की, तुम्हीच सगळ्यांसाठी नियम ठरवा. आम्ही ते सगळे पाळू. या बाबतीत आम्ही जरा साशंकच होतो. कारण त्यांचे नियम जर आम्हाला आवडले नाहीत, तर आमचे नियम त्यांच्यावर लादणे पुन्हा अवघड होऊन बसणार; पण त्यांनी जेव्हा त्यांचे चारही नियम वाचून दाखविले तेव्हा आम्ही सुटकेचा नि:श्वास टाकला.

ते असे – १. घरात भांडायचे नाही, २. मादक द्रव्यांचे वा दारूचे सेवन

करायचे नाही, ३.  खोलीत मुलींना आणायचे नाही, ४. टोळीयुद्ध करावयाचे नाही.

कदाचित... कदाचित या नियमांचे नीट पालन होईलही, असे मला वाटले. ते नियम त्या मुलांनीच बनविले असल्याने त्यांनी त्यांचे पालनही केले.

सर्वांत मोठ्ठं आणि निकडीचं आव्हान होतं, ते म्हणजे सगळ्यांना पुरेल एवढं अन्न! आमची बचत लवकरच संपुष्टात आली; पण आमच्या मासिकाच्या अंकांची विक्री करून पैसे मिळवायची कल्पना मी काढली. ते अंक आमच्या तळघरात ठेवलेले होते. मुलांनी त्यांचे गठ्ठे करून सायकलला लावले आणि संपूर्ण फिलाडेल्फियात फिरून पैसे जमविले. त्यातून अन्न आणले.

गावातल्या चर्चमध्येही आम्ही गेलो आणि त्यांना आम्हाला अन्नाची गरज आहे हे सांगितलं. त्यांनी भक्कम पाठिंबा दिला. धनिक व्यक्तींनी अन्नदान करावे असे आवाहन केले. त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला. आमच्या घरी 'उमोजा निवास'कडे  (ऐक्य निवास) अन्नाचे भरलेले ट्रकच्या ट्रक येऊ लागले.

आता अन्नपदार्थ आम्हाला पुरून उरू लागले. आता आम्ही आमच्या भागातल्या गरिबांना ते वाटू लागलो. अन्न दुसऱ्यांना दान करताना मुलं उत्साहानं ओसंडत. कारण त्यातले बहुतेक सर्व जण आता 'दाते' होते, याचक नव्हते. इतरांना ते मदत करू शकत होते, हा अनुभव त्यांना अपूर्व होता.

त्यानंतर आता पाहिजे तशा गोष्टी जुळून येऊ लागल्या. मुलांना नोकऱ्याही मिळाल्या आणि घरखर्च भागविण्यासाठी ते आपला वाटा उचलू लागले. ही नवीन टोळी आता 'सेल' आयोजित करायची. बिस्किटं, गोळ्या घरोघर जाऊन विकायचे. वृद्ध लोकांना कामात मदत करायचे. सर्वांत कसोटीचा क्षण आला. तो म्हणजे या टोळीचा कडवा प्रतिस्पर्धी असलेला जॉर्ज नावाचा मुलगा एके दिवशी आमच्याकडे विचारत आला की, आमच्या कुटुंबात तो राहायला आला तर चालेल का? त्याच्या लक्षात आलं होतं की, आता त्यालाही असं केल्यावाचून गत्यंतरच नव्हतं. नाहीतर तो मारला तरी जाणार किंवा तुरुंगात तरी. किती तरी वेळ मुलं निःशब्द होती. त्यांच्या एकेकाळच्या शत्रूबद्दलच्या द्वेषाशी ते मनातल्या मनात लढत होते; पण आता

काही नव्या गोष्टी त्यांच्या जीवनात आल्या होत्या. कुटुंबाविषयी बांधिलकी, दया, करुणा या भावनांनी त्यांच्या कठोर मनोवृत्तीवर विजय मिळविला होता. मुलांनी जॉर्जला आमच्या नव्या कुटुंबात सामील करून घेतलं आणि मोठ्ठा ताण संपला.

जसजसे दिवस पुढे सरकले, तसतशी ती मुलं मला आवडू लागली. ती सगळी मुलं मला आपली मुलंच वाटू लागली. त्यातील काही जण मला 'मॉम' म्हणू लागली. ही गँग जेव्हा प्रथम आमच्या घरी आली तेव्हा त्यांना रस्त्यावरची नावं होती म्हणजे 'किलर' किंवा 'सापडोळ्या', 'ससाण्या', 'कावळा' किंवा 'टिटव्या' अशी. मी त्यांना नवी आफ्रिकन नावं दिली. त्या नावांना अर्थ होता. त्यांच्यातल्या गुणांची कदर करणारी ती नावं होती. काही जण वृत्तीनं धाडसी, काही शिस्तीचे तर काही ताकदवान. त्या-त्या गुणांवरून मी त्यांची नवी नावं ठेवली. कधी त्याविषयी मी सांगितलं नव्हतं; पण मुलांना नक्कीच जाणीव होती की, आपल्या नावाला गालबोट लागेल असं काही आपल्याकडून होता कामा नये.

आमच्या या अनोख्या कौटुंबिक प्रयोगाची हकीगत आमच्या गावात सगळीकडे पसरली. त्यामुळे आमच्या कुटुंबात प्रवेश मिळविण्यासाठी आणखी-आणखी मुलं यायला लागली. शेवटी पेन्सिल्व्हानिया प्रशासनानं अधिकृतपणे या मुलांची काळजी घेण्यासाठी पालक म्हणून आमच्याशी करार केला. आमच्या घराचे नाव 'उमोजा – बॉइज टाउन' ('ऐक्य – मुलांचे निलयम') असे प्रचलित झाले आणि या करारान्वये आमच्या हातात जो नवीन निधी आला त्यायोगे आम्ही विस्तार केला. आमच्याच भागात आम्ही नवीन घरं घेतली. तिथे कर्मचारी नेमले. मुलं सतत येत होती आणि आम्ही आमचे हात त्यांच्या स्वागतासाठी पसरले होते. या रस्त्यावरच्या मुलांबरोबर राहणं काही नेहमीच सुसह्य व्हायचं नाही. पुष्कळ लोकांनी त्यांची नावं टाकली होती. बाकी सगळीजणं त्या मुलांना हे करा, ते करा असं सांगत असत; पण मी मात्र सांगण्याऐवजी त्यांचं ऐकून घ्यायचं असं ठरवलं होतं. मी त्यांच्याकडे नेहमी आईच्या नजरेनं पाहिलं, त्यांच्यातल्या गुणांकडे पाहिलं. नेहमीच त्याचा उपयोग झाला असं नाही; पण बरेच वेळा झाला हे नक्की.

एका मुलाच्या बाबतीत याचा उपयोग झाला नाही. तो आल्यापासूनच त्रासदायक ठरला. भांडखोर होता, कामाला नकार द्यायचा, बैठकी उधळून

**११वी आवृत्ती**

# ठिकरी

लेखक - **वपु काळे**

**किंमत : ७०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




सोना...
वपुंच्या कादंबरीची कथानायिका.
तिला प्रथम प्रश्न पडला होता की, आपण ठिकरी खेळणाऱ्या आहोत
की स्वत:च ठिकरी आहोत
हा संभ्रम जोपर्यंत दूर होत नाही तोपर्यंत काय करायचं?
नव्या अनोळखी चौकोनात जाऊन पडण्यापेक्षा
परिचयाचा जुना चौकोन काय वाईट!
तिची स्वत:ची जरी अधूनमधून तगमग होत असली तरी
इतर ठिकऱ्यांना ती ऊब देऊ शकत होती.
त्यांच्यापैकी कुणीतरी जेव्हा वाट्याला आलेला चौकोन सोडायचा
प्रयत्न करेल, तेव्हा ती ठिकरी योग्य चौकोनात पडणार आहे की
नाही,
हे ती दक्षतेने पाहणार आहे.

लावायचा. एका प्रेमळ कुटुंबाचा सदस्य असल्यावर किती आधार वाटतो, हे त्याला पटवून द्यायचा मी खूप प्रयत्न केला. पण व्यर्थ! मुलं गमावण्याचं मला खूप दु:ख वाटे.

त्यानंतर काही वर्षांनी कडेवर मूल घेऊन एक माणूस माझ्या ऑफिसमध्ये थेट आला. 'स्पाईक' होता तो. माझ्या हातात आपल्या मुलीला ठेवत तो मला म्हणाला, 'मॉम, तुम्ही माझ्या मुलीचं नाव ठेवा.'

काय बोलावं मला सुचेना; पण त्या सुंदर मुलीकडे लक्ष गेल्यावर माझ्या ओठावर नाव आलं 'फातिमा' म्हणजे 'लक्ष्यवेधी.' स्पाईकनं तिला आपल्याकडे घेतलं आणि म्हणाला, तुम्ही दाखविलेल्याप्रमाणे मी माझ्या मुलीला वाढवेन. आपल्या कुटुंबातील ती सदस्य असावी असे मला वाटते. म्हणजे माझं म्हणणं स्पाईकनं ऐकलं होतं तर. इतरही अनेक मुलं होती, आमच्या कुटुंबाविषयी त्यांना पूर्ण बांधिलकी होती आणि त्यांच्याकडे तीव्र समर्पणभाव होता. आमच्या या प्रयोगाला दोन वर्षे झाली होती, तेव्हा या गँगची एक कॉन्फरन्स घ्यावी, असं मी ठरविलं. आमच्याकडे राहून गेलेल्या मुलांना मी तसं सांगितलं. तसंच आमच्याकडे राहून करिअरकडे वळलेल्या आणि स्वत:च घरसंसार मांडलेल्या तरुणांना मी सांगितलं की, त्यांनी त्यांच्या आधीच्या गँगमध्ये जावं आणि त्या-त्या गँगच्या नवीन नेत्यांना या सभेत भाग घ्यायला बोलवावं. सभेचा विषय जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा होता. तो म्हणजे गावातील टोळ्यांमधील मृत्यूंना आळा घालणं. एक मुलगा त्याच्या जुन्या टोळीमध्ये हे सांगायला गेला तर त्यांनी त्याला इतका मारला की, काही दिवस त्याला हॉस्पिटलमध्ये राहावं लागलं; पण जसा तो हॉस्पिटलमधून बाहेर आला, तसा तो पुन्हा त्या जुन्या टोळीतल्या नेत्याकडे गेला आणि आमच्या घरात भरणाऱ्या या सभेमध्ये येण्याविषयी त्यानं त्या नेत्याला सांगितलं. त्याच्या या धाडसाला सलाम म्हणून की काय त्या टोळीचा नेता सभेला आला.

ही सर्वप्रथम आलेली मुलं होती. नंतरच्या तीस वर्षांनी तीन हजारांहून अधिक मुलं आमच्या घरी राहून गेली. ती सगळी माझी मुलंच आहेत. आता त्यातली काही मध्यम वयाचे गृहस्थ झाले असले तरी ते घरी येतात. काही सल्ला विचारतात किंवा नुसत्या भेटीला येतात. आले की, बास्केटबॉल खेळतात आणि सध्या आमच्या 'उमोजा' म्हणजे 'ऐक्य' सदनांतील मुलांशी गप्पा मारतात. बरेच वेळा ते आपली पत्नी आणि मुले यांना बरोबर घेऊन

येतात आणि त्यांचे वाढदिवस ‘उमोजा’ सदनातील मुलांबरोबर साजरे करतात.

माझ्या मुलाला वाचविण्यासाठी खरं तर मी हा उपक्रम सुरू केला. एका मातेच्या वात्सल्यापोटी केलेली ही साधी कृती; पण तिचा एवढा विस्तार झाला की, ती पूर्ण वेळेची सेवा झाली आणि त्यामुळे हजारो तरुणांची जीवनं वाया जाण्यापासून वाचली. एक माणूस सगळं काही करू शकत नाही; पण कोणीतरी एक कशाचीतरी सुरुवात तर करू शकतोच ना!

‘एकी, प्रेम आणि कुटुंब’, या तीन गोष्टींनी माझ्या अनेक मुलांना वाचविले आणि भविष्यातही अनेक मुलांना त्या आधार देणार आहेत. या प्रेमाला मर्यादा नाही. माझं स्वत:चं नाव आहे ‘फलाका’ म्हणजे ‘नवा दिवस’. प्रत्येक दिवस नवनव्या मुलांची आई बनायची संधी मला देतो. या मुलांना सर्वांत जास्त कशाची गरज असेल, तर प्रेमाची!

**– फलाका फताह**

## प्रेमपत्रे

पुष्कळजण ईश्वराजवळ प्रार्थना करतात की, ‘आमचं ओझं हलकं होऊ दे; पण कोणी असं मागणं मागत नाही की देवा, ओझं वाहायला आम्हाला बळ दे.’

**– अनामिक**

एका हिवाळ्यात माझा आठ वर्षांचा मुलगा अँडी खोकल्यानं आजारी पडला. मुलांच्या डॉक्टरकडे आम्ही गेलो. त्यांनी औषधं देऊन घरी पाठवलं; पण नंतर अँडीची तब्येत सुधारली तर नाहीच उलट अधिक बिघडली. एकवेळ अशी आली की, त्याला श्वास घ्यायलाच खूप त्रास व्हायला लागला. इतका की, मी त्याला दवाखान्यात तातडीच्या भागात घेऊन गेले. अस्थमाच्या शंकेनं त्यांनी त्याच्या छातीचा एक्स-रे घेतला.

तेव्हापासून आमची आयुष्यंच बदलून गेली. नर्सनं आम्हाला एका लहान खोलीत बसवलं. इमर्जन्सी रूममधील गडबड सोडली तर बाकी सर्व शांत होतं, फारच शांत. डॉक्टर आणि नर्स कुजबुजत्या आवाजात बोलत आहेत, असं मला वाटलं. एका नर्सनं मला सांगितलं की, तुम्ही तुमच्या नवऱ्यालाही बोलवा. मी त्याला बोलावून घेतलं. तोही आला. आम्ही तिघेही डॉक्टरांसमोर

धडधडत्या अंत:करणानं बसून होतो. कोणत्याही भाषेतला तुमचं जीवन उलटं-पालटं करणारा एकच शब्द आहे 'कॅन्सर'. डॉक्टरांनी समजावून सांगितलं की, अँडीच्या छातीत 'लिम्फोमा' आहे. त्याच्या छातीची दोन-तृतीयांश पोकळी कॅन्सरनं भरून गेली आहे. त्यामुळे त्याच्या फुप्फुसांवर आणि हृदयावर ताण येतो आहे. एकाएकी माझा आठ वर्षांचा निरोगी मुलगा आता खूप आजारी झाला.

बधिर अवस्थेतच आम्ही ऐकत होतो, आणि डॉक्टर यापुढील अवस्था आम्हाला समजावून सांगत होते. पुढील पाच दिवस अँडी हॉस्पिटलमध्येच राहिला. त्याच्या एकामागून एक अशा भयंकर चाचण्या डॉक्टर घेत होते. रोगाचे स्वरूप आणि उपाययोजना याचा विचार चालला होता. मी त्याच्याबरोबर राहिले, त्याची अस्वस्थता कमी करण्याची माझी धडपड होती. मला साह्य करणारी मंडळीही होती.

त्या पाच दिवसांत अँडीला पंच्याऐंशी पत्रे आली. त्याच्या वर्गमित्रांकडून, तो बॉयस्काउटमध्ये होता त्या गटातून, त्याच्या मित्रांकडून आणि लांबच्या, जवळच्या कुटुंबीयांकडून पत्रांचा जणू पाऊस पडला. अँडीसाठी लोकांच्या एवढ्या आत्मीयतेचा, पाठिंब्याचा हा ओघ पाहून माझं मन आनंदलं आणि हेलावूनही गेलं. पत्रं आणि शुभेच्छा-पत्रांबद्दलची अँडीची प्रतिक्रिया पाहून तर मी थक्क झाले. आपल्यासाठी इतकी पत्रे पाहून तो इतका प्रफुल्लित झाला की, विचारता सोय नाही. प्रत्येक पत्रं त्यानं पुन:पुन्हा वाचलं. अनेकदा पारायणं केली त्यांची. त्याला न कळणाऱ्या लिपीतील पत्रे तो मला वाचून दाखवायला सांगे. अनेकदा मला ती त्याच्यासाठी वाचावी लागत.

हॉस्पिटलमधले पाच दिवस संपले. अँडी पुन्हा घरी आला; पण आता त्याच्या आयुष्यातील सर्वांत मोठ्ठी लढाई त्याला लढायची होती; पण आता पत्रं नव्हती. पत्रांचा पाऊस थांबून क्वचित एखादी सर यायची. तीही हॉस्पिटलने आमच्या पत्त्यावर पुन्हा पाठविलेली. माझ्या लगेचच लक्षात आलं, लोकांना त्याच्याबद्दल काळजी नक्कीच वाटत होती; पण प्रत्येक वेळी काय लिहिणार ते. पुढचा वाढदिवस साजरा करायला जगण्याची ज्याची शाश्वती नाही, अशा आठ वर्षांच्या मुलाला 'तू बरा होणार आहेस,' हे कसं लिहिणार?

अँडीला फारच एकटं-एकटं वाटायला लागलं. तो इतका आजारी होता

**८वी आवृत्ती**

# डोंगरी ते दुबई

मुंबईतील माफियांची साठ वर्षे

लेखक - **एस. हुसेन झैदी**

अनुवाद - **अशोक पाध्ये**

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




मुंबईवर ६० वर्षे गुंडांच्या टोळ्या चालवणाऱ्या माफियांचा प्रभाव होता. त्यात हाजी मस्तान, करीम लाला, वरदराजन मुदलियार, छोटा राजन, अबू सालेम होते. पण या सर्वांवर कडी केली ती दाऊदने. या सर्वांची तपशीलवार माहिती काढून अभ्यासपूर्वक त्यांच्यावर लिहिलेले हे पहिलेच पुस्तक आहे. एका साध्या शाळकरी पोरापासून टोळीच्या दादापर्यंत दाऊदची उत्क्रांती कशी होत गेली, दाऊदने पोलिसांचा उपयोग करून आपल्या प्रतिस्पर्ध्यांना कसे निपटले आणि शेवटी तो मुंबई पोलिसांचा एकमेव सूडकरी कसा बनला, याचे वर्णन यात आहे.

हे पुस्तक म्हणजे मुंबईतील गुन्हेगारीचा एक अधिकृत इतिहास आहे. एका पोलीस कॉन्स्टेबलचा मुलगा दाऊद याने पठाणांच्या टोळीला कसे निपटले, पहिली सुपारी कशी दिली गेली व शेवटी दुबईतून दाऊद कसा पाकिस्तानात पळून गेला, याचे थरारक वर्णन पुस्तकात आले आहे.

की, शाळेतही जाऊ शकत नव्हता किंवा मित्रांबरोबर खेळूही शकत नव्हता. रेडिएशन आणि केमोथेरपीसाठी आमच्या हॉस्पिटलच्या वाऱ्या करण्यात दिवस पुढे सरकत होते. पत्रांबद्दल मात्र तो आवर्जून चौकशी करायचा; पण आता पत्रं थांबली होती. एके दिवशी त्यानं विचारलं, ''माझ्यावर आता कोणीच प्रेम करीत नाही का?'' माझ्या अश्रूंना थोपवत मी म्हणाले, ''नाही रे बाळा, पण लोकांना तर खूप कामं असतात की नाही...'' पण त्याच वेळी मी ठरवलं की, त्याच्या आयुष्याची वर्षे तर आपल्या हातात नाहीत, तर निदान त्याच्या जगण्याची श्रीमंती तरी आपल्या हातात आहे. माझा धाडसी मुलगा एकटा ही लढाई लढणार नाही. मी त्याच्याबरोबर राहीन. मी मनोमन ठरवलं की, त्याच्या अनामिक मित्रांच्या नावानं त्याला पत्रं धाडायची.

मी मग त्यात पुष्कळ गमती करू लागले. चमकदार रंगाच्या लिफाफ्यात मी त्याला गमतीची कार्डं पाठवू लागले. परतीच्या पत्त्यावरही मी खोटे – गमतीचे पत्ते टाकायची किंवा पाठविणाऱ्याचा पत्ता लिहायचीच नाही. कधीकधी पत्रांतून त्याला भेटवस्तूंचं कव्हर किंवा रविवारचं 'कॉमिक्स' पाठवायची. किंवा खाद्यपदार्थांसोबत भेटवस्तूच्या रूपात येणारी खेळणी मी त्याला पत्रातून पाठवू लागले. मला खात्री होती की, अँडीला यामागे मी आहे, हे समजणार नाही. मी सहज विचारल्यासारखं दाखवून त्याला म्हणायचे, ''तुझ्या त्या गुप्त मित्राकडून पत्र आलंय का रे हे?'' आणि अँडी म्हणायचा, ''कोण बरं असेल माझा हा गुप्त मित्र?'' मग मी चटकन तोंड फिरवून माझं हसू लपवायची.

एके दिवशी अँडीनं माझ्या हातात एक लिफाफा दिला. त्यावर लिहिलं होतं, ''माझ्या अनामिक मित्रास...'' त्यानं मला बजावलं की, हे मी पोस्टात टाकावं. मीही त्याला खात्री दिली की, नक्की हे तुझ्या त्या गुप्त मित्राला पोहोचेल आणि ते बाजूला ठेवलं.

जेव्हा तो रात्री झोपी गेला तेव्हा मी लिफाफा उघडून पाहिला. आत अँडीनं काढलेलं चित्रं होतं. रंगीत आणि आकर्षक; पण चित्राखाली चित्रकाराचं नाव असतं तिथं लिहिलेला मजकूर वाचून क्षणभर माझं हृदय थांबलं. क्रेयॉनमध्ये लिहिलं होतं ''ता. क. मॉम, माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे.''

त्याला माहीत होतं तर. माझं रहस्य उघड झालं होतं. दोघांनाही आता सत्य काय ते कळून चुकलं होतं; पण आम्ही एकमेकांना काहीच बोलून

दाखवलं नाही. आमच्या खेळानं आता एक नवं वळण घेतलं होतं. पुढची साडे-तीन वर्षे आम्ही हा खेळ खेळत राहिलो. आम्ही विजेच्या चक्रामध्ये बसून फिरल्यासारखे त्याच-त्याच चक्रात फिरत होतो – उपचार, रोग वाढायचा, कमी व्हायचा, वाढायचा, पुन्हा उपचार. अँडी फक्त एकाच गोष्टीची वाट पाहत असायचा – त्याची पत्रे. जेव्हा दारावर पोस्टमन यायचा, पूर्ण दिवसात फक्त तेव्हाच त्याच्या चेहऱ्यावर हसू फुलायचं.

अँडीचा गुप्त मित्र होण्याचं भाग्य मला लाभलं. त्यामुळे माझ्या जीवनाला काही हेतू मिळाला. जिथे मी काहीच करू शकत नव्हते, तिथे या गुप्त मित्राच्या खेळामुळे मी काहीतरी करू शकत होते. माझी सगळी कल्पकता वापरून मी अँडीला पत्रं लिहायची, भेटवस्तू पाठवायची. अँडीलाही सतत नवीन आशा त्यातून मिळत असत आणि त्या सुया, बाटल्या, तपासण्या, उपचार या चक्रातून सुटकेचा हा एकच मार्ग आम्हा दोघांपुढे होता.

आमचा खेळ म्हणजे रोजच्या वेदनादायी चक्रातून बाहेर पडून विसावा आणि मनोरंजनाचा मार्ग होता. या दिवसांवर अँडीच्या आजाराची दुःखाची सावली होती आणि आमचे हे दिवस आणखीच त्रासदायक ठरले. कारण आमच्याकडचे पैसे अपुरे होते आणि मी मोटार चालवू शकत नव्हते. अँडीच्या उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये जायच्या दिवशी भल्या पहाटे आम्ही उठायचो. तीन बसेस बदलून आम्हाला जावे लागे. हॉस्पिटलमध्ये आधी रेडिएशन घ्यायला जायचे. त्यानंतर त्याला फार थकवा यायचा. केमोथेरपी घ्यायला दुसऱ्या ठिकाणी जावे लागे. तो आणखीच थकायचा. मग येताना पुन्हा तीन बसेस बदलून आम्ही घरी परतायचो. कित्येकदा मध्येच अँडीला अस्वस्थ वाटायचं. मळमळायचं, श्वास घेता यायचा नाही. मग आम्ही वाटेतच उतरायचो. खुल्या हवेत, बाकावर बसल्यावर त्याला जरा बरे वाटायचे; पण बाहेरही हवा अत्यंत थंड असे. पुढची बस मिळेपर्यंत त्या कडक थंडीत आम्ही बसची वाट पाहायचो. अनेकदा मग सहा-सात वेळा आम्हाला बस बदलायला लागे.

अँडी शरीरानं आजारी होता, पण मी मनानं आजारी झाले होते. सकाळी या त्रासदायक चक्रातून जाण्यासाठी त्याला झोपेतून उठवायचं माझ्या अगदी जीवावर यायचं. एके दिवशी अँडीला बरं वाटण्यासाठी एका बसमधून उतरून आम्ही बसस्टॉपवर पुढच्या बसची वाट पाहत थांबलो होतो, तेव्हा

रस्त्यावरून एक मोटार सर्रकन आमच्या पुढ्यातून गेली; पण डबक्यात साठलेलं घाण पाणी, चिखल आमच्या अंगावर उडवून ती गाडी गेली. मी रस्त्याच्या कडेला थांबून माझ्या खिशातून टिश्यू पेपर काढून अँडीच्या चेहऱ्यावर उडालेला घाणेरडा बर्फ त्याच्या गारठल्या चेहऱ्यावरून पुसत असताना मला अगदी रडू आलं. ''माझ्या बाळा, क्षमा कर.'' मी पुनःपुन्हा म्हणत राहिले. अँडी तीव्रपणे म्हणाला, ''तू का क्षमायाचना करावी?'' मी म्हणाले, ''खूप गोष्टींचं मला वाईट वाटतं रे माझ्या बाळा, मला मोटार चालवता येत नाही. टॅक्सीला द्यायला माझ्याकडे पैसे नाहीत, शिवाय थंडी आहे आणि तू हा असा आजारी. मी कायम देवाची प्रार्थना करते; पण मला देवाला विचारायचं आहे की, देवा हे माझ्याच वाट्याला का?'' तर क्षणाचाही विलंब न करता माझ्याकडे पाहत माझा आठ वर्षांचा लहान मुलगा मला म्हणाला, ''आपल्या हातानं ढग बाजूला करून तो तुमच्याकडे बघतो आणि म्हणतो, तू का नको?''

थक्क होऊन मी अँडीकडे पाहिले. त्याच्या नजरेत कुठेही कडवटपणा नव्हता. त्याच्या दृष्टीनं हे जे सगळं दुष्टचक्र सुरू होतं, ते असं होतच असतं. स्वाभाविकच होतं ते. तो जर त्याचा सहज स्वीकार करू शकतो, तर मीही करेन, असा मी मनाशी निश्चय केला. अँडी जितका सोशिक आहे तेवढीच मीही होईन आणि पुन्हा असा विचार मनात आणणार नाही की, हे सगळं माझ्याच वाट्याला का?

जेवढं हे कठीण वाटलं, तेवढं कठीण गेलं नाही. मी अँडीचा गुप्तमित्र होते. त्या कामात मी व्यग्र राहिले. अगदी त्याच्या मृत्यूपर्यंत; पण तो गेल्यानंतरच खरी कठीण वेळ होती. त्याच्या सगळ्या वस्तू मी आवरायला घेतल्या खऱ्या; पण हेच सर्वांत कठीण होते. त्याच्या कप्प्यांतून मी त्याचे कपडे काढले. त्याच्या बुटांच्या खणामध्ये अँडीला आलेली पत्रं कोंबली होती. सगळी त्याच्या गुप्तमित्राकडून आलेली. माझ्या डोळ्यांतून पुन्हा अश्रूंचा पूर लोटला, त्याच वेळी त्या पेटीत त्यानं ठेवलेली पत्त्यांची वही मला दिसली. मी ती उघडली. त्यात वीस नावे पत्त्यांसह मला दिसली. त्या वर्षीच्या उन्हाळ्यात अँडी मुलांच्या एका कॅम्पला गेला होता. मला आठवलं ती सगळी मुलं कॅन्सरग्रस्त होती. अँडीने आपल्यावर घेतलेली ती जबाबदारी होती आणि वारसा (!) हक्कानं ती आता माझी जबाबदारी होती. त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ मी त्या यादीतील प्रत्येक मुलाला पत्र लिहायचं ठरवलं.

सगळं कसं परिचित होतं. अँडीला मी अशी बातम्या देणारी कितीतरी पत्रे लिहिली होती. प्रत्येक आठवड्याला मी काही पत्रं लिहिली आणि प्रत्येकाखाली तुमची मैत्रीण लिंडा अशी सही केली.

या पत्राला कुणी उत्तर देईल असं वाटलं नव्हतं; पण मी त्या यादीतून सर्वांना पत्रं लिहून पुरी व्हायच्या आतच मला पत्राचं उत्तर आलं. मी वाचले. आभारी आहे, आभारी आहे. आभारी आहे मला पत्र लिहिल्याबद्दल. मी अजून जिवंत आहे हे कुणाला तरी माहीत आहे, यावर माझा विश्वासच बसत नाहीये – जेफ्री.

ते पत्र हातात घेतल्यावर मनात विचार आला आणि अँडीकडे बघताना अनेकदा हा विचार माझ्या मनाला स्पर्श करून गेला की, या आजाराशी लढा देताना या मुलांना किती एकटं-एकटं वाटत असेल. एकट्यानंच हा खडतर लढा कशी देत असतील ही मुलं? कॅन्सरशी लढणाऱ्या अगणित मुलांचं एकटेपण आणि निराशा! या दोन वाक्यांत एकवटली आहे. या जगातील त्यांचे अस्तित्व उमटविण्यासाठी त्यांना किती कमी अवधी मिळतो. त्यांना वाटतं की, आपण आहोत हेच कुणाला माहीत नाही आणि कोणाला ते कधी कळणारही नाही.

मी नियमित पत्रलेखन करेन असं मला कधी वाटलं नव्हतं. ही एक साधी अभिव्यक्ती माझं आयुष्यच बदलून टाकेल असं मला कधी वाटलं नव्हतं. माझ्या मुलाला कायमचं गमावण्याचं दु:ख मी विसरू शकत नव्हते. त्याच्याशिवाय रोज सकाळी उठायचे, न्याहारी बनवायचे, असं जगायची मी कधी कल्पनाच केली नव्हती. आता मला कळतंय की, मी आता काय करायला हवं. मुख्य म्हणजे आता मला काही कागद आणायला हवेत.

गमतीजमतीची कार्डं मी पुन्हा नव्यानं शोधू लागले. खेळण्याची भेटवस्तू सोबत मिळणारं सामान मी मुद्दाम खरेदी करू लागले. त्या नाताळात मी वीस प्रकारची 'जिगसॉ पझल्स' विकत घेतली. मला खात्री होती की, अँडीच्या मित्रांना ती नक्की आवडतील. मी ती त्यांना धाडूनही दिली. माझ्याजवळ पैसे कमी होते; पण मी काटकसर करूनही खरेदी करायची. पत्रलेखनाच्या या कामात मला प्रचंड गंमत अनुभवायला मिळत होती.

नंतर मी अँडी ज्या हॉस्पिटलमध्ये वारला तिथं एक सही करायचा कागद ठेवला आणि ज्या मुलांना पत्रं हवी आहेत, अशा मुलांना पत्रं लिहायची इच्छा मी नोंदली. ही बातमी सगळ्यांना समजली. माझ्याकडे माहिती आली आणि

नियमितपणे मी तीनशे मुलांना पत्रे लिहू लागले. तो केवळ आता छंद नव्हता किंवा प्रकल्प नव्हता. आता माझ्या जगण्याची ती गरज झाली.

नंतर मी 'प्रेमपत्र' नावाची संस्था सुरू केली. साठच्या वर स्वयंसेवक मला मिळाले. अशक्त, आजारी, एड्सग्रस्त, कॅन्सरग्रस्त, जळून इजा झालेली, अपघातानं अपंग झालेली आणि पालकांच्या छळाला बळी पडलेली अशा सर्व मुलांना त्यांच्या आशा प्रफुल्लित करणारी पत्रं हे स्वयंसेवक लिहितात, मुलांच्या जीवनात आनंद, उत्साह फुलविण्यासाठी ही लोकं आपला वेळ देतात.

मला माहीत होतं की, अशी खूप मुलं आपल्याभोवती आहेत; पण अँडीच्या आजारपणापर्यंत त्यांचं जग माझ्यापर्यंत पोहोचलं नव्हतं. आता मात्र आमच्या या प्रेमपत्रांमुळे आठवड्याला हजारांहून जास्ती मुलांना नियमित पत्रं मिळतात, शुभेच्छापत्रं मिळतात, भेटवस्तू मिळतात. वर्षातून दोनदा आम्ही नाताळचा सण साजरा करतो. कारण काही मुलं वर्ष व्हायच्या आतच मरून जातात. त्यांना त्या छोट्या कालावधीतही एकदा का होईना, नाताळचा उल्हास अनुभवता येतो.

संस्थेचं काम चालू ठेवायला आर्थिक आघाडीवर मला झगडावं लागतं आणि आम्ही ज्यांना पत्रं लिहितो त्यांपैकी काही जण दगावतात. तेव्हा फार वाईट वाटतं; पण अनुभवानं या कामाचं महत्त्व मला पटलं आहे. एका मुलानं आम्हालाच प्रेमपत्र लिहिलं. आम्ही ते फ्रेम करून ऑफिसात लावलं आहे. त्यानं त्यासोबत रंगीबेरंगी गोधडीचं चित्र धाडलं आहे आणि खाली लिहिलं आहे 'गोधडीसारखी ही पत्रं आम्हाला मायेची ऊब देतात.' ते पत्र वाचायला मला आवडतं. अँडीचा गुप्तमित्र होऊन त्याला लिहिलेल्या पत्रांची, त्याला त्यानं उत्तरादाखल पाठविलेल्या पत्राची, त्यावरील न सापडणाऱ्या पत्त्यांची मला आठवण होते. खरं तर प्रेमाला परत पत्त्याची गरज नसतेच. उलट, पाठविणाऱ्याला कितीतरी पट प्रेम परत मिळतं.

**— लिंडा ब्रेमनर**

❖

१ २वी आवृत्ती

# चाणक्य




लेखक - **भा. द. खेर**

**किंमत : ३००/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

सुमारे चोवीसशे वर्षांपूर्वी घडलेली एका युगप्रवर्तक महापुरुषाची ही चित्तथरारक सत्यकथा आहे. त्या वेळी भारतात अनेक गणराज्ये नांदत होती. परंतु त्यांच्यात एकमेळ नव्हता. सतत संघर्ष होत असत. या अंदाधुंदीच्या परिस्थितीचा लाभ उठवून ग्रीक सेनानी सिकंदर याने भारतावर आक्रमण केले. जगज्जेता होण्याच्या दुर्दम्य महत्वाकांक्षेने पछाडून सिकंदर भारतात आला आणि भारतविजेताही न होता त्याला परतावे लागले. त्यानंतर चाणक्याने एकसंध, बलसंपन्न आणि अखंड

भारताची निर्मिती केली. चंद्रगुप्ताला त्याने सम्राट बनविले —
... ... अशा या नृपनिर्मात्या युगंधर क्रांतिकारी महापुरुषाच्या जीवनावरील ही प्रासादिक भाषेत लिहिलेली ललितरम्य कादंबरी... वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी!

# स्मरण



## वसंत बापट

प्रतिभासूर्य वसंत बापट यांची एकूणच कविता, त्यांची काव्यप्रकृती आणि मुख्यत्वे करून त्यांचे मराठी आणि संस्कृत भाषेवरचे प्रभुत्व, तसेच प्राचीन आणि अर्वाचीन कवितेचा त्यांच्या अभ्यासध्यासाने घेतलेला वेध, हेच एक अलौकिक असे महदाश्चर्य होते. १९५२ मध्ये त्यांचा 'बिजली' हा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला तेव्हापासून आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत वसंत बापट हे प्रतिभावंत कवीच होते. १९६० नंतरच्या दशकात विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर या तीन श्रेष्ठ कवींनी काव्यवाचनाच्या क्षेत्रात अपूर्व अशी क्रांती केली. देश-विदेशात या त्रयीने मराठी कवितेचा अभिमानास्पद ध्वज फडकवत ठेवला. हे तिघेही तसे पाहिले तर भिन्न प्रकृतीचे कवी होते; परंतु आस्वादक मराठी कवितेचा त्रिवेणी संगम कवितेच्या रसिक वाचकांनी या त्रयीच्या सहवासात प्रत्यक्ष अनुभवला. पन्नास वर्षांपूर्वी

म्हणजे १९६६ मध्ये ‘आकाशवाणी’वरून ‘माझे लेखन कशासाठी’ या कार्यक्रमात आपले प्रगल्भ विचार प्रकट करीत असताना वसंत बापट ह्यांनी म्हटले होते की, ‘श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या ‘बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा’ या अप्रतिम काव्यासारखे माझे एकतरी गीतकाव्य सर्वांच्या ओठांवर शाश्वतपणे तरंगत राहू दे. कवितेचा कवी कोण, हे विसरले तरी चालेल, परंतु माझ्या कवितेला अमरत्व मिळू दे.’ या आशयाचे उद्गार मनापासून काढणाऱ्या वसंत बापटांचे ‘गगन सदन तेजोमय’ हे ‘उंबरठा’ सिनेमातले गीतकाव्य सर्व काव्यरसिकांच्या अंतःकरणात तसेच रुजले. ‘अजून त्या झुडपांच्यामागे, सदाफुली दोघांना हसते’ ही भावकवितासुद्धा, आज पन्नास वर्षं उलटून गेल्यावरसुद्धा, प्रत्येक रसिकाच्या हृदयगाभाऱ्यात झंकारतेच आहे. या गाण्यामुळे वसंत बापट हे जसे भावगीत क्षेत्रात अमर झाले, तसेच या कवितेने दशरथ पुजारी या संगीत क्षेत्रातल्या श्रेष्ठ गायकालासुद्धा अमरत्व प्रदान केले. वसंत बापट यांची ‘फुंकर’ ही अत्यंत तरल भावविश्व प्रगट करणारी प्रेमकविता आजही रसिक मनाच्या हळव्या झुल्यावर तसेच झोके घेते. सत्यच सांगायचे झाले तर १९६० ते १९७० या अत्यंत तरल वृत्तीच्या दशकात वसंत बापट यांच्या कवितांची, त्यांच्या एकूणच काव्यवाचनाचे गारूड सर्व मराठी काव्यरसिकांना पडले होते. विशेषतः ‘फुंकर’, ‘केवळ माझा सह्यकडा’,‘दख्खनची राणी’, ‘बाभुळझाड’, ‘सांभाळ’ सारख्या अनेक कवितांनी रसिक मनाला जिंकून घेतले होते. राजबिंडे व्यक्तिमत्त्व, मिस्कीलपणे आणि आकर्षकपणे बोलण्याची आणि संवाद साधण्याची विलक्षण दैवी वाणी, विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय होण्यासाठी जे शैशव जपावे लागत ते, त्यांच्या एकूणच प्रकृतीमधले मार्दव, हुकमी स्वरातले कवितांचे सादरीकरण, शायरी अंगाचा जातिवंत जोरा, हातात डफ घेऊन मेळे गाजवण्याची विलक्षण ताकद ही बापट यांच्या व्यक्तिमत्त्वाची महत्त्वाची अंगे होती. वसंत बापटांच्या ‘केवळ माझा सह्यकडा’ या कवितेला ‘महाराष्ट्राचे

अभिमानगीत’ म्हणून कैलास उंची लाभली होती.

भव्य हिमालय तुमचाअमुचा, केवळ माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पूजीन रायगडा...
तुमच्या अमुच्या गंगायमुना, केवळ माझी भिवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यारी मला छाती निधडी...
मधुगुंजन लखलाभ तुम्हांला, बोल रांगडा प्यार मला
ख्रिस्त बुद्ध विश्वाचे शास्ते, तुक्याचा आधार मला....
धिक् तुमचे स्वर्गहि साती
इथली चुंबिन मी माती
या मातीचे कण लोहोचे, तृणपात्यांना खडगकळा
कृष्णेच्या पाण्यातून अजूनी, वाहतसे लाव्हा सगळा...

‘बिजली’ नंतर वसंत बापट यांचा ‘सेतू’ हा कवितासंग्रह १९५७ मध्ये प्रसिद्ध झाला. ‘सेतू’ हे बापटांचे पुढचे समर्थ पाऊल होते. नंतर ‘अकरावी दिशा’ (१९६२) आणि ‘सकिना’ (१९७२) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. त्याच्या पाठोपाठ ‘मानसी’, ‘तेजश्री’ ‘राजस्वी’ आणि ‘रसिया’ या कवितासंग्रहांतून बापट यांच्या कित्येक कवितेमधून आशयातले नाट्य अद्भुतरीत्या प्रकट होते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांची ‘सकिना’ काव्यसंग्रहातील ‘सांभाळ’ ही अतिशय तरल जीवनानुभव प्रकट करणारी १२ कडव्यांची कविता. एखाद्या दीर्घ विफल प्रेमानुभवावर आधारित दीर्घ कथेसारखी ही कविता एक अप्रतिम कथा निर्माण करते. हताश झालेली प्रेयसी आपल्या प्रियकराच्या बायकोला म्हणते,

आता इथून जाईन म्हणजे
माझे पाय माझे प्राण
दहा दिशा बारा वाटा
एक शपथ माझे त्राण...
तुझा त्याचा एक तारा
एक नदी एक होडी

किती किती साजून दिसते.
तुझी त्याची एक जोडी...
तूच त्याचा सांभाळ कर
तूच त्याला जपत रहा
झऱ्यासारखा हसत ठेव
दुखले खुपले तूच पहा...

भारतीय माजी अर्थमंत्री प्रा. मधू दंडवते यांना वसंत बापट यांच्या 'शिंग फुंकिले रणी' या १९४२ मे १९८२ या चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात लिहिलेल्या गीतांच्या संग्रहाला प्रस्तावना लिहिताना म्हटले होते की, ''वसंत बापटांची प्रतिभा अनेक रंग घेऊन फुलली. त्यांच्या काव्यातून आणि गीतांतून विविध रस ओसंडले आणि त्यात रसिक वर्ग अक्षरशः न्हाऊन निघाला. ज्यांनी वसंत बापट यांची करुणेत भिजलेली 'झेलमचे अश्रू' ही भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली, काळजाला भिडणारी कविता वाचली वा ऐकली असेल, त्यांना हा त्यांचा गीतसंग्रह वाचताना शंका येईल की,

दास्यकाल संपला शांत काय झोपला
अग्नि येथ कोपला पेटुनी नभा भिडे...

या गीताचे कवी वसंत बापट आणि 'झेलमचे अश्रू' टिपणारे बापट हे एकच का? परंतु क्षणात आपल्या कवितेतून आणि गीतांतून कारुण्याचे दर्शन घडवून श्रोत्यांच्या आणि रसिक वाचकांच्या पापण्या ओलावणारे आणि दुसऱ्याच क्षणी राखेखाली दबलेले देशभक्तीचे निखारे आपल्या गीतांमधून फुलविणारे कवी वसंत बापट यांच्या जीवनाला साने गुरुजींच्या जीवनाचा स्पर्श झाला होता हे ध्यानात ठेवले, की वसंत बापटांच्या गीतांमागील प्रेरणांचं रहस्य उमगते.''

वसंत बापटांच्या काही धगधगत्या कविता वाचतांना रक्त उसळते.

शिंग फुंकीले रणी वाजतात चौघडे
सज्ज व्हा, उठा उठा सैन्य चालले पुढे...
किंवा

काय तुम्हाला राज्य पाहिजे भ्रष्टाचाऱ्यांचे ?
स्वार्थासाठी हपापलेल्या सत्ताधाऱ्यांचे?
ज्यांचे आत्मे सरपटणारे, बरबटलेले हात
हांजी हांजी करण्यापुरते बळ ज्यांच्या देहात
काय तुम्हाला राज्य हवे या असल्या चोरांचे ?
काय तुम्हाला राज्य पाहिजे भ्रष्टाचाऱ्यांचे...

अशा ज्वलंत आशयाच्या कविता लिहिणारे कवी वसंत बापट हे राष्ट्र सेवा दलाचे एक फार मोठे शिल्पकार होते. स्वातंत्र्यप्रेरणेने भारलेले उदात्त तत्त्वज्ञानभरले विचार आणि उत्कट, भावगर्भ अशी गीते वसंत बापटांनी लिहून मराठी कवितेचे दालन समृद्ध केले होते. बहुस्पर्शी प्रतिमा त्यांना लाभली होती. वसंत बापटांचा कालखंड आहे २५ जुलै १९२२ ते १९ सप्टेंबर २००२. त्यांना साने गुरुजींचा प्रदीर्घ सहवास लाभला. अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेले कविश्रेष्ठ वसंत बापट १९९९ मध्ये मुंबईत भरलेल्या बहात्तराव्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. बापटांनी कॉलेजमधून अध्यापनाचे काम केले. १९७४ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या टागोर अध्यासनात 'तौलनिक साहित्याभ्यासा'चे ते प्राध्यापक होते. कवितेव्यतिरिक्त 'बारा गावचे पाणी' हे त्यांचे प्रवासवर्णन खूपच गाजले होते. 'विसाजीपंतांची बखर' हे राजकीय उपहासात्मक पुस्तकही गाजले होते. काळावर आपली मोहोर उमटवणारे कवी वसंत बापट हे एक शाश्वत कवी होते. त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळायला हवा होता, असे मात्र मला वाटते..

– वामन देशपांडे
डोंबिवली (पूर्व)
९३२४६१५०७७

४थी आवृत्ती

# अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम

मूळ लेखक - **दिनकर जोषी**

अनुवाद - **सुषमा शाळिग्राम**

**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**



रामकथेच्या नावाने आजमितीला वेगवेगळ्या भाषांत, वेगवेगळ्या प्रदेशांत आणि वेगवेगळ्या धर्मांत मिळून सुमारे तीनेकशे रामायणे उपलब्ध आहेत, असा अंदाज आहे. सोळाव्या वर्षी रामाला वैराग्य येते, राम गृहत्याग करतो, वनवासी होतो आणि नंतर कुलगुरू वसिष्ठ त्याची समजूत घालून, त्याला उपदेश करून जीवनाचा अर्थ समजावून देतात अशी कथा आपल्याकडे प्रसिद्ध म्हणता येईल अशा योगवसिष्ठ रामायणात आहे. कृष्णाच्या रासलीलेने अत्यंत भारावून गेलेल्या लेखणीबहाद्दरांनी रासलीला करणारा रामही रंगवायला कमी केलेले नाही. रामायणाच्या नावाखाली हे सगळे चालत आले आहे. पुढे जाता, ललित साहित्य म्हटले जातील असे अनेक असामान्य काव्यात्मक ग्रंथही लिहिले गेले आहेत. भवभूती आणि कालिदासही त्यातच आले.'समग्र रामकथा हीच मुळात निव्वळ पुराणकथा आहे, यात सत्याचा लवलेश नाही, असा कोणी राम कधी झालाच नव्हता आणि अयोध्या म्हणजे उत्तर प्रदेशातील गाव नाहीच, जावा बेटावरचे जोग्या नावाचे ते एक नगर आहे, थायलंडमधील अयुथ्या (अयोध्या) नावाचे गाव हीच रामजन्मभूमी आहे...' असली विधाने 'पुराव्यांनिशी' करणारेही कमी नाहीत. रामकथा तपासून, पडताळून पाहणे हा प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश नाहीच. वाल्मीकींची मूळ रामकथा हा माझ्यापुढचा आदर्श आहे. मूळ रामकथेच्या पात्रांची, तिच्या कथानकाची ह्यात भले पुष्टी झाली नसेल, निष्ठापूर्वक समर्थनही नसेल, क्वचित कुठे तिच्यावर नगण्य जुलूम झाला असेल, पण तरीसुद्धा कुठेही कृत्रिम विरोधाभास वाटू नये अशा अकृत्रिम सहजतेने ह्या कथेचे विणकाम करण्याचा हा निष्ठापूर्वक केलेला प्रयास

# श्रद्धांजली

## ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे यांचे निधन

मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या सहजसुंदर अभिनयाने रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे (वय ८०) यांचे निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा निनाद, सून अदिती तसेच नातू असा परिवार आहे.

मुंबईत १९३७ मध्ये जन्मलेल्या सुलभा देशपांडे यांनी छबिलदास बॉईज हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून कारकिर्दीला सुरुवात केली. तेथे काम करतानाच विजय तेंडुलकर यांनी सुलभाताईंना मुलांसाठी नाटक लिहायला सांगितले. त्याच काळात 'रंगायन'द्वारा त्या रंगभूमीशी जोडल्या गेल्या. अरविंद देशपांडे, अरुण काकडे आणि सुलभाताईंनी 'आविष्कार' ही नाट्यसंस्था १९७१ मध्ये सुरू केली. त्यांनी माधव साखरदांडे यांच्यासोबत 'आविष्कार'च्या 'चंदशाला' या बालरंगभूमीची धुरा सांभाळली. 'बाबा हरवले आहेत', 'राजाराणीला घाम हवा' यांसारख्या बालनाटकांची त्यांनी निर्मिती केली.

प्रायोगिक रंगभूमीवर त्या निष्ठेने काम करत राहिल्या. त्या मानाने व्यावसायिक रंगभूमीवर त्यांचे उशिरा आगमन झाले. 'रंगायन' आणि 'आविष्कार' यांनी एकूण २५० नाटके रंगभूमीवर आणली.

''जैत रे जैत', 'चौकट राजा', 'अवताराची गोष्ट', आदी मराठी चित्रपटांबरोबरच 'विजेता', 'सलाम बॉम्बे', 'विरासत', 'आदमी खिलौना है', 'गुलाम-ए-मुस्तफा' आदी हिंदी चित्रपट तसेच टीव्ही मालिकांतही त्यांनी काम केले. अस्मिता ही त्यांची शेवटची मालिका होती. जवळपास ७३ हून अधिक चित्रपटांत त्यांनी काम केले.

राज्य सरकारने नुकताच 'नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव केला होता. 'एकता कल्चरल' या संस्थेचा जीवनगौरव पुरस्कार त्यांना दोन वर्षांपूर्वी मिळाला होता. संगीत नाटक अकादमी, नानासाहेब फाटक पुरस्कार, गणपतराव जोशी पुरस्कार, वसंतराव कानेटकर पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, तन्वीर सन्मान आदी अनेक पुरस्कार त्यांना मिळाले.

**✽ ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉ. रा. चिं. ढेरे यांचे निधन**

संत साहित्याचे गाढे अभ्यासक ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉ. रा. चिं. ढेरे यांचे पुणे येथे राहत्या घरी दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांनी धार्मिक आणि संत साहित्यावर खूप पुस्तके लिहिली आहेत. संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे यांनी नाथ संप्रदाय आणि दत्त संप्रदाय यांचा इतिहास जगासमोर मांडला. याशिवाय त्यांची तुळजाभवानी आणि करवीर निवासिनी महालक्ष्मी ही पुस्तकंही गाजली. त्यांच्या मागे डॉ. अरुणा ढेरे आणि वर्षा गजेंद्रगडकर या त्यांच्या कन्या आहेत. ढेरे यांचा दैवतशास्त्र, सांस्कृतिक इतिहास या विषयात विशेष अभ्यास होता. त्यांनी 'भारतीय रंगभूमीच्या शोधात' हा संशोधनपर ग्रंथही लिहिला. १०५ पुस्तकं लिहून त्यांनी महाराष्ट्राची साहित्य परंपरेत मोलाची भर घातली. साहित्य अकादमी आणि महाराष्ट्र सरकारनं त्यांना 'साहित्य अकादमी पुरस्कार' देऊन गौरव केला.

**✽ डॉ. एलिनॉर झेलिएट यांना आदरांजली**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याने प्रभावित झालेल्या आणि भारतातील बौद्ध धम्म आणि दलित चळवळीच्या प्रमुख अभ्यासक डॉ. एलिनॉर झेलिएट यांचे नुकतेच निधन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित डॉ. एलिनॉर झेलिएट यांचे बरेच लेख प्रसिद्ध आहेत. त्यांनी पुण्यातील सिम्बायोसिस संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आणि संग्रहालयाला अनेक वेळा भेट दिली होती. तसेच त्यांचे लेख संग्रहालयाच्या ग्रंथालयामध्ये ठेवण्यात आले आहेत. संग्रहालयाच्या आवारात झालेल्या परिषदेत डॉ. झेलिएट यांनी 'डॉ. आंबेडकर अँड द रिसर्च फॉर अ मीनिंगफुल बुद्धिझम' हा लेख सादर केला होता.

**✽ ज्येष्ठ पत्रकार इंदर मल्होत्रा यांचे निधन**

अनेक प्रमुख वृत्तपत्रांशी संबंधित असलेले आणि राजकीय समीक्षक म्हणून ओळखले जाणारे विख्यात पत्रकार इंदर मल्होत्रा यांचे वयाच्या ८६व्या वर्षी निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून रुग्णालयात उपचार घेत होते. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी व उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांनी समकालीन पत्रकारांपैकी एक सर्वोत्कृष्ट पत्रकार असलेल्या मल्होत्रा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. युनायटेड प्रेस ऑफ इंडियातून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केलेल्या मल्होत्रा यांनी नंतर अनेक प्रमुख दैनिकांचे संपादकपद भूषवले. 'स्टेट्समन' या दैनिकात त्यांनी १५ वर्षे काम केले. ते येथे आधी राजकीय प्रतिनिधी, नंतर ब्यूरो चीफ व डेप्युटी एडिटर होते.

❖

# अभिप्राय

## कल्पनावैविध्याला नैतिकतेची आवड

विज्ञानकथा म्हटले की, ती रहस्यकथेकडे वळण्याचा धोका असतो. अनेकदा जर त्याला वैज्ञानिक संकल्पनेची जोड नसेल तर ती साधी कथा उरते. ‘अंतराळातील मृत्यू’ व ‘संकरित’ हे दोन्ही विज्ञानकथासंग्रह मात्र याला अपवाद आहेत. पुणे विद्यापीठातील भौतिकशास्त्राचे प्राध्यापक डॉ. संजय ढोले यांच्या या दोन्ही कथासंग्रहांत आपल्याला वेगवेगळ्या विज्ञान संकल्पना उत्कृष्ट वर्णनशैलीसह कथासूत्रात गुंफलेल्या दिसतात. आजकाल विज्ञान खूप वेगाने पुढे जात आहे, त्यामुळे वेगवेगळ्या संकल्पना पुढे येत आहेत, तसेच आगामी काळात शक्य असलेले विज्ञान व तंत्रज्ञानही अशा कथा लिहिताना विचारात घ्यावे लागते. विज्ञानकथा लिहिताना वाचक हे विज्ञानाचे जाणकार नसतानाही ती त्यांना समजली पाहिजे, असे अपेक्षित असते. त्या कसोटीवर हे दोन्ही संग्रह उत्तम आहेत, यात शंका नाही. विशेष म्हणजे प्रा. संजय ढोले सातत्याने विज्ञानलेखन करीत असल्याने, त्यांना मराठीतील पारिभाषिक शब्दही माहीत आहेत व हे शब्द रुळवण्याचे कामही या विज्ञानकथांच्या रूपाने झाले आहे.

डॉ. ढोले हे भौतिकशास्त्राचे प्राध्यापक असले तरी जीवशास्त्रातील अनेक विषयही त्यांनी तितक्याच रंजक व वेधक पद्धतीने मांडले आहेत. त्यांच्या ‘संकरित’ या संग्रहात जीवशास्त्र व भौतिकशास्त्र असलेली कथा असली तरी त्याचा विषय जनुकशास्त्राच्या मदतीने मनोवांच्छित संतती, हा आहे. फुटबॉलमध्ये चिवटपणा आणि चपळता लागते. हे गुण आपल्या मुलांमध्ये आणण्यासाठी एक शास्त्रज्ञ कोळी व माकडाची जनुके मुलाच्या जनुकात मिसळतो. फुटबॉल संघटनेचे पदाधिकारी नंतर या नावाजलेल्या

फुटबॉलपटूची तपासणी करण्याचे ठरवतात. आता आपले भांडे फुटणार या भीतीने वैज्ञानिक काळजीत पडतो, पण संघासह हा खेळाडू विमानाने जात असताना त्याला अपघात होतो व रहस्य तसेच राहते. परिणामी या तंत्राचा वापर पुढे होत नाही. ही कथा जनुकशास्त्रातील नीतिनियमांवर आधारित असून, लेखकाने नैतिकतेलाच उचलून धरले आहे. मनोवांच्छित संतती निर्माण करणे आता फार दूर नाही. ब्रिटनमध्ये इतर कारणांच्या निमित्ताने अशा तंत्रांना मंजुरीही मिळाली आहे; परंतु येथे श्रीमंत लोक हे तंत्र वापरून आपल्या मुलांना डॉक्टर, अभियंते, वैज्ञानिक बनवू शकतील आणि गरिबांची मुले नैसर्गिक पद्धतीने जन्माला येतील अशा विषयाची गुंफण असलेल्या कथाही वाचायला मिळतात. त्यांच्या विज्ञान कथा या कृत्रिम वर्णने नाहीत, तर त्याला वेगवेगळ्या मानवी व्यक्तिरेखांची डूब आहे. या कथा लिहिताना त्यांनी समाजातील ताणतणाव व इतर समस्यांचाही वेध तितकाच समर्थपणे घेतला आहे. ‘परिवर्तन’ या कथेत गुंड राजन याच्यावर गोळीबार होतो. त्याच्या हृदयात गोळ्या लागतात. यात, मग पुढे तो केवळ गुंड आहे म्हणून त्याला कशाला वाचवायचे, असे होत नाही; किंबहुना तो माणूसच आहे म्हणून वैद्यकीय उपचार केले जातात आणि त्याच्याच शरीरातील बहुद्देशी मूलपेशी विकसित करून त्याचे हृदय तयार केले जाते.

ही कथा जीवविज्ञानातील प्रगत स्थिती माहीत असल्याशिवाय लिहिणे शक्य नाही. ग्रामीण भाग हा अप्रगत आणि शहरी भाग प्रगत किंवा जी काही हुशारी आहे ती शहरात, ग्रामीण भागात काही तसे नाही, हा समज डॉ. ढोले यांनी खोडून काढताना अनेक वैज्ञानिकांना प्रगत संशोधनानंतरही खेड्याकडे जाताना दाखवले आहे किंवा त्यांनी ग्रामीण भागाशी नाळ तुटू दिलेली नाही. ‘स्वदेश’ चित्रपटातील वैज्ञानिक खेड्यात येऊन तेथील ग्रामस्थांमध्ये मिसळतो व तेथे काही प्रयोग करतो, तसे काही कथापट त्यांच्या या कथासंग्रहामध्ये आहेत. ते आपल्याला वेगळेही वाटते. नाइलाजाने पोटापाण्यासाठी शहरात आलेल्या लोकांना गावाकडची ओढअसते, तशीच डॉ. ढोले दाखवतात आणि आपल्याला स्मरणरंजनात नेतात. आता दहशतवादाविरोधातील लढाई टिपेला

पोहोचलेली असताना यात विज्ञानाची कशी मदत होऊ शकते याची, जवळपास वास्तव संकल्पना ते मांडतात. त्यात बॉंब कुठे ठेवला आहे हे शोधण्याची यंत्रणा विकसित केली जाते. येथे आपल्याला पठाणकोट येथे बॉम्ब निकामी करताना प्राणार्पण करणाऱ्या लेफ्टनंट कर्नल निरंजनची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. यंत्रमानव केवळ जोखमीची कामे करू शकतो असे नाही, तर तो वैद्यक क्षेत्रातही उपयुक्त ठरतो. 'अस्तित्व' या कथेतील यंत्रमानव हा कोमात गेलेल्या व्यक्तीला परत जिवंत करतो. 'अखेर तो परतला' या कथेत स्मृती हरवलेल्या समीर वेलणकरला कृत्रिम स्मृतिपटल बसवले जाते व तो पूर्ववत होतो. आज ही गोष्ट अवघड वाटत असली तरी शक्य आहे. विज्ञानात अहंकारही चालत नाही आणि भाबडेपणाही चालत नाही. 'उत्परिवर्तन' या कथेत संशोधक असणारे डॉ. नेरकर व त्यांची विद्यार्थिनी प्राण गमावते तर 'कोळिष्टक' या कथेत एक गावकरी जीव गमावतो. 'विचारवहन' ही कथा सुंदरच आहे. दुसऱ्या माणसाचे विचार आपल्याला जाणून घेता आले तर किती बरे होईल, असा विचार आपल्या मनात येत असतो. अशी करामत योगायोगाने दाखवणाऱ्या व्यक्तीला आपण गमतीने मनकवडा म्हणतो. मात्र 'विचारवहन' कथेत डॉ. बनकर दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखण्याचे तंत्रच विकसित करतात. या कथेत बनकरांना त्यांच्या मित्रांनीच रचलेला कट या विचार ओळखण्याच्या तंत्राने कळतो. या वेळी पोलीस वेळीच हस्तक्षेप करतात, त्यामुळेच ते हल्ल्यातून वाचतात. परंतु त्यांना घरी जाताना कारची धडक बसते व ते ठार होतात. एकीकडे विज्ञानाच्या मदतीने मृत्यूवर मिळवलेला विजय आणि नंतर पुन्हा नियतीच्या पुढे विज्ञान जाऊ शकत नाही हा अपुरेपणा, दोन्हीही एकाच कथेत त्यांनी प्रभावीपणे दाखवले आहे.

जनुकशास्त्राचाच विषय निघाला आहे तर जनुकीय पिकांमध्ये मोहरीच्या चाचण्यांचा वाद सध्या सुरू आहे. किरणोत्सर्ग, मूलद्रव्ये, समस्थानिके, गुणसूत्रे, मूळ पेशी, संकरित कोशिका हे मराठी शब्द आपण कधी वापरत नाही; परंतु ते लेखकाने वापरले आहेत. यामुळे भाषाविकासात मोठी भर पडत असते. 'अकल्पित' या कथेत मालन ही

किरणोत्सर्ग असलेल्या प्रयोगशाळेत काम करीत असते. तिथे पुरुषाशी मिलन न होताही ती गरोदर राहते व स्वयंक्लोनिंग होते.

त्यांच्या 'अंतराळातील मृत्यू' या कथासंग्रहातील कथाही अशाच रंजक, वेधक आहेत. त्यालाही रहस्याची डूब आहे आणि शेवटी सत्याचा शोध घेण्याची विज्ञानाची धडपड त्यातून दिसते. काही ठिकाणी खेड्यातील वर्णने आहेत. कथेची घटनास्थळेही खेड्याचे निसर्गसौंदर्य लपेटून आली आहेत. काही गोष्टींचे रहस्य उलगडताना अनेकदा वैज्ञानिकांच्या प्राणावरही बेतते; परंतु संशोधन एका टप्प्यावरून दुसरी व्यक्ती पुन्हा पुढे नेते, हा वेगळा क्रम त्यांच्या 'प्रतिशोध'सारख्या कथांमधून सामोरा येतो. 'अद्‌भुत प्रवास' ही कथा वाचण्यासारखीच आहे. त्यातील नायक-नायिका, समाजातील चालीरीती, नायकाचे कृष्ण व श्वेतविवरांचा शोध घेताना समांतरित विश्वात जाणे आणि तेथे त्याला पुण्यातील पेशवेकाळाचा प्रत्यय येणे म्हणजे कालकुपीचाच प्रवास आहे.

टाइम मशिनसारखीच ही संकल्पना आपल्याला आवडून जाते. नेहमीच आपल्याला भूतकाळात फेरफटका मारताना भविष्याचा वेध घेण्याची आस असते. येथे आपणही नायकाबरोबर नकळत भूतकाळाच्या विवरात शिरतो व रमून जातो. लेखकाने अनेक कथांचा शेवट नकारात्मक केला आहे; परंतु जर कटू सत्य सांगायचे असेल तर त्यात काही कारणाने आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टीही घडू शकतात. चित्रपटातही आपल्याला आवडणारा शेवट आपल्याला हवा असतो, परंतु येथे लेखकाने केवळ लोकरंजनास्तव कथा लिहिलेल्या नाहीत, तर त्यातून विज्ञानातील बरे-वाईट आपल्याला कळावे, हा हेतू ठेवलेला आहे. धूमकेतूवर उतरणाऱ्या यानात प्राणाची बाजी लावून बसणारे डॉ. चेतन धोंडे ही व्यक्तिरेखाही अशीच वेगळी आहे. वैज्ञानिकांतील परस्परांवर कुरघोडी, मत्सर असे मानवी पैलूही ते उलगडतात.

'अंतराळातील मृत्यू' ही कथा विज्ञानकथा असली तरी जास्त आकर्षक मांडणीने सजलेली आहे. यातील कॅ. सतीश, डॉ. मंजिरी, डॉ. नितीन या व्यक्तिरेखा उत्तम रंगवल्या आहेत. काळाच्या वेगळ्या महतीमुळे आपला नवराच आपला जावई होणार हे पाहून डॉ. मंजिरी

स्तब्ध होतात, ही कल्पना अशीच आगळीवेगळी. या कथेला दिलेले वळण त्यामुळे अनपेक्षित आहे. अलीकडेच तमिळनाडूत वेल्लोर येथे उल्कापाषाणात कोसळून एक जण ठार झाला. अवकाशातून येणारे धोकेही यातून ध्यानात येतील. ‘वलय’ या कथेत गारगोटीएवढ्या गोळ्याने केलेली हानी, नंतर ते गूढउलगडणे हे सगळे कथा नव्हे, तर सत्य वाटावे असेच आहे. काही कथांमधून ते अंधश्रद्धांवरही प्रहार करतात. ‘आविष्कार’ या कथेत माणूसच जैविक अस्त्र बनू शकतो हे दाखवले आहे; तर ‘अंधारातील तीर’ या कथेत वैज्ञानिकाने नकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर काय होते, हे कळते. ‘प्रगाढ’ ही कथाही तशीच वेगळ्या संकल्पनेवर आधारित आहे. यात एका वेगळ्या तंत्राने वैज्ञानिकांतील वैर आणि त्यावर मात करण्यासाठी डॉ. कावेरकर यांच्या मेंदूची क्षमताच काढून घेतल्याने त्यांची झालेली फजिती, ही कल्पना आणि त्यातील कथनशैलीही वेगळी आहे. एकूणच डॉ. संजय ढोले यांना या कथा लिहिताना आताच्या काळातील विज्ञान व आधीचे विज्ञान या दोन्हीचा अभ्यास असल्याने, खूप विविधता आणता आली आहे.

**‘अंतराळातील मृत्यू’**
पृष्ठे-१५०, मूल्य-१९५ रुपये
दोन्हीचे लेखक – डॉ. संजय ढोले

**‘संकरित’**
पृष्ठे-१७४, मूल्य-१९५ रुपये
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे






**५वी आवृत्ती**

# जीवनकला




लेखक - **वि. स. खांडेकर**

**किंमत : ९०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘हे यमुनेचं पाणी आणि हा ताजमहाल!
जीवन आणि कला!
जीवनाचं हृदय हेच कलेचं कोंदण!
काठावरल्या ताजमहालापेक्षा
हा पाण्यातला ताजमहालच अधिक सुरेख दिसत आहे, होय ना?’

# का ते सांगा!

# जिज्ञासू तथ्य

## मला मोजा!

पृथ्वीचा व्यास तिच्या विषुव-वृत्तापाशी १२,७५६.३२ किलोमीटर एवढा आहे. पण जर आपण पृथ्वीला तिच्या दोन्हीही ध्रुवांपासून मोजले, तर तिचा व्यास जरासा कमी म्हणजे १२,७१५.४३ एवढा भरतो. याचाच अर्थ असा- पृथ्वी उंचीच्या तुलनेत रुंद आणि विषुववृत्ताशी थोडीशी फुगीर अशी आहे. पृथ्वीच्या याच आकाराला लंबगोल किंवा भूगोलाभ असे संबोधतात.




*** पृथ्वी ४ अब्ज वर्षांपूर्वी कशी होती?**

पृथ्वी ४.६ अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. या काळाला प्रिकॉम्ब्रिअन कालावधी असे म्हणतात.

अगदी सुरुवातीला पृथ्वी वितळून उकळणाऱ्या दगडांचा प्रचंड



आकाराचा, लाल तप्त समुद्र होती. हळूहळू ती जशी गार होऊ लागली, तसं तिच्या पृष्ठभागावर पातळ कवच दिसू लागले. पण तिचा गाभा मात्र लाल-तप्तच राहिला.

ती गार होण्याची प्रक्रिया चालू असताना पाण्याची वाफ होऊन वातावरणाशी एकरूप होऊ लागली. ही पाण्याची वाफ द्रवीभूत झाली आणि ढग तयार झाले. याच ढगांमुळे पाऊस पडला आणि थोड्याच काळात वादळं निर्माण होऊन ग्रहावर येऊ लागली. त्यामुळे पृथ्वीचा पृष्ठभाग थंड होत जाऊन पूर येऊ लागले. याच पुरांमुळे समुद्र आणि महासागरांची निर्मिती झाली.

*** पृथ्वीवर जीवसृष्टी केव्हा निर्माण झाली?**

पृथ्वीची पहिली जीवसृष्टी म्हणजे अब्जावधी वर्षांपूर्वी निर्माण झालेले एकपेशीय जिवाणू, ज्यांची संरचना अगदी सरल होती.

अनेकपेशीय प्राणी काही अब्ज वर्षांनंतर दिसू लागले. आपल्यासारखे दिसू लागणारे जीव गेल्या ५७ कोटी वर्षांत अस्तित्वात येऊ लागले. यामध्ये सर्वांत पहिले अस्तित्वात येणारे जीव म्हणजे पाठीचा मणका नसणारे- ज्यांना आपण इंग्रजीमध्ये आर्थ्रोपॉड (Arthropod) असे म्हणतो-, त्यानंतर अळीसारखे अंग असणारे, पाण्यात राहणारे आणि माशांसारखे दिसणारे जीव अस्तित्वात आले.

काही समुद्री प्राण्यांची उत्क्रांती होऊन त्यातले काही उभयचर झाले, तर काही भूचर.

वनस्पतींची उत्क्रांती होऊन त्यांनी जमिनीवर मूळ धरले; त्यातून जंगलं तयार झाली.

सस्तन प्राण्यांची उत्क्रांती २० कोटी वर्षांपूर्वी झाली आणि माणसाची दोन लाख वर्षांपूर्वी झाली. पृथ्वीच्या इतिहासामध्ये केवळ सुमारे ०.००४ टक्के एवढाच काळ माणूस समाविष्ट आहे.




*** का बरं पृथ्वीची रचना अद्वितीय आहे?**

पृथ्वी ही पाच थरांपासून बनलेली आहे. हे सगळे थर भौतिक आणि रासायनिकदृष्ट्या वेगवेगळे आहेत. पाच थर म्हणजेच आतील आणि बाहेरचा गाभा, खालील आणि वरील आवरण व कवच.

पृथ्वीचा आतील गाभा हा (लोखंडाचा) खूप मोठा, लाल तप्त, गोळा असावा असा आहे. प्रचंड दबावामुळे अतिशय उष्ण तापमान निर्माण होऊनही तो घनस्थितीत असतो.

बाहेरचा गाभा हा लाल, तप्त द्रवरूपात असून, लोखंड आणि निकेल धातूंपासून बनलेला आहे. पृथ्वीतील चुंबकीय क्षेत्र याच दोन

धातूंच्या सतत विहारामुळे तयार होते. खालचे आवरण हे घन स्वरूपात दगडासारखे आहे. तो वितळण्याजोगा उष्ण असूनही त्याच्यावरच्या प्रचंड दबावामुळे तो वितळत नाही.

वरचे आवरण हे घन आणि द्रव स्वरूपातल्या दगडाने बनलेले आहे. पृथ्वीचा पृष्ठभाग म्हणजेच कवच हे सर्वांत पातळ थराने बनलेले आहे. जमिनीच्या खालचा थर हा ग्रॅनाईट कवचाने बनलेला आहे. समुद्रीय कवच हे समुद्राच्या तळाशी असते. ते मुख्यत्वे बेसॉल्ट नावाच्या खडकांपासून बनलेले आहे.

*** पृथ्वीचे कवच आणि आवरण एवढे चित्तवेधक कसे आहे?**

पृथ्वीचे कवच हे एखाद्या सफरचंदाच्या सालासारखे आहे. बाकीच्या ४ थरांपेक्षा हे कवच खूप पातळ आहे. त्याची जाडी समुद्राखाली ५ ते १० किलोमीटर आणि भूभागाखाली ७० किलोमीटर एवढीच आहे.

पृथ्वीचे कवच हा सगळ्यात थंड असा थर आहे, कारण तो उघड्या



वातावरणात  आहे आणि विविध अशा खडकांनी बनलेला आहे. त्याचे तापमान त्याच्या खोलीनुसार वाढत जाते.

कवचाच्या खाली आच्छादन असते. त्याची जाडी २८८६ किलोमीटर आहे. सुरुवातीचा ८० किलोमीटरचा भाग सर्वांत कठीण आणि कडक खडकांनी बनलेला आहे. नंतरच्या २४१ किलोमीटरमध्ये प्रचंड तप्त घन स्वरूपातल्या खडकांचा समावेश आहे. ते फार कडक नसतात. कारण त्यांच्यात उष्णता असते. याच्या खालचे आवरण हे मजबूत घन खडकांचे बनले आहे.

पृथ्वीचे कवच आणि तिचे आवरण यांना लिथोस्फिअर असे संबोधले जाते. असे मानले जाते की, पृथ्वीचे कवच आणि आवरण हे काही १० कोटी वर्षांपूर्वीच बनलेले आहे.

*** पृथ्वीच्या गाभ्याची काय वैशिष्ट्ये आहेत?**

पृथ्वीचा गाभा अंतर आणि बाह्य अशा दोन थरांनी बनलेला आहे.



पृथ्वीचा बाह्य गाभा लोखंड आणि निकेल या धातूंपासून बनलेला आहे. या गाभ्याचे तापमान ४५००-५५०० डिग्री सेल्सिअसपर्यंत असते.

खरं पाहिलं तर हा गाभा एवढा गरम असतो की, लोखंड आणि निकेल हे धातू द्रव स्वरूपात असतात.

पृथ्वीचा बाह्य भाग हा खूप महत्त्वाचा आहे. कारण पृथ्वीमधल्या काही द्रव स्वरूपामधल्या धातूंच्या हालचालींमुळे चुंबकीय क्षेत्र निर्माण झाले आहे. याच चुंबकीय क्षेत्रामुळे पृथ्वीवर गुरुत्वाकर्षण शक्ती निर्माण झाली आहे.

पृथ्वीचा मध्यबिंदू म्हणजे पृथ्वीचा अंतर गाभा होय. बाह्य गाभ्याप्रमाणेच हादेखील लोखंड आणि निकेल यांपासून बनलेला आहे. अतिशय खोल असल्यामुळे तो प्रचंड दाबाखाली आहे.

या भागावर इतका प्रचंड दाब आहे की, पृथ्वीचा सर्वाधिक तप्त भाग असूनही तो लाल, उष्ण, घन स्वरूपात असतो. आतील गाभ्यामधले तापमान ५००० डिग्री सेल्सिअसपेक्षाही जास्त- जवळ जवळ सूर्याच्या पृष्ठभागाएवढे असते.

*** पृथ्वीवरचे वातावरण एकमेव का आहे?**

पृथ्वीला ज्या वायूंच्या थरांनी आच्छादलेलं आहे, त्याला आपण



हवा असे म्हणतो. यानेच वातावरण तयार होते. हवा ही ७८.०९ टक्के नायट्रोजन, २०.९५ टक्के ऑक्सिजन, ०.९३ टक्के अरगॉन, ०.०३ टक्के कार्बन डाय ऑक्साईड आणि काही प्रमाणात इतर वायू,

पाणी आणि वाफ यांनी बनलेली आहे.

वातावरण पृथ्वीला एका मोठ्या घोंगडीसारखे सुरक्षित ठेवते. हे वातावरण सूर्याची उष्णता शोषून घेते आणि वातावरणातच साचवून ठेवते; त्यामुळे पृथ्वीला उबदारपणा मिळतो. याचमुळे मुख्यत्वे दिवसा आणि रात्री बहुतांश पृथ्वीवरचे वातावरण स्थिर राहते.

पृथ्वीवरील हवामान घडविण्यात या वातावरणाचा मुख्य सहभाग आहे. सूर्यमालेतील बहुतांशी ग्रह आणि काही चंद्रांवरदेखील वातावरण आहे. मात्र ते पृथ्वीच्या वातावरणापेक्षा खूप वेगळे आहे.

*** सीमारेषा**

पृथ्वीच्या वर १०० कि.मी.वर शास्त्रज्ञांनी एक काल्पनिक सीमारेषा आखली आहे. त्याला 'कारमान रेघ' असे म्हणतात. ही सीमा पृथ्वीचे वातावरण आणि बाह्य अवकाश यामध्ये आहे. एकदा का माणसाने यानात बसून ती कारमान रेघ ओलांडली की, त्याला अवकाशवीर अशी पदवी बहाल केली जाते.

*** पृथ्वीच्या वातावरणाचे मुख्य थर कोणते?**

पृथ्वीचे वातावरण हे पाच थरांनी बनलेले आहे. 'ट्रोपोस्फिअर' हा पहिला थर आहे. हा थर जमिनीला समांतर आहे. याची उंची जमिनीपासून १०-१८ कि.मी.पर्यंत असते. ८० टक्के वातावरण हे ट्रोपोस्फिअरमध्ये आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या तापमानामुळे हे तापते.

स्ट्रॅटोस्फिअर हा दुसरा थर आहे, जो ५० कि.मी.पर्यंत उंचीवर विस्तारलेला आहे. हा थर सूर्याची किरणे शोषून घेतो. आपण जसजसे वर जातो, तसतशी हवा गरम होत जाते.

मेसोस्फिअर हा तिसरा थर आहे, जो स्ट्रॅटोस्फिअरच्याही वर ८० कि.मी.पर्यंत विस्तारला आहे. थरमोस्फिअर हा चौथा थर आहे.

अगदी शेवटचा आणि पातळ असा थर म्हणजे एक्झोस्फिअर. या थराची उंची पृथ्वीच्या पृष्ठभागापासून १०,००० कि.मी. वरती आहे.

*** एक्झोस्फिअर या थराचे वैशिष्ट्य काय?**

एक्झोस्फिअर हा पाचवा आणि वातावरणातला सर्वांत बाह्य थर




आहे. या थराची सुरुवात पृथ्वीच्या पृष्ठभागापासून सुमारे ५०० कि.मी.वर सुरू होऊन पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या सुमारे १०,००० कि.मी.वर त्याचा शेवट होतो.

सूर्याच्या किरणांपासून पृथ्वीचे संरक्षण करणारा एक्झोस्फिअर हा सर्वांत पहिला थर आहे. सर्व उल्का, लघुग्रह  वैश्विक किरणांआधी या थरांच्या संपर्कात येतात, त्यामुळे आपले संरक्षणही होते. एक्झोस्फिअर

या थरामधील हवा ही विरळ आहे. ती मुख्यत्वे हेलियम आणि हायड्रोजन यांपासून बनलेली आहे. आण्विक ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साईडसारख्या इतर वायूंचं अस्तित्व देखील यात असू शकते.

वातावरणातील इतर थरांच्या तुलनेत एक्झोस्फिअरमध्ये हवा विरळ आहे. म्हणूनच खालच्या थरांप्रमाणे इथे रेणू एकमेकांवर आदळत नाही. काही रेणू वातावरणाच्या बाहेर फेकले जातात तर काही रेणू खालच्या थरांमध्ये ढकलले जातात.

कृत्रिम उपग्रहांसाठी एक्झोस्फिअर हा थर परिपूर्ण आहे. कारण इथे अगदी कमी घर्षण होते. त्यामुळे परिभ्रमण कक्षेच्या बाहेर न जाता, हे कृत्रिम उपग्रह या थरामध्ये राहू शकतात.

अंतिमतः, अवकाशाच्या बाहेरील भागात जेथे वातावरण नाही, तेथे एक्झोस्फिअर मिसळून जातो.

**(क्रमशः)**

**निहारिका देशमुख**


**३री आवृत्ती**

**फार फार वर्षांपूर्वी**

**निरंजन घाटे**




**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




**संचाची किंमत**
**फक्त ३००/- रुपये**




# पंचतंत्र

**। रोचक गोष्टी । बोधप्रद गोष्टी ।**
**। मनोरंजक गोष्टी । प्रेरक गोष्टी ।**
**। सुरस गोष्टी ।**

निसर्गातले पशु-पक्षी, छोटेसे प्राणी, नद्या, डोंगर, गुहा या सगळ्यांचा उपयोग करून मजेदार ढंगात खास मुलांना ज्या गोष्टी सांगितल्या गेल्या, त्या 'पंचतंत्र' या नावानं प्रसिद्ध झाल्या.
सुमारे ४५० वर्षांपासून या मजेदार गोष्टी मुलांसाठी मनोरंजक तर आहेतच शिवाय मुलांवर संस्कारही करतात.अशाच पंचतंत्रातल्या या सरस आणि सुरस गोष्टी!









खाली दिलेल्या वस्तूंची बेरीज करून चौकोनात योग्य ते उत्तर लिहा.



१ २ ३ ४ ५









# ॥ मेघदूत ॥

अनुवाद :
**शान्ता ज. शेळके**




महाकवि श्रीकालिदास याचे 'मेघदूत' ही संस्कृत साहित्यातली एक स्वभावरमणीय अलौकिक कलाकृती आहे. 'मन्दाक्रान्ता' सारखे रसोचित वृत्त, प्रत्ययकारी निसर्गवर्णने, वेधक स्थलचित्रणे, विरहाच्या पार्श्वभूमीवर व्यक्त झालेला उत्कट प्रणयभाव आणि हे सारे समर्थपणे शब्दांकित करणारी कालिदासाची सुश्लिष्ट शैली  यांमुळे 'मेघदूता'ला अम्लान टवटवीत लावण्य लाभले आहे. मराठीत 'मेघदूता'चे अनेक अनुवाद झाले आहेत. आता प्रसिद्ध कवयित्री शान्ता ज. शेळके या आपला अनुवाद रसिकांना सादर करीत आहेत. साधी सरळ निवेदनपद्धती, छंदोबद्ध प्रवाही रचना, मूळ काव्याच्या रसवत्तेला बाधा न आणता किंवा आशयाला धक्का न लावता केलेली त्याची प्रतिकृती हे शान्ताबाईंच्या अनुवादाचे लक्षणीय विशेष आहेत. 'मेघदूता'च्या रसलुब्ध प्रेमिकांना तर हा अनुवाद आवडेलच, पण स्वतंत्रपणे वाचणारांनाही तो आस्वाद्य वाटेल.

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 July, 2016. Posting Date : 11 July, 2016.

# निवडक वाचनीय पुस्तके
















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.